# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृहाकार्यालय,
तिसरा मजला,
दि. १७/०३/२००७

आज दि. १७/०३/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १३ दि. ०३/०३/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृहानेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ७) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १४) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १७) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १८) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १९) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २०) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २१) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २२) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २३) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २४) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २५) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २६) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २९) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३०) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३१) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३२) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३३) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३४) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३६) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ३७) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३८) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३९) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४०) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ४२) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४४) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ४५) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४६) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४७) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४८) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४९) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५१) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५४) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५५) | श्रीम. शाहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५६) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ५७) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६१) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६६) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ६७) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६८) | श्रीम. शाहारक्षा एस. | सदस्या |
| ६९) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७०) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७१) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ७२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| २) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ३) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ४) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ५) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |

**परशुराम पाटील :-**

मी पिठासीन अधिकारी सभा चालु होण्याच्या अगोदर मी मा. महापौरांना विनंती करतो आणि आयुक्त साहेबांना विनंती करतो, उपमहापौरांना विनंती करतो की, आपल्या महापालिकेचे जेवढे मेन अधिकारी आहेत त्यांना आपण व्यासपिठावर बसविण्याची कृपा करावी. सगळे अधिकारी चांगले आहेत. त्यांचा अपमान होण्याचे काही कारण नाही. म्हणुन त्यांना वर व्यासपिठावर बसवण्यात यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. आयुक्त महोदया, सन्मा. विरोधी पक्षनेत्यांनी जी सुचना आपल्यासमोर मांडलेली आहे. तर कृपया त्या सुचनेचा आदर करुन सन्मा. अधिकारी वर्ग आहेत त्यांना कृपया डायसवर बोलावुन त्यांची बसण्याची व्यवस्था करावी.

**रतन पाटील :-**

अजुन सभा चालु झालेली नाही सभा चालु झाल्यानंतर विरोधी पक्षनेत्यांनी आणि सभागृहानेत्यांनी विषयाचा ठराव मांडावा.

**परशुराम पाटील :-**

हा ठराव नाही. ही सुचना आहे.

**रतन पाटील :-**

सुचना मांडा पण सभा चालु तरी होउ द्या. सभा चालु होउ द्या. आम्ही तुमच्या म्हणण्याला दुजोरा देतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी जी सुचना केलेली आहे. सभा सुरु होताच सर्व संबधित अधिकारी वर्ग जो खाली बसलेला आहे त्यांने डायसवर येउन बसावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा निर्णय नंतर घ्या. सभा चालु झाल्यानंतर ''वंदे मातरम'' झाल्यानंतर प्रोसिंडीगमध्ये येउ द्या. नंतर आम्ही त्याच्यावर बोलु आपण सभा सुरु होण्यापुर्वी असा कुठलाही आदेश देवु नये.

**मा. महापौर :-**

सभा सुरु झाल्यानंतर ते डायसवर येउन बसणार आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभा सुरु झाली नाही.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

(वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने सभेला सुरुवात करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार, १७ मार्च, २००७ ची सभा ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण राष्ट्रीयगीता अगोदर जी सुचना वाचलेली आहे. ती सुचना पुन्हा वाचावी त्याचा आम्हाला उपप्रश्न विचारुन सचिवांकडुन खुलासा घ्यायचा आहे. आणि तुम्ही नंतर व्यासपिठावर बसण्याची संमती द्यावी अशी आमची आपणांस विनंती आहे. कारण हा मुद्दा आम्ही घेतलेला नाही. सत्ताधारी पक्षाने हा मुद्दा घेतलेला आहे आणि आता सत्ताधारी पक्षातील लोक ही गोष्ट पुन्हा अशी करत आहे ही शरमेची बाब आहे. म्हणुन आपण पहिल्यांदा ती सुचना वाचा. आम्ही आमची उपसुचना सचिवांना विचारत आहे. त्यांनतर तुम्ही त्यांना डायसवर बसायला द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला वेळ देण्यांत येईल सभेला सुरुवात झालेली आहे. नमस्कार, दि. १७ मार्च २००७ महानगरपालिकेच्या आजच्या अर्थसंकल्पीय सभेला उपस्थित सभागृहामध्ये शहराचे मा. उपमहापौर श्री. चंद्राकांत वैती साहेब, मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड साहेब, सभागृहनेते श्री. हॅरल बोर्जीस, वरोधी पक्षनेता, श्री. स्थायी सभापती श्री. स्टिव्हन मेंन्डोंसा साहेब, विरोधी पक्षनेता, श्री. परशुराम पाटील साहेब सर्व गटनेते सर्व सन्मा. नगरसेविका, नगरसेवक, महापालिकेचे सचिव श्री. हरेश पाटील, सर्व सन्मा. उपायुक्त, विविध खात्याचे खातेप्रमुख अधिकारी वर्ग, वृत्तपत्रकक्षामध्ये बसलेले सर्व प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलेरीत उपस्थित असलेले बंधु आणि भगिनींनो, आपल्या शहरासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे की, आपल्या मिरा भाईंदर शहराला संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान २००४ - २००५ अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेत शौचालय व सांडपाणी व्यवस्थापन या क्षेत्रा अंतर्गत विशेष क्षेत्रीय पारितोषिकासाठी विजेते घोषित करण्यांत आलेले आहेत. दि. २१/३/२००७ बुधवार रोजी मंत्रायलामध्ये आदरणीय महराष्ट्र राज्य मुख्यमंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा पार पाडण्यात येणार आहे. तसेच आपल्या शहरामध्ये अनेक नामाकिंत व्यक्ती आहेत. ज्यांचा आपण

सतत सत्कार करतो. त्यापैकी आज ही आपण आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये खेळाडुंनी आंतराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त करुन आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव लौकीक वाढवलेले आहे व त्या सर्व खेळांडुचा मा. महासभेमध्ये नेहमिच सत्कार करत असतो. आज विशेष म्हणजे सत्कारमुर्ती म्हणून संगित कुलकर्णी यांचा आपण सत्कार करणार आहोत ते मिशन चॅम्पीयन या चित्रपटाला त्यांच्या एकुण सहा विविध झी गौरव पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. तसेच श्री. सुधीर एस. वझांरी यांनी राष्ट्रीय तथा आंतराष्ट्रीय स्तरावर कराटे स्पर्धेत प्रविण्य मिळवुन पुरस्कार प्राप्त केलेला आहे. श्री. मिल्टन डिसोझा यांना महापालिकेने आर्थिक मदत मिळवुन देवुन थायलँड येथे किंग बॉक्सिंगसाठी पाठविले होते व त्यांन सुवर्ण पदक पटकिवल्या बद्दल आपण या सर्वांचा मा. महासभेमध्ये गौरव आणि सत्कार करणार आहोत सदर व्यक्ती मिरा भाईंदर शहरातील नागरिक असुन यांनी प्राप्त केलेला पुरस्कार ही अभिमानाची गोष्ट आहे. शहराच्या वतीने, सभागृहाच्यावतीने आपण सर्वांनी मिळुन त्यांचा सत्कार करायचा आहे. आज मा. महासभेमध्ये स्थायी समिती सादर केलेल्या अर्थसंकल्पीय प्रस्तावित विकास कामावर सर्वांनी सखोल चर्चा करुन सदरच्या अर्थसंकल्पास सर्वांनी एकमताने सहकार्य करावे वा आपली चर्चा त्याच्यामध्ये सामावुन घ्यावी. दि. १९ मार्च २००७ ला गुडीपाडवा असुन या पाडव्या निमित्त आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देते की, हे नविन वर्ष तूम्हा सर्वांना सुखाचे समृध्दीचे आणि भरभराटीचे जाओ. हीच ईश्वर चरणी प्रार्थना करते. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हरकतीचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी सत्कार घ्यायचा आहे आपण बसुन घ्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सत्कार करु. सत्कार करायला आजचे कुठेही दुमत नाही. पण अधिकाऱ्यांचा जाणून बुजुन इन्सल्ट केला.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, सत्कार का प्रॉग्राम सेकेण्ड मिंटीग मे है और यहापहिली मिंटीग है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आसन व्यवस्था काय आहे. याचा आपण खुलासा करावा. नंतर आपण सत्कार करावा कारण हा विषय महासभेमध्ये झाला. व सचिवांचा अधिकार आहे की, या महासभेमध्ये डायसवर कोण बसणार याचा खुलासा आपण पहिल्यांदा करावा. कोणीही कुठे बसले तरी आमची त्याला हरकत नाही पण ज्या लोकांचा अपमान हे सत्ताधारी पक्ष करतात. आणि आज तेच .....

**परशुराम पाटील :-**

अधिकाऱ्यांविषयी आपल्याला इतके प्रेम का?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बाला. सभागृहात गोंधळ करु नका. आपल्या सर्वांना बोलण्याची संधी दिली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डायसवर बसण्याची पध्दत काय आहे त्याचा सचिवांनी खुलासा करावा आणि मागच्या सभेमध्ये काही प्रश्न उपस्थित केले का? त्या संदर्भामध्ये खाली बसण्याची व्यवस्था करुन पुन्हा वर बसण्याचे कारण काय आहे. याचा खुलासा पहिल्यांदा करावा.

**नगरसिचव :-**

सभागृहातील सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे आणि मा. महापौरांनी रुलिंग दिल्यामुळे सन्मा. प्रशासनाच्या आयुक्तांच्या परवानगीने बसण्याची परवानगी देण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जे पत्र दिलेले आहे ते मिटींगच्या आधि वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताच्या आधी वाचलेले आहे. राष्ट्रीय गीत झाल्यानंतर ते पत्र आपण वाचलेले नाही.

**रतन पाटील :-**

आता सुचना मांडलेली नाही.

**नगरसचिव :-**

व्यासपिठावर, आयुक्त, महापौर, सचिव हे बसु शकतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याची आपण आम्हाला तशी नोंद द्या व सचिवांनी याची अमंलबजावणी करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

विरोधी पक्षनेत्यंनी सुचना दिल्या त्या मताची अनुकुलता सन्मा. आयुक्तांकडे प्रदर्शित केली सन्मा. उपायुक्त दर्जाचे किंवा इतर सक्षम अधिकारी डायसवर बसले तरी त्याचा इतका विरोधाभास करण्याची

आवश्यकता नाही आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी वैसा ही आपको लगता है। तो इस विषय पर मतदान लिजिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यावर मतदान होत नाही.

**शरद पाटील :-**

सभागृहानेते साहेबांनी आता जे बोलले की, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांना ह्यांाचे दुःख आहे तर असे नाही. ज्यावेळी ह्यांना पहिल्यांदा उतरवले तेव्हा सभागृहानेते तुम्ही बोलायला पाहिजे होते की, ह्यांना उतरवुन खाली बसवु नका. पहिल्या मिटींगला त्यांना खाली कशाला बसवले? त्याचवेळी त्यांना वर बसवायला पाहिजे होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिवांनी नियमाप्रमाणे आपण व्यवस्था करावी आणि त्यानंतर सभेला सुरुवात करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य आप को सलाहादेता हु की, बजेट की सभा है अगर बजेट के उपर कहना होतो थोडा बाकी रखो।

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महासभेच्या व्यासपिठावर कोणी कोणी बसावे त्याचा खुलासा सचिवांनी करावा. त्यानंतर आपण बसण्याची व्यवस्था करावी. हा मतदानाचा विषय नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सभाशास्त्र हे प्रत्येक महानगरपालिका ज्याच्या सोयीनुसार चालवते. आपण आपल्या सोयीनुसार आदेश दिलेले आहेत. ते आपल्या प्रमाणे आदेशाने अधिकारी वर बसलेले आहेत बसु दे.

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील मा. महासभेला हे वाक्य तुमचेच होते.

**मिलन पाटील :-**

आपले नियम आपण वापरतो त्यांचे नियम ते वापरतात. ह्यात काही फरक पडत नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभेचे कामकाज सुरु होण्याच्या अगोदर त्यांनी जो प्रस्ताव ठेवला जी सुचना केली. ती सुचना त्यांनी आता करायला पाहिजे होती तेव्हा कामकाज सुरु झालेले नव्हते.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांसमोर सुचना केली आणि त्यावर रुलिंग दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अशी रुलिंग चालत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, अधिकारी उपर बैठे उससे हमको तकलिफ नही। पर यहासत्ताधारी कानुन का मजाक उडाते है। आपसे कभी ऐसा रुलिंग दिलाते है और आप भी देते है। आपको कभी ऐसा रुलिंग दिलाते है और आप भी देते है। आपको रुलिंग का भी कोई व्हॅल्यु रहा नही। जैसा यहासत्ताधारी नाचाऐंगे वैसा आप नाचते है। यहाप्रश्न सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजींने बोला था। और अभी वहाचुपचाप बैठे।

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य मै चुपचाप बैठा नही जब आपको विषय पर रुलिंग मिलेगा तभी मै जो बोलने का है वहाबोलुगां।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जे अपेक्षित आहे तेवढेच आपण बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जी व्यवस्था व्यासपिठावर झाली पाहिजे, सचिवांनी त्या व्यासपिठाची किंमत करावी त्या नियमांचे पालन करावे असे त्यांचे म्हणणे आहे आणि जर एवढेच त्यांना वाटते व्यासपिठावर अधिकारी बसले पाहिजे तर त्यांना असे मागच्या दाराने यायची गरज नाही. स्वतःचा मोठेपणा दाखवण्याची गरज नाही. त्यांनी आमच्या गटनेत्यांशी बोलले असते तर ठिक आहे. म्हणजे हम करे सो कायदा असा कायदा चालणार नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

क्लास - १ ऑफिसर है नीचे बैठते है वहाअच्छा नही लगता है। कल यहासत्ताधारी बोलेंगे की, आप भी नीचे बैठीऐ।

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, सभेचा जास्त वेळ न दवडता आम्ही आपल्याला विनंती केलेली आहे की, सदरची विषयाची आवश्यकता असेल तर मतदान करा आणि सभेला सुरुवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, अशा विषयावर मतदान होत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा सदस्य, आपली सुचना नोंदवुन घेण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवकांच्या प्रशिक्षणाला आपण बऱ्याच ठिकाणी फिरलेलो आहोत. या ठिकाणी आमच्या बरोबर तुम्ही सुध्दा होता. महानगरपालिकेमध्ये आपण आणि स्वतः अजिज शेख साहेब आपण जावुन त्यांना त्या ठिकाणी महापौर या पिठासीन अधिकाऱ्याचे एक चेंबर होते आणि तिथे त्यांची एक खुर्ची त्याच्या बाजुला आयुक्तांची खुर्ची आणि त्यानंतरचा जो अधिकारी वर्ग तो बाजुला. डेप्युटी मेयर त्यांच्या खाली ही आसन रचना आपण बघितलेली आहे. माझ्याकडे त्याचे फोटोग्राफ्स आहेत. बाजूची ठाणे महापालिका आहे. तिथे सर्वात मोठे आसन आहे हे महापौरांचे एका बाजूला आयुक्त व दुसऱ्या बाजुला उपमहापौर आहेत आणि त्यांच्यासमोर असे गटनेता आहेत. अधिकारी वर्गांना बाहेर स्पेशल रूम दिलेली आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये जी रचना चालली जी महापालिका आपल्या कायद्यावर चालते बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४८ येथे बघा कोणी वर बसविले कोणी खाली बसविले तर कोणाचा मान कोणाचा अपमान ते महत्वाचे नाही आज महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून तुम्ही आम्हाला आतमध्ये बसवलेत हा आमचा मान अपमानाचा प्रश्न नाही. ती आपल्या सर्वांची ड्युटी आहे. जो डेकोरम आहे तो सर्वांनी पाळला पाहिजे. प्रत्येक महापालिकेची आसनव्यवस्था ठरलेली आहे. कसले ठराव करता? सभागृहाच्या नेत्यांनी सांगायचे की, असे झाले तसे झाले. विरोधी पक्षनेत्यांनी सांगायचे मागच्यावेळेला आपण त्यांना खाली बसवले ते बरोबर आहे. ते काय चुकीचे नव्हते. तुमच्याकडे स्वतःची येथे गॅलेरी होती. त्याच्या अगोदर ठराव झालेले आहेत ती अर्धी गॅलेरी अधिकाऱ्यांना दिलेली होती येथे जो तो उठेल आणि डायसवर बसेल असे चालणार नाही. आयुक्त, महापौर आणि उपमहापौर वर बसतील आणि सचिव सुद्धा खाली आहे. सचिव तुमच्या बाजूला नाही. ही रचना जावून बघा जो नियम, जो कायदा, जसे सभागृहाचालते अन्य ठिकाणी जी पद्धत आहे ती आपल्याकडे अवलंबा. माझा ही कोणावर रोश वगैरे नाही. पण डेकोरम कोण पाळणार? अधिकारी खाली बसले म्हणून कोणाला वाईट वाटण्याची गरज नाही. अधिकारी वर बसले म्हणून कोणाला चांगले वाटण्याची गरज नाही. पण आयुक्तांनी आणि महापौरांनी बाकीच्या महापालिकांमध्ये काय व्यवस्था आहे. त्याच्यातली नियमानुसार आणि कायदेशीर खुर्ची ह्याचा विचार करून तुम्ही ॲक्ट करायचा आहे. त्यांनी उद्या काही केले व महापौरांना बाहेर बसवले म्हणून तुम्ही बाहेर बसायचे नाही. मालेगावच्या महापालिकेमध्ये महापौरांना जजसारखा गाउन आहे. त्यांच्या पुढ्यात दंडक आहे हे मी बघितलेले आहे. आपल्याकडे ते आहे का तर नाही या अगोदर ही खुर्चीही नव्हती. ठिक आहे महापालिका नविन झाली पण मालेगावचीही महापालिका आत्ता झाली. आपल्या बरोबरच झाली आपल्याकडे दंडक सुद्धा नाही. म्हणजे हे जे डेकोरम पाळायचे असतात तेच आपण पिठासिन अधिकारी आहात. तुम्ही बसवल्या नंतर तो दंडक आडवा समोर ठेवला पाहिजे आणि सभा चालू झाली पाहिजे. हे मिलन म्हात्रेला सांगायची गरज नाही. हा कायदा बोलतो हा डेकोरम बोलतो. आयुक्तांना कळले पाहिजे. आय.ए.एस ऑफिसर किंवा जे कोण आहेत त्यांनी हे सगळे केले पाहिजे आणि प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्तांनी दरवेळेला उत्तर दिले पाहिजे तेही उभे राहून तसे उत्तर सुद्धा दिले जात नाही. मधे काहीतरी कुजबुज होते. मोबाईलवर संभाषण होते आणि उत्तर दिले जाते असे नाही तर ह्या सगळ्या ज्या गोष्टी आहेत त्याबाबत परत एकदा सांगतो की ह्या मिटींगला ही कुठली आपल्याकडे अपोलो सर्कस आलेली नाही. वाघ वर, कोल्हे, चित्ते, लांडगे खाली पर वाघ खाली आल्यावर चित्ते, लांडगे वर ही सर्कस नाही. हा डेकोरम आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा या वक्तव्याला आमचा आक्षेप आहे. येथे कोल्हे लांडगे नाही. येथे सगळे लोक आहेत. आपण असा उल्लेख करू नका. असे चालणार नाही. आपण त्यांना हा शब्द मागे घ्यायला सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण हे शब्द मागे घ्या. सचिवांनी हे शब्द कामकाजातून वगळून टाकावे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय बोललो हे पुर्ण ऐका. गावात आलेली ही सर्कस नाही.

(सभागृहात गोंधळ.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या सुचना समजलेल्या आहेत. आपण बसुन घ्या. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आपण बोला.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मी जेव्हा प्रशासनाला, आयुक्तांना, महापौरांना पत्र दिले तेव्हा मिटींग असताना मी त्या पत्राचा खुलासा मागितला तेव्हा आपणच रूलिंग दिलेली होते की, पुढच्या मिटींगला त्यांची आसन व्यवस्था खाली केली जाईल आणि कुठे करायची ते प्रशासनाने ठरवायचे होते आपण ठरवायची गरजच नव्हती तदनंतर आपण दुसऱ्या मिटींगला त्या अधिकाऱ्यांना खाली उतरवले त्यांचा मानापमान झाला आम्हाला त्याच्याशी काही लेन देन नाही. आम्ही त्यांचा अपमान करू इच्छित नाही. परंतु, आपण ही मसुरीच्या दौऱ्याला होता हे व्यासपिठ आहे आणि या व्यासपिठावर कोणी बसायचे हे आपणांस ही ठाउक आहे. त्यामुळे आपण ही आसन व्यवस्था खाली केलेली होती. तद्नंतर जर सभागृहाच्या भावना चांगल्या झाल्या असतील की त्यांना वरच बसवावे ही वेगळी गोष्ट आहे. परंतु, आपण ज्यावेळेला ही रूलिंग दिली ती रूलिंग नको द्यायला होती. मला पहिलेच सांगायला पाहिजे होते की तुम्ही तुमचे पत्र मागे घ्या. आपण आसन व्यवस्था वर करू. त्यांचाही अपमान झाला नसता. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेंनी जो मुद्दा मांडला आहे हे व्यवस्थित आहे त्याचप्रमाणे सभागृहाचालले पाहिजे आपण ही पाहत असाल अधिवेशन चालू आहे. सभापती फक्त एकटाच व्यसापिठावर असतो त्याचप्रमाणे आपलेही सभागृहाचालावे अशी माझी आपणांस विनंती आहे.

**रिटा शाहा:-**

मा. महापौर मॅडम, आता डेकोरमचा विषय झाला म्हणजे कायदे कानून कुठल्याही सभागृहामध्ये कायद्याने कायदा बनवून दिलेला आहे. त्याची आपण सर्वाना जाणीव आहे. परंतु आजची आपली बजेटची मिटींग आहे आणि अतिमहत्वाची मिटींग आहे आणि मागच्या सभेमध्ये सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांचे पत्रान्वये आपण तो कायदा पाळत असताना मा. महापौरांनी सर्व अधिकारी वर्गांना खाली बसविले त्यानंतर ह्या सभागृहामध्ये आजच्या मिटींगमध्ये विरोधी पक्षनेत्याचे असे झाले की, आपले सर्व मान्यवर अधिकारी आहेत त्यांच्या साठी आपण बसण्याची सोय जेव्हापर्यंत करू शकत नाही तोपर्यंत त्यांना खाली बसविणे योग्य वाटत नाही. आणि त्यांनी तशी सुचना दिली आणि त्याच्यावर मा. महापौरांनी रूलिंग दिले व त्यांना परत डायसवर बसवले तर मला असे वाटते की सभागृहामध्ये बसणारे ते कुठले सर्कसचे नाही. आपण येथे सर्व नगरसेवक तज्ञ आणि ज्ञानी आहोत. ह्या सभागृहामध्ये बसणारे सर्व नगरसेवक जास्तीत जास्त १५ वर्ष संपत आलेले आहेत आणि बजेटसारख्या सभेमध्ये आपण शुल्लक प्रश्नासाठी अर्धा तास आपण वाया घालवतो ती खरोखर दुःखद घटना आहे याची आपण नोंद करून घ्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यापेक्षा दुःखद घटना अशी आहे की, सत्ताधारी या सभागृहाचे नियम पालन करत नाही. या शहराची वाट लावायला घेतलेली आहे. ही दुःखाची बाब आहे.

**एस. ए. खान :-**

आजची महत्वाची मिटींग आहे. ह्या सभेमध्ये बजेटची चर्चा होणार आहे आणि हे जे खाली बसा, वर बसा ह्याच्यावर जी चर्चा चालू आहे, त्याच्यामुळे वेळ वाया घालवू नका आणि सन्मा. सदस्यांना ज्यांनी सर्कस म्हटलेले आहे त्यांच्या विरुध्द तुम्ही गुन्हा दाखल करुन घ्या. कारण हे सन्मा. सदन आहे आणि ह्या सदनाला त्यांनी सर्कस म्हटले आहे. तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन घ्या.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, सभेला सुरूवात करताना. पहिल्यांदा तुम्ही या सभागृहाचे जे नियम आहेत त्याचे तुम्ही पालन करायला पाहिजे. आपण हे चुकीचे करतात. एका बाजूला आपण ह्याकरिता प्रशिक्षणाला घेउन जाता आणि दुसऱ्या बाजूला या प्रशिक्षणाची आपण वाट लावायला घेतली आहे. तुम्हाला जर करायचे असेल तर आपण गटनेत्यांची मिटींग लावा हा कायदा जोपर्यंत ही सभा चालेल तोपर्यंत ठिक आहे. आपण मिटींगला गटनेत्यांना बोलवा.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण जास्त वेळ बोललो किंवा जोरात बोललो व आपण ज्ञानी आहात याबद्दल कोणाचे दुमत नाही. आपण तज्ञ आहात याबद्दल कोणाला शंका घेण्याची गरज नाही आपल्याला सर्टीफिकेट देवून टाकले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याबाबत आपल्याला खुलासा देण्याची गरज नाही. सचिवांनी या सभेच्या व्यासपिठावर कोणी बसायचे त्यांचा त्यांनी खुलासा करावा तसेच आम्हाला शिकवण्याची गरज नाही आम्ही शिकलेले आहेत. सचिव साहेब निर्णय घ्यावा आणि जर तुम्हाला या व्यासपिठावर पुन्हा बसायचे असेल तर गटनेत्यांची मिंटीग बोलवावी आणि ही जी सभा आहे तो जुन ऑगस्टपर्यंत चालेल तोपर्यंत आपण ....

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य आपण ऐकुन तरी घ्या. या सभागृहाला सुचना करत आहे की, आपण या दौऱ्याला गेल्यानंतर बऱ्याच चांगल्या गोष्टी शिकुन आलात अजुन थोड चांगल आपण शिकायला पाहिजे अजुन दौरे

करावेत अजुन शिकता येईल. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी एक सुचना केली मालेगाव महानगरपालिका, ठाणे महानगरपालिकेची आसन व्यवस्था याबाबत सन्मा. सभागृहाने आणि मा. आयुक्तांनी सर्व महापालिकांची आसन व्यवस्था पाहणी करावी त्याविषयी आपण एका अधिकाऱ्याची नेमणुक करुन सभाशास्त्राला अनुसरुन इतर महापालिकांचे आपण अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना बसण्याची काय व्यवस्था आहे त्याची व्यवस्था करावी आणि इतर महापालिकेचे अनुकरण करून सभेला अनुसरून आपण अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना बसण्याची तजबीज करावी आणि जो पर्यंत हा प्रश्न सुटत नाही. पुढच्या मिंटींगमध्ये हा प्रश्न सुटेल अशी आपल्याला खात्री आहे तोपर्यंत अधिकारी येथे बसावे. याकरिता सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण थोडेसे मन मोठे करा. कदाचित सत्ताधारी सन्मा. सदस्य शाशिकांत भोईर यांनी सुचना केली होती परंतु, आज सभागृहामध्ये मा. सभागृहानेत्यांनी व मा. विरोधी पक्षनेत्यांनी जी सुचना केली ती सुचना एक चुकीची दुरुस्ती आहे. निदान आजच्या सभेपुरते अधिकाऱ्यांना येथे बसु द्या आणि ह्यानंतर पुढील सभेमध्ये त्यांच्या आसन व्यवस्थेविषयी गटनेत्यांना घेउन या विषयी विचार विनिमय करुन अधिकाऱ्यांना योग्य ती बसण्याची व्यवस्था करावी आणि आज बजेटची अतिशय महत्वाची मिंटीग आहे व आपण या बजेटच्या मिटींगला सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

**शरद पाटील :-**

आपल्याला देखिल हे माहित होते तेव्हाहा विषय आजच्या मिंटीगला काढायला नको होता आणि दुसरी गोष्ट तुम्हीच खाली बसविता तुम्हीच वर बसविता हे सर्व तुम्ही करत असतांना म्हणजे तुम्ही कशाला ते सर्व खर खोटे त्याला काय फायदा नाही. काही नाही असे बोलले तर चालेल का? आम्हाला त्यांचा विरोध नाही त्यांनी वर बसावे पण पहिलेच त्यांना खाली उतरविले तेच चुकीचे होते तुम्ही सांगायला पाहिजे होते की, त्यांना वर बसु द्या जसे सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी सांगितले तसे त्यांना बोलावुन सांगायला पाहिजे की, आपण आपलं पत्र मागे घ्या. त्यांनी पत्र मागे घेतले असते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे. सचिवजी पुढील कामकाजाला सुरुवात करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. उपमहापौर साहेब, अभी नीचे उतरकर अपमान मत करना।

**प्रकाश ठाकुर :-**

महापौरांची राष्ट्रवादी पक्षातुन हकालपट्टी केल्यामुळे आम्ही पक्षाचे नगरसेवक त्यांचा जाहिर निषेध करत आहोत.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेला मा. महापौरांनी जाहिर केले आहे की, तीन जणांचा सत्कार करायचा आहे. प्रथम मी मिरा भाईंदर शहरातील श्री. संगित दत्तात्रय कुलकर्णी हे लहानपणापासुन येथे राहत आहेत त्यांचे शिक्षण अभिनव विद्या मंदीर, गोडदेव या शाळेत झालेले आहे. त्यांचे वडिल दत्ता केशव कुलकर्णी हे चित्रपट क्षेत्रातील चांगले लेखक व दिग्दर्शक आहेत. त्यांनी फटाकडी, कुंकु ओवाळते भाउराया, एक गाव बारा भानगडी अशा अनेक चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन केले आहे मी श्री. संगित कुलकर्णी ह्यांना या सभागृहात त्यांच्या वडिलांच्यावतीने पाउलावर पाउल ठेवुन दुरदर्शन मालिका थरार, मोठी त्याची साउली, रिमझिम, वादळवाट, तुझ्यादिशा, रेशीमगाठ तसेच चित्रपटात जनता जनार्दन,मिशन चॅम्पियन अशा अनेक मालिका व चित्रपटाला २००६ या उत्कृष्ट चित्रपट, उत्कृष्ट दिग्दर्शक, उत्कृष्ट कथा, पटकथा असे एकुन सहा झी गौरव पुरस्कार मिळाले त्यामध्ये श्री. संगित कुलकर्णी हे भाईंदरमध्ये राहणारे असुन त्यांना चॅम्पियन मिशन या चिटपटाबद्दल उत्कृष्ट दिग्दर्शीत झी पुरस्कार मिळालेला आहे. त्याच्याबद्दल यासभेत सत्कार करण्यासाठी मी मा. महापौरांच्या परवानगीने श्री. संगित कुलकर्णी यांना डायससवर आंमत्रित करित आहे. मा. माहपौर त्यांचा सत्कार करित आहेत. कृपया सर्वांनी त्यांचे स्वागत करायचे आहे.

(मा. महापौर यांनी श्री. संगित कुलकर्णी यांना पुष्पगुच्छ देउन त्याचे सभागृहासमोर स्वागत केले.)

तसेच कराटे चॅम्पियन श्री. सुधीर एस.वंजारी यांना राष्ट्रीय तथा आंतराष्ट्रीय स्तरावर कराटे चॅम्पियन स्पर्धेत प्रविण्य मिळवुन पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल त्यांचा देखिल ह्या सभेत सत्कार करण्यात येत आहे त्यांना मी डायसवर येण्याची विनंती करत आहे.

(मा. महापौर यांनी श्री. सुधिर एस.वंजारी यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे सभागृहासमोर स्वागत केले.)

त्याप्रमाणे श्री. मिल्टन डिसोझा आपल्या महानगरपालिकेने त्यांना किंग बॉक्सिंगसाठी बाहेर पाठविले होते त्यांनी आपल्या पालिकेने केलेल्या आर्थिक सहाय्याच्या मदतीचे चिज केले आहे. म्हणुन त्यांचा याठिकाणी सत्कार करीत आहात.

(मा. महापौर यांनी श्री. मिल्टन डिसोझा यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे सभागृहासमोर स्वागत केले.)

सत्कार मुर्ती श्री. संगित कुलकर्णी हे आपले मनोगत व्यक्त करत आहेत.

**श्री. संगित कुलकर्णी :-**

व्यासपिठावर उपस्थित असेलेले मान्यवर आणि मा. नगरसेवक आपल्या सर्वांचा जास्त वेळ मी घेउ इच्छित नाही पण सगळ्यांनी हा जो येथे सत्कार केला याचा मला खरोखरच झी गौरव पारितोषिक घेतांना

जेवढा आनंद झाला नसेल तेवढा आंनद आज मला झाला. कारण ज्या गावात मी जन्माला आलो. लहानाचा मोठा झालो त्या गावातल्यांनी माझ्या पाठीवर मारलेली ही थाप माझ्यासाठी खरोखरच महत्वाची आहे धन्यवाद.

**श्री. मिल्टन डिसोझा :-**

सर्वांना माझा हार्दिक नमस्कार मी सर्वांचा आभारी आहे. माझे वय कमी आहे पण मी जे काय बोलणार आहे ते महत्वाचे बोलत आहे. ज्यावेळी मी बॉक्सिंग चालु केले त्यावेळी मी कधीही विचार केला नाही की, मी इंटरनॅशनल लेव्हलवर जाणार आणि कधी हे ही डोक्यात आले नाही की, मी मला महानगरपालिकेतर्फे ही स्पॉन्सरशिप मिळणार आज इंटरनॅशनल वर पाच टुर्नामेंट झाली आणि पाच ही टुर्नामेंटला महापालिकेने मला स्पॉन्सर केले आणि त्याचा मी रिझल्ट दिलेला आहे. सर्वांत पहिल्यांदा मी मा. महापौरांना धन्यवाद देतो. तसेच मिश्नर, डेप्युटी मेयर, श्री. स्टिवन मेन्डोंसा, मा. गिल्बर्ट मेन्डोंसा, श्री. हॅरल बोर्जीस आणि सर्व स्थायी समिती सदस्य व सर्व सन्मा. नगरसेवकांचा आभारी आहे. धन्यवाद.

**श्री. सुधीर एस. वंजारी :-**

सर्वांना माझा नमस्कार. आपण महानगरपालिकेतर्फे माझा जो सत्कार केला त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. धन्यवाद.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, श्री. संगित कुलकर्णी, ह्यांना मिशन चॅम्पीयन ह्या चित्रपटासाठी झी गौरव पुरस्कार विजेते श्री. सुधीर वंजारी ह्यांना कराटे स्पर्धेसाठी पुरस्कार व श्री. मिल्टन डिसोझा यांना किंग बॉक्सींग स्पर्धेसाठी पुरस्कार या तिन्ही मौल्यवान रत्नाचा या सभागृहामध्ये मान सन्मान करुन त्यांच्या पाठीवर जी शाब्बासकीची थाप मारलेली तुम्ही सर्वांचे मी पुन्हा एकदा सभागृहाच्यावतीने अभिनंदन करतो. तूमच्या पुढील भविष्यामध्ये उत्तारोत्तर प्रगती व्हावी अशी सभागृहाच्या वतीने आपल्याला शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द पुर्ण करुन पुन्हा एकदा तुमचे हार्दिक अभिनंदन.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. संगित कुलकर्णी ह्यांच्या सोबत लहानपणापासून खेळत होतो. व आज त्यांना हा मान मिळालेला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण श्री. सुधिर वंजारी हे विसरले नसतील आज सभागृहामध्ये मा. रोहिदास पाटील (काका) नाही. नगरपालिकेच्या काळामध्ये त्यांना ही संधी मिळाली त्यावेळी सन्मा. नगरसेवक (काका) यांनी श्री. संपतराव शिंदे यांच्याकडे घेवुन गेले असतील आणि ह्याला तुम्ही काहीतरी मदत करा. हा चांगला माणुस आहे. चांगला मुलगा आहे. भविष्यामध्ये काहीतरी करेल आणि त्यावेळी आर्थिक मदतीचा आणि (काकांचा) त्यांनी मान ठेवलेला आहे. म्हणुन श्री. सुधीर वंजारी ह्यांना धन्यवाद देतो. त्यांनी हा काकांचा अभिमान वाढला असेल. सुधीर आज ह्या पदावर गेलेला आहे. त्याबद्दल आम्ही भारतीय जनता पार्टीच्यावतीने यांचा सन्मान करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगपालिकेची कर्मभुमी ही अंत्यत सुपीक म्हणजे पुर्वी शेतीसाठी ही सुपिक हाती . या भुमीमध्ये अनेक नामवंत होउन गेले होत आहेत. जे श्री. संगित कुलकर्णी आहेत ते माझ्या बाजुच्या सोसायटीतील माझे शेजारी आहेत. संगित कुलकर्णी आहेत संगित माझ्या शाळेत शिकणारा माझ्या मागच्या वर्गाचा त्याचा मोठा भाउ माझ्या अगोदरच्या वर्गातला आणि त्याचा अजुन एक सख्खा भाउ संगम आहे तो माझ्या वर्गात आणि समन्वयस्क आणखीन एक रत्न आपल्या भाईंदरचा म्हणजे श्री. शरद पोंक्षे हा उत्कृष्ट आर्टीस्ट, बाम्हण सभेमध्ये राहणारे रहिवासी आता झी गौरव म्हणुन आपल्याला पुरस्कार मिळाला म्हणुन आपण त्यांना जेथे मानाने बोलावले पण एखादा असा चांगला शो काढा की, जो आपला श्री. शरद पोंक्षे आमच्या लहानपणापासुन शरद अगदी शाळेमध्ये ही सर्व मुल आपल्यासमोर लहानाचे मोठे झाले त्यांच्या चार पाच वर्ग आम्ही पुढे होतो. मी मॅट्रिकला तर ही मुल पाचवी साहवीला असतील तर आज ही मुल टि.व्ही क्षेत्रामध्ये दुरचित्रवाणी अशा मोठ्या मोठ्या कलाक्षेत्रात नावाजलेली बघुन खरोखरच मनं भरुन येते. श्री. शरद पोंक्षे सारखा एक चांगल्या कलाकराला सुध्दा आपल्या महापालिकेने मुद्दामुन एखादे कारण काढुन बोलवावे व त्यांचा सत्कार करावा कारण आज संपुर्ण महाराष्ट्र, देश, विदेश वाहिन्यांवरुन ही आपल्याला बघायला मिळते. ज्या ज्या लोकांनी आपल्या भाईंदर भुमीचे नाव संपुर्ण महाराष्ट्रात आणि देशामध्ये काढले आता श्री. संगित कुलकर्णी हे बाजुला बसले आहेत त्यांच्या चित्रवाहिन्यांचे जे एपिसोड आहेत ते दिल्लीलाही बसुन बघायला मिळतात. नुसते भाईंदर नव्हे. आपल्या मिरा भाईंदरच्या संपुर्ण भुमीला त्यांनी मान दिला त्याकरिता मिरा भाईंदरच्या संपुर्ण भुमीला त्यांनी मान दिला त्याकरिता मिरा भाईंदर जनता दलातर्फे स्वतः मी मिलन म्हात्रे त्यांना आदराचा प्रणाम आणि सलाम करतो. धन्यवाद.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो की, महापालिकेच्या हद्दित रहाणारे आणि ज्यांची कर्मभुमी म्हणुन संबोधले जाणारे अशांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये विविध कामगिरी बाजावलेली आहे. अशांचा माहपालिकेच्या वतीने सत्कार केलेला आहे आणि निश्चितच आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. शिवसेनेच्या वतीने मी त्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा देतो.

( नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२२ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समिती सभापती हे मा. महापौरांना बजेट सादर करित आहे. सर्वांनी उभे राहुन त्याचे स्वागत करायचे आहे.

मा. परिवहन समितीचे सभापती हे देखिल परिवहनचे बजेट मा. महापौरांना बजेट सादर करित आहेत.

मा. स्थायी समितीचे सभापती हे श्री. स्टिवन मेंन्डोसा हे आपल्या बजेटवर निवेदन करित आहेत.

**स्टिवन मेंडोसा (मा. स्थायी समिती, सभापती ) :-**

मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर साहेब, मा. सभागृहानेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. आयुक्त, मा. उपायुक्त, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका माझे बंधू भगिनींनो, माझे अधिकारी व कर्मचारी वर्ग गॅलेरीत उपस्थित असलेले नागरिक व पत्रकार बंधू, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००६-०७ चे सुधारित व सन २००७-०८ चे मूळ अंदाजपत्रक आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. पुढील निवेदन कृपया सचिव साहेब आपण करावे.

(नगरसचिवांनी स्थायी समितीचा सभापतींच्या निवेदनाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**नगरसचिव :-**

तसेच, परिवहन समितीचे सभापती आपले मनोगत व्यक्त करत आहेत.

**उस्मान नुरले (मा. परिवहन समिती, सभापती) :-**

सन्मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर साहेब, सन्मा. स्थायी समिती सभापती श्री. स्टिवन मेंडोसा साहेब, तसेच सर्व पदाधिकारी, स्थायी समितीचे सदस्य, सर्व नगरसेवक, नगरसेविका, मा. आयुक्त साहेब, कर्मचारी व अधिकारी वर्ग मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे ९७(क) अन्वये मा. परिवहन व्यवस्थापक ह्यांनी सादर केलेले व्दितीय अंदाजपत्रकात आवश्यक त्या दुरुस्त्या करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका व १९४९ चे कलम ९८ (३) नुसार आपल्याकडे मंजूरीसाठी सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. सध्या ४० बसेस खाजगी करण्यामार्फत सुरु असून त्यामध्ये वाढ करुन एकूण ५० बसेस खाजगी करणातून सुरु करण्याचा मानस आहे. तसेच, अंदाजपत्रकात २५ बसेस मनपाच्या मालकीच्या असाव्यात यासाठी देखिल तरतुद करण्यांत आलेली आहे. तसेच इतर मार्गाने उत्पन्न कसे मिळवता येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. मा. सदस्य परिवहन व्यवस्थापक व अधिकारी वर्ग यांच्या सहकार्याने मोठया प्रमाणात तूट भरुन काढण्यांत यश प्राप्त झालेले आहेत. भाईंदर ते ठाणे, भाईंदर ते बोरिवली या मार्गाची परवानगी लवकरच मिळेल त्यामुळे परिवहन सेवेची मोठया प्रमाणातील तुट भरुन निघणार आहे. परिवहन सेवा सुरु होण्यासाठी आपले दिनमोलाचे सहकार्य मिळेल ते सहकार्याने ही परिवहन सेवा सुरु राहण्यासाठी आपणाकडून सहकार्य मिळत राहिल अशी अपेक्षा बाळगतो. मा. परिवहन समितीमार्फत अभ्यास दौऱ्यामध्ये आम्हांला तिथे अभ्यास दौऱ्यानिमित्त ज्या काही गोष्टी आम्हांला देता आल्या ते मी आपल्या सभागृहासमोर सादर करतो. आम्ही बैंगलोर परिवहन सेवेला भेट दिली असता तिथे आम्हांला असे कळविण्यांत आले होते की, १०० टक्के प्रायव्हेटायझेशन हे महापालिकेला परवडण्यासारखे नाही त्याकरिता ६५ टक्के हे स्वतःचे असावे आणि ३५ टक्के हे प्रायव्हेटायझेशन असावे म्हणून खाजगी करणातून बस उपलब्ध करुन घेतली तर त्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही. परंतु, हे करत असताना ठाणे आणि बोरिवलीच्या परवानगी प्राप्त करण्यासाठी वेळोवेळी आम्ही मा. आर.टी.ओ. साहेबांच्या मिटींगमध्ये गेलो असता त्यावेळी मा. आयुक्तांची ही उपस्थिती होती. व्यवस्थापक साहेब सुद्धा आमच्या सोबत होते. परंतु, वेळोवेळी आपल्या महापालिकेचे स्वतःचे प्लिंथ असावे असे संबंधित अधिकाऱ्यांकडून आर.टी.ओ. च्या मिटींगमध्ये वारंवार मत व्यक्त करण्यात आलेले होते. परंतु, त्या अनुषंगाने आम्ही ह्या बजेटमध्ये दिड करोड रुपयाची तरतुद या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमासाठी ठेवलेली होती. परंतु, या बजेटमध्ये दिड कोटी रुपयाची तरतुद वगळण्यात आलेली आहे. तरी मी आपणांस अशी विनंती करतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या टाउन प्लानिंगमध्ये परिवहन उपक्रमाकरिता आरक्षित असलेले भुखंड विकसित करणेकामी ५० लाख रुपयाची तरतुद करण्यात आलेली आहे. आगाराच्या बांधकामासाठी ५० लाखाची तरतुद या बजेटमध्ये करण्यात आलेली आहे व स्वतःचे प्लिंथ नसेल तर ह्या आगाराची तरतुद कशासाठी? असा मुद्दा उपस्थित होतो. माझी आपण सर्वांना नम्रतेची विनंती आहे की वेळोवेळी आज जसे मिरा भाईंदर शहरामध्ये एस.एस.सी. च्या परिक्षा सुरु आहेत अशावेळेला विदयार्थ्यांना आपल्या हक्काने, आपल्या हक्काच्या बसेस आहेत ते वेळोवेळी पाहिजे तिथे फिरविता येईल आणि लोकांना त्या माध्यमातून चांगली सेवा देता येईल आता ही आपण चांगली सेवा देत आहोत. परंतु माझे सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, दिड करोड रुपयाची तरतुद जी परिवहनच्या माध्यमातून या बजेटमध्ये नाकारण्यात आलेली आहे ती दिड करोड रुपयाची तरतुद आपण ह्याच्यामध्ये समाविष्ट करुन आपण चांगले असे धोरण कराल अशी अपेक्षा बाळगतो आणि दोन शब्द संपवतो. जयहिंद , जय महाराष्ट्र। परिवहन सेवेचे पालकतत्व आपण आहात आणि पालकवर्ग ह्यांचे वरदहस्ते परिवहन सेवेवर असावे यासाठी श्री. जयंत दादा पाटील आणि सहकारी यांनी शेर बोलायला सांगितलेला पालक ह्यांचे

वरदहस्त असावे म्हणून ''सर पे सायबान है अब भी, पर अपना तुटा मकान है, अभी वक्त मे पडकर कटे नही लेकीन अपनी उँची उडान है अब भी'' एवढे बोलून मी माझे शब्द संपवितो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी दिलेल्या बजेटवर सविस्तर चर्चा घडवून आणावी.

**रिटा शाहा:-**

मा. महापौर मॅडम, आपल्यासमोर बजेट पहिल्यांदा तर आयुक्त आणि स्थायी समिती अध्यक्ष व महापौर मॅडम, उपमहापौर साहेब व परिवहन समितीचे अध्यक्ष आपण जो बजेट आमच्यासमोर ठेवला आहे तो माझ्या हिशोबाने खूप चांगला बजेट आहे. मला फुगावा वाटतो जाणूनबुजून वाढवून बजेट पेश करायचा हे कुठे काय दिसत नाही. खूप चांगल्या रितीने आणि चांगल्या पद्धतीने ह्या बजेटची स्टडी केली गेलेली आहे पण त्याच्यामध्ये काही अनावश्यक खर्च आहे ते मी आपल्यासमोर मांडणार ाअहे. त्याच्या अगोदर आपण आमच्याकडे ऑडीट रिपोर्ट पाठवला आहे. त्याच्यावर थोडीशी चर्चा करायला आम्हाला संधी दयायला पाहिजे. त्याच्यामध्ये मुख्यत्वने कर विभागामध्ये काही डिसीप्लीन राहिलेली नाही. कर आकारताना त्याच्यामध्ये जमिनी मालकीचे असे काही मुद्दे ऑडीटमध्ये काढलेले आहेत काही मुद्दयामध्ये जमिनीच्या कराराचे आपल्याकडे काही पुरावे नाही. तरीपण आकारणी अमुक माणसाच्या नावावर झालेली आहे ते ऑडीट प्वॉईंटमध्ये नमुद केलेले आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, त्याच्यामध्ये किती नाव ट्रान्सफर करुन घेतलेली आहेत. ज्यांचे रजिस्ट्रेशन सुद्धा आपल्या कार्यालयामध्ये जमा झालेले नाही आणि रजिस्ट्रेशनसुद्धा केलेले नाही असे ही मुद्दे कर आकारणीमध्ये केलेले आहेत. मुख्यत्वे त्याच्यामध्ये पावत्या रद्द केलेल्या आहेत. परंतु, ते रद्द कशासाठी आणि कशाप्रकारे केलेले आहे. त्याचाही कुठे पाठपुरावा नाही तोही एक ऑडीट पॉईंट काढलेला होता जी आकारणी केलेली आहे. त्याच्यामध्ये कर निरीक्षक, उपायुक्त वगैरे ह्यांच्या सध्या पाहिजे, रिपोर्ट पाहिजे, काही प्रकरणांमध्ये ऑडीट पॉईट काढलेला आहे. उपायुक्त आणि कर निरीक्षकांची त्याच्यावर सही नाही. ऑडीट रिपोर्ट जो सादर करणार आहे. त्यांची स्वाक्षरी नाही असे कर विभागामध्ये ऑडीट पॉईंट काढलेले आहेत. साहेब, त्याच्यावर आपण मला नक्की उत्तर देणार. आपण बँकेत ज्या ठेवी ठेवलेल्या आहेत त्याच्यामध्ये आपले कॅश बुक आणि बँकेमध्ये नक्की किती रक्कम आहे त्याचा डिफरन्स सुद्धा दिलेला आहे. एखादयावेळी कॅश बुकमध्ये आपली एन्ट्री करायची राहिली आपल्याला समजून येते. परंतु, आपल्या कॅश बुकमध्ये कमी एन्ट्री दिसते आणि बँकेमध्ये जास्त दिसते. परंतु, बँकेत जास्त आणि कॅशबुकमध्ये कमी असेही कमी दिसते मग त्या तफावतीचे काय? पान क्र. ४२ वर मी आपल्याला बोलली की कर आकारणीबद्दल मालकाचे कुठले कागदपत्रच सादर केलेले नव्हते. पण कर आकारणी त्याच्या नावावर झालेली आहे. पान क्र. ११३ जकातीमध्ये त्यांचा डिफरन्स आपल्या मनपामध्ये जमा करणे बाकी आहे आणि आपण लिहिले आहे की, ते आपल्या आवकचे एक साधन आहे आणि ते पैसे आपल्या तिजोरीत जमा झालेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

हा जो लेखापरिक्षण अहवाल आहे. यामध्ये ज्या ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्या त्रुटी पुर्ततेसाठी संबंधित डिपार्टमेंटला पाठवत असतो आणि ह्या त्रुटी आहेत ते असे का झालेले आहेत या संबंधित सर्व डिपार्टमेंटला अहवाल पाठवलेला आहे आणि त्याची पुर्तता करुन स्थायी समितीमध्ये त्याची मान्यता घेतली जाणार आहे. या त्रुटी लेखापरिक्षण अहवालामध्ये काढलेल्या आहेत.

**रिटा शाहा:-**

मा. उपमहापौर साहेब, मला ही समजते की, त्या त्रुटी काढलेल्या आहेत. परंतु, ह्याच्यामध्ये ह्या त्रुटी वर्षानुवर्षे अशाच आहेत तो आपला अहवाल दाखवतो. मग ह्या अधिकाऱ्याला किती वर्ष दयायचे तेही आपण क्लिअर करा. नंतर ते स्थायी समितीमध्ये आणा. किती वर्षे आपण त्यांना सुट दयायची? किती अधिकाऱ्यांच्या नावावर अग्रीम रक्कम आहे. तेही ऑडीट पॉईंटमध्ये आपण काढत आहात. ते पैसे कुठे वापरले, कोणी घेतले, कुठे जमा केले त्याचा हिशोब नाही. आरोग्य विभागासाठी घनकचरा प्रकल्पासाठी आपण ३७ लाख रुपये अग्रीम दिलेले आहे ते कशासाठी दिलेले आहे आणि ३७ लाख रुपये अग्रीम दिल्यानंतर त्यांना किती वर्ष झाले आणि ते कुठे वापरले कसे वापरले त्याचा ही ऑडीट पॉईंट काढलेला आहे. मी प्रशासनावर कुठलाही आरोप करत नाही. आपण कुठे चुकतोस. कुठे थापतो आणि कुठे आपण राहतो. परंतु, त्याचा आढावा घेणे हे नगरसेवक म्हणून माझा अधिकार आहे म्हणून मी विचारत आहे की, हे जेवढे ऑडीट पॉईंट आपण काढलेले आहेत त्याच्यामध्ये मुख्यत्वे आपले मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या तिजोरीत ती रक्कम असायला पाहिजे. त्या पैशांचा हिशोब कसे मिळत नाही म्हणून तो ऑडीट पॉईंट निघालेला आहे. मग ते किती वर्षे त्या अधिकाऱ्याला दयायचे. कारण किती अधिकाऱ्यांच्या नावावर किती अग्रीम रक्कम आहे. त्यांनी काही ना काही कामांसाठी त्यांनी अग्रीम रक्कम घेतलेली आहे. त्याचा पाठपुरावा केलेला नाही ते पैसे कशासाठी घेतले, कुठे वापरले आणि किती शिल्लक राहिले आणि किती जास्त खर्च झाला तेही त्यांनी दिले नाही. साहेब त्यांचा आढावा घ्या.

**श्रीकांत मोरे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, लेखापरिक्षण अहवाल हा सर्व विभागामध्ये त्यांच्या पुर्ततेसाठी पाठविण्यात आलेले आहे आणि त्याची पुर्तता करुन स्थायी समितीपुढे त्याचा अहवाल सादर करण्यांत येणार आहे आणि त्यांना १ मे ची मुदत दिलेली आहे.

**रिटा शाहाः-**

साहेब, या अहवालाला किती वर्षे झाले आहेत. पहिल्यांदा जेव्हा मी स्थायी समितीमध्ये होती तेव्हा सदर अहवाल सादर झाला होता. परंतु, त्याच्यावर पुढच्या मिटींगमध्ये चर्चा करु असे ठरले होते. माझी दोन वर्षाची मुदत संपली पण त्याच्यावर पुढची मिटींग आलीच नाही. आपण त्यांना किती मुदत दयायची आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अध्यक्ष महोदय, बजेट के संबंध मे २००७-०८ का अंदाजित बजेट आज पेश किया गया। शहर के लिए श्री. स्टिवन मेंडोसा की तरफ से मैं एक शेर बोल दूँ।

''माना के चमन को गुलजार ना कर सके
यहाक्या कम है कुछ खार कम लिए''

इस साल का बजेट पाच साल के बजेट से थोडासा कुछ अलग है। किसी भी मर्ज मे किसी भी तरह का टॅक्स ना बढाते हूए पब्लिकपर अधिक भार न डालते हूए पिछले साल का जो बजेट था उससे थोडी शिक्षा प्राप्त करके सही ढंग से अंदाजित बजेट बनाया गया है। लेकिन दुःख की बात यहाहै की साथ मे इतना बडा अहवाल यहाकार्यकारणीका यहाअपने काम करनेवाले अधिकारीयों के कमियोका पुरा लेखाजोखा अहवाल दे दिया है। अधिकारी गण क्या करते है इस तरहाका प्रश्न जो सन्मा. सदस्याजींने पुछा मुझे लगता है, ५-७ साल से लगातार चलता हुआ यहासबकुछ आ रहा है। शहर को या नगरपालिका को चलानेके लिए चार सक्षम अधिकारी होते है। सिग्नेटरी मा. आयुक्त होते है। लेखा पास करनेके लिए लेखाधिकारी होते है काम करनेके लिए सिटी इंजिनियर होता है सारे काम होते है काम करनेके लिए सिटी इंजिनियर होता है सारे काम का एक्झीबिशन करनेके लिए सेक्रेटरी होते है लेकिन चारोंने अपनी जिम्मेदारीया इस तरहासे निभाई है यहापुरा अहवाल सभी नगरसेवकोको मिला है। इसमें कोई भी चीज क्वेरी किसी भी तरहासे नही दी है साडे आठ करोड का नुकसान पहले दो पन्नोपर ही दे दिया गया है। और हरी झंडी दे दी गई के बजेट आगे बढा दिया जाए। आयुक्त महोदय में पुछना चाहूँगा की साडे चार करोड मे क्या अधिकारी सक्षम नही है। चार करोड १५ लाख रुपये टाउन प्लॅनिंग से क्या हुआ है। सारे दिन अधिकारी गण, सारा केबिन बिल्डरोंसे भरा रहता है। ४ करोड १५ लाख रुपया क्यों वसूल नही किया गया क्या। इसका जवाब स्टेजपर दे सकते है क्या? अतिक्रमण विभाग मे ४ लाख १५ हजार रुपये क्यों नही वसूल किया गया? दो पन्नों मे ही आपका ९ करोड रुपया का यहा डेप्रीशिएट है अगर हम पब्लिक के भले के लिए ४ लाख रुपये टॅक्स कम करनेकी बात करते है आपकी गलती को तो हंगामा मच जाता है। हमारे फाईल मे हमने जो सॅक्शन कराया था ३१ मार्च लास्ट दिन वहाअभी तक अधिकारीयोंने एक भी फाईल नही करके दी है। देड सौ फाईल पडी है। ४ लाख रुपये के लिए इतना हंगामा ९ करोड रुपए, टाउन प्लॅनिंग क्या करता है? सारे दिन मॅन्यूप्यूलेशन होता है आयुक्त महोदय, आपके कार्यकाल मे क्या किया? कौनसी नयी चिज आपने की? बताईए ना, ९ करोड रुपये पहले पन्ने पर अहवाल दिया है कमसे कम हमारे हाथ मे क्यों दिया है हमलोग को कुछ जानने का भी अधिकार है। अधिकारीयो को जो लोन या पैसा दिया गया है उनको इनक्रीमेंट दिए चार साल से लगातार अहवाल हमारे घर मे आता है। हमलोगों को बोलनेका भी अधिकार नही है पुछनेका भी अधिकार नही है क्या की, उनको यहापैसा क्यो दिया गया? कर विभाग में सारे एरिया से कही ना कही कमी है यहा पर रिसीटो पर सिग्नेचर नही है या पैसा सही जमा नही है इसमें अनियमितता है क्या करते है अपने लोग? क्या हमलोग आपसके लढाई मे यहाभूल जाते है। अरे आप लोग कम से कम जवाब दे दिजिए। साडे चारसो करोड टाउन प्लॅनिंग से क्यो नही वसूल हुआ पिछले साल जो पैसा दिया था उसमें से आठसो करोड रुपए वसूल हूए और बाकी के चारसौ करोड क्यों नही वसूल हूआ। क्या कमी है शहर मे विकास नही हो रहा है शहर मे गगनचुंबी इमारते नही बन रही है डेली टॉवर बन रहे है डेली २५ आर्किटेक्ट यहा के केबिन मे बैठे रहते है। डेली महानगरपालिका मे ४.०० से ७.०० बजे तक आते है। आप लोगों के एन्टी चेंबर भरे रहते है।

**मिलन पाटील :-**

मॅडम, त्यांना खाली बसवा. ते काय बोलत आहे ते समजतच नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप बराबर समजते है। जहा इस शहर के भलाई की बात की है वहा यहा अहवाल क्यो दिया है। एकतरफ बजेट इतना सुंदर बना दिया और इतना अच्छा इसको फुलाया नही गया और बजेट बनाके दिया। मैं कहूँगा इतने तारीफ का काम किया के ऐसे नए लोगोकी जितनी तारीफ की जाए उतनी कम है। इतना बडा १३० पन्नों का अहवाल है उसपर दो पन्ने का उत्तर दिजीए एक अधिकारी को खडा किजीए। टी.पी.को बुलाईए उसने क्या किया ४ करोड १५ लाख रुपये क्यो नही वसूल किया। अंदाजित ५० लाख रुपया का होता है तो ५० लाख रुपया नही वसूल किया। यहा४ करोड १५ लाख रुपया न वसूल होना अभी हम किसी एक मत को ले, नगरसेवक निधी आपने बढाया अच्छी बात है। नगरसेवकों को आपने एरिया मे काम करनेके लिए सवलत मिलेगी। लेकिन प्रभाग समिती का जो बजेट है वहाएकदम कम कर दिया आयुक्त महोदय को

नही लगा, आयुक्त महोदय को लगाके बांधकाम डिपार्टमेंट मे ८०० करोड रुपए दिया जाए। प्रभाग समिती को जरुरत नही है ५० लाख रुपये बहूत हो गए। आपको कभी ना कभी बाटना पडेगा। स्थायी समिती के पास आपके प्रोव्हीजन मे प्रभाग समितीका सबसे ज्यादा ताकदवर होती है। लेकिन आपने यहा सोचा ही नही। उनका कोई पैसा नही बचा। आपके प्रोव्हीजन मे देखिए की नेक्स टू स्थायी समिती क्या है? प्रभाग समितीया, पर आपने प्रभाग समिती को कोई भी अधिकार नही दिया जो अधिकार ग्यारहा सौ करोड था वहा आज घटाके ४०० कर दिया है। कौनसी तक है बताईए आयुक्त महोदयने अपना आशय दिया ४०० करोड का, उसने स्थायी समितीने थोडासा बढाके ६०० कर दिया यहा तक सही है। कम से कम एक हजार करोड रखीए। दो दो सो करोड मिलना चाहिए। अपने यहा बांधकाम कमिटीमे इतने लोग होशियार है की, उन्होने प्रभाग समितीयो को २० लाख रूपये दिया। २ करोड मिला हुआ पैसा ७० लाख रू किऐ। शिकायत करने पर इधर से उधर बढाने की बात की अभी तक १ करोड रूपये जो २५-२५ लाख रूपये समितीयो को दिया था अभी तक बढाके नही दिया। यहातो कार्य करने का तरीका है और हम किस तरहासे बोले की हमारे यहा पुरी तरहासे हमारे आयुक्त महोदय सक्षम है। हमारे पुरे सिटी इंजिनियर सक्षम है। इंजिनियर बारा बारा रखे हुए है वहासक्षम है। मेरा कहने का मतलब है की बजेट इन टोटल पब्लिक मे उपर बिल्कुल भार नही है लेकीन भार हम नगरसेवको के उपर है इतना बडा अहवाल अगर आप पुछ सकते है तो पुछिए मैने जो दो कोटी का उत्तर पुछा वहादिलाईए। ४ करोड १५ लाख रूपये क्यो नही वसुल किया क्या टाउन प्लानिंग सक्षम नही है क्या? टाउन प्लानिंग मे कहा कमी है डेव्हलपमेंट चार्ज क्यो नही वसुल किया जाता है। क्यो उनको परमिशन दी जा रही है। साडे तीन सौ नक्शे पास कर के दिए जा रहे है वहाक्यो दिए जा रहे है। क्या ४ बजेसे लेकर ७ बजे तक काम होता है। सारे दिन मे कोई टाउन प्लानर नही मिलता। कभी पुछा गया है की यहाआक्षेप जनता का क्यो है। क्या इसे भी उल्हासनगर बनने की तरफ हम बढ रहे है। आयुक्त साहब आप तो चले जायेंगे क्यो की आपका पिरियड खत्म हो जाएगा। यहाशहर सारी परेशानिया भोगेगा मेरे कहनेका मतलब है की, आज इस तरहाजो बजेट की शुरूवात हुई है। काफी तारीफ के काबील है जनता को तकलिफ नही है उनके उपर टॅक्स नही है लेकीन यहाजो तकलिफ है यहाअहवाल दिया है १३० पन्ने का मुझे लगता है की लेखाधिकारी महोदय हरी झंडी इतने जल्दी नही देना चाहिए था। इनमे से आप कुछ तो पुछीए। कहा कमीया है। कहा सिग्नेचर क्यो नही किया गया पैसा कहा जमा किया लेकीन कुछ पुछा नही गया सिर्फ अहवाल हम लोगो के हाथ मे दे दिया गया। हम लोग भी ले जाकर सीधे बस्ते मे बॅग मे डाल देंगे। आपके यहा से जवाब नही आने वाला है। आपके यहा से कोई भी सक्षम अधिकारी खडा होके जवाब दे की, इसमे कितने करोड रुपये का घाटा है। अतिक्रमण विभाग ४२५००/- रू. का कोई भी वसुली ६ साल से नही हुआ। मेरा कहने का मतलब है की मै नही चाहता क्योंकी, हम लोगो का आखरी वर्ष है पाँच साल मे हमने सबसे अच्छा बजेट दिया पब्लिक आप सबलोग जायेंगे तो आप सबकी तारीफ होगी लेकीन यहाजो पब्लिक से पैसा वसुल किया वहाकहाँ डाला तो इसका जवाब कोई ना कोई मांगेगा। और आपको जवाब देना पडेगा और मेरा कहना है की सबसे बडा गुन्हेगार टाउन प्लानिंग है। जैसे ४२५ रू. वसुल करके उसकी इसमे जराभी मेन्शन नही किया। बजेट जो है वहासुंदर बजेट है लेकीन साथ मे यहाजो अहवाल कलंक लगा है वहास्टाफ के उपर है। यहानगरसेवको के उपर नही है। इसलिए नगरसेवक जिम्मेदार नही है। तो अधिकारी लोग पुरी तरहासे जिम्मेदार है। अधिकारी लोगोने इसमे जो कुछ कमिया कि है जो कुछ भी उलटा सिधा किया है तो अधिकारीयो की जिम्मेदारी है। नगरसेवक इसमे कही भी जिम्मेदार नही है। धन्यवाद।

**रिटा शाहाः-**

मा. महापौर मॅडम, माझा एकच प्रश्न होता की आणि आता मोरे साहेबांनी सांगितले की, एक महिन्यांची मुदत दिलेली आहे. आणि मोरे साहेब मी आपल्याला सांगु इच्छिते की आणि तुम्हाला ही माहित असेल की, एक महिन्याची मुदत संपलेली आहे. त्याच्याही पलिकडे जावून साहेब मी सांगते महानगरपालिका तिजोरीत पैसे वगैरे वाढवण्यासाठी बजेट पेश करतो आणि आपल्याकडे पैसे आले तरच आपण विकासाची कामे करू शकतो पण आपण पाणी विभागचा अहवाल बघा त्याच्यामध्ये किती बिल्डींगला कनेक्शन लागलेली आहे. परंतु, बिल अजुन पाठविलेली नाही. मग किती वर्षापासुन पाठविलेली नाहीत. किंवा किती महिन्यापासुन नाही पाठविली तो ही महत्वाचा एक मुद्दा आहे आणि साहेब, त्याच्यावर लक्ष द्यायची गरज आहे आणि साहेब, महत्वाचा मुद्दा म्हणजे आपण गेल्यावेळी कर विभागामध्ये आपण लोकांना रिबेट दिले. रिबेट आपण त्यासाठी दिले की, आपला जो स्तर आहे त्याच्या हिशोबाने वसुली वाढणार आहे. परंतु, आपल्या वसुलीचा स्तर काहिही वाढलेला नाही. आणि आपण लोकांना रिबेट दिले तर आपल्या महानगरपालिकेला नुकसान झालेले आहे. साहेब, या विषयाचे परसेंटेज झालेले नाही. ज्या हिशोबाने परसेंटज व्हायला पाहिजे कारण साहेब, त्याच्यामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे की, रिबेट पैसे आपण लोकांना दिले त्यापेक्षा आपला जो अधिकारी अधिकारी आहे जे आपले कामगार आहे त्याच्यासाठी आपण काहीतरी करा आणि त्यांच्यावर कंपल्सरी काहीतरी कारवाई करा आपण प्रोत्साहन करणार तर कारवाई ही करायला पाहिजे. की, एवढी टक्केवारी वसुल केली नाही. तर तुमच्या पगारातुन एवढे टक्के कमी करणार नाहीतर एवढे एवढे वाढवून देणार ते रिबेट त्यांना द्यावा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या तिजोरित ते पैसे येणार.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महासभा ने प्रभाग समितीला चारसो करोड रूपये दिखाया गया है। तो वहामा. महासभा के अंदाज मे प्रभाग समिती के लिए ८०० करोड रूपये होना चाहिए। क्योंकी पिछली बार ११०० करोड रू. था। इसवक्त कमसे कम ८०० करोड रूपये होना चाहिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आज या सभागृहामध्ये बजेट सादर केल्यानंतर आम्हाला असे वाटत होते की, आमचे गटनेते त्या स्थायी मध्ये होते आणि त्यांची मंजुरी दिल्यानंतर तुमच्या गटनेत्यांनी मंजुरी दिली. पण सत्ताधारी पक्षानेच चांगली सुरूवात केलेली आहे. म्हणून आम्हाला आनंद वाटतो की, या बजेटवर चांगली चर्चा घडवून आपण त्याच्यात काहीतरी साध्य करू. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या लेखा परिक्षण अहवाला बद्दल आपली चर्चा झाली त्या लेखापरिक्षण अहवालाबद्दल मी तीनदा लक्षवेधी आणली होती. तीनवेळा लक्षवेधी आणल्यानंतर त्यावेळेचे अधिकाऱ्यांनी सभागृहात असे आश्वासन दिले होते की, दोन महिन्यामध्ये आम्ही या लेखापरिक्षणाचा अहवाल सभागृहामध्ये आणू पण ते अधिकारीही गेले. लेखा परिक्षणाचा अहवाल आला नाही. मी बनसोडे साहेबांना धन्यवाद देतो. आणि ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांना येवून येथे तीन ते पाच महिने झाले आहेत. पाच महिन्यामध्ये लेखा परिक्षणाचा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे आणि ह्याच्यासाठी पण धन्यवाद देतो की, स्थायी समितीने लेखा परिक्षणेच्या अहवालावरती जे जे आरोप पत्र ठेवले त्या आरोप पत्राची तुम्ही शहानिशा केल्या नंतर पुन्हा स्थायी समितीमध्ये आणा त्यानंतर आम्ही चर्चा करू ही एक चांगली गोष्ट आहे ती स्थायी समितीने घडवून आणलेली आहे. म्हणून या लेखा परिक्षणावरती कुठली चर्चा स्थायी समितीमध्ये झालेली नाही. आणि परस्पर फक्त दिशाभुल करण्यासाठी नगरसेवकांना हा लेखापरिक्षण अहवाल दिलेला आहे. हा लेखापरिक्षण अहवाल जर आपण बघितला यावेळी मा. स्थायी समितीच्या स्टँडीगमध्ये अनेक विद्वान नगरसेवक १५ - १५ वर्षे अनुभवलेले होते. आणि आता त्याच्यावर आरोप करणे काही हे अवमानाले जाणार आहे. पण आरोप करतेवेळी काही गोष्टी त्यांच्या निदर्षनास आणायला निघतात. त्यावेळी आपल्या लक्षात येणार आहे की, आपण या शहराच्या नागरिकांवर अन्याय करित आहोत. म्हणजे ते अधिकाऱ्यांनी दिलेले फिगर आपण मान्य करतो आपण या शहराच्या नागरिकांवर अन्याय करतो हे जाणून घेण्याचे प्रयत्न या स्थायी समितीच्या कोणत्याही सभासदांनी घेतलेले नाही. मा. महापौर मॅडम, मी आणखीन दोन चार मुद्यांवर बोलणार आहे आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मालमत्ता कर आता लेखापरिक्षकांनी त्याच्यावर काय चर्चा केलेली आहे? काय आरोप केलेले आहे? त्यांनी रजिस्ट्रेशन केलेले नाही म्हणून त्यांनी पैसे घेतले शेवटी पैसे घेतले ना. ऑडीटर साहेब, आपणच दिलेले आहे बघा आणि आमची सुचना काय असेल ती मान्य करा. स्थायी समिती जेव्हा हा अहवाल आपल्याकडे आलेला आहे आणि ह्याच्या आधी हा लेखा परिक्षणाचा अहवाल नक्की स्थायी समितीकडे आला असेल, पण बहुतेक लोकांनी त्यांचे गांभीर्य घेतलेले नाही यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट मिरा भाईंदरमध्ये मालमत्ता कर मा. आयुक्त साहेब, मालमत्ता कराबद्दल आपण जे आकडे दिलेले आहेत. मागच्या तीन वर्षाचे, म्हणजे २००३-०४ मध्ये तुम्ही २६ कोटी रु. उत्पन्न दाखवलेले आहे. २००४-०५ मध्ये २४ कोटी दाखवले. म्हणजे २ कोटी रु. ने आपण खाली आलो आणि २००५-०६ मध्ये २४ कोटी रु. म्हणजे २००३-०४ मध्ये आपण पुन्हा त्या आकड्यावर आलेलो आहोत आणि आता २००६-०७ यामध्ये मा. आयुक्त साहेब, ४० कोटी रु. मालमत्ता कराच्या माध्यमातून ते मिळणार आहेत. आपण बजेट सादर करताना आठ महिन्यामध्ये रजिस्ट्रेशन दिलेले आहे. त्यामध्ये अंदाजे १६ कोटी रु. वसुल झाले असे सांगितलेले आहे. ४० कोटी रु. पैकी १६ कोटी रु. आणि आज १५ मार्च आहे. म्हणजे फक्त १५ दिवस राहिलेले आहेत. इकडे जर अधिकारी उपस्थित असतील तर हे बजेट सादर केल्यानंतर डिसेंबर ते १५ मार्च किंवा १० जर तुमच्याकडे आकडे नसतील. या अडीच महिन्याच्या कारकीर्दीमध्ये या घरपट्टीमध्ये किती वाढ झालेली आहे. याचा आपण जर उल्लेख करावा. मा. आयुक्त साहेब, ४ महिन्यामध्ये किती वसुली झालेली आहे? सक्षम अधिकारी या सभागृहामध्ये कर अधिकारी असेल त्यांनी आपल्याला आकडा सांगावा. कारण हा आकडा आपल्याकडे कम्प्युटरराईज आहे. आपण हे जे आकडे दिलेले आहेत ते १६ कोटी अधिक २४ कोटी राहिले. ३ महिने या ८ महिन्यामध्ये जे अधिकारी १६ कोटी रु. वसुल करतात ते ४ ममहिन्यामध्ये किती रक्कम गोळा करतील? कारण आपण ४० कोटी हा अंदाज दिलेला आहे. जर १६ कोटी रुपये ८ महिन्यामध्ये वसुल होतात तर मागच्या ४ महिन्यामध्ये आपण काय अपेक्षित धराल. आपण जो ३७ कोटी रुपयाचा बजेट दिलेला आहे व मालमत्ता करातून उत्पन्न दाखवलेले आहे. आमच्या माहितीप्रमाणे जर १६ कोटी रुपये ८ महिन्यामध्ये होतात तर ४ महिन्यामध्ये अधिकारी ४ ते ५ कोटी रुपये तुम्ही वसुल करु शकत असाल म्हणून मी तुम्हाला विचारतो. कारण हे बजेट आहे. आपण मार्च महिन्याच्या सभेकरिता बसलेलो आहोत. तुमच्याकडे आकडे आले असतील पण दिलेले आकडे सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर लोक विसरुन जातात आणि त्याच्या मागचे काय आहे ते का वसुल झाले नाही याचे आपण कधी गांभीर्य होत नाही म्हणून आपण हे जे १६ कोटी रुपये दाखवलेले आहे आणि या ४ महिन्यामध्ये किती झालेले आहे याचे उत्तर आपण आपल्या भाषणामध्ये द्या. ते लोकांना कळू द्या की, आपले अधिकारी किती सक्षम आहेत, किती काम करतात? मालमत्ता कर हे मोठे उत्पन्नाचे साधन आहे. ऑक्ट्राय गेल्यानंतर मालमत्ता कर. मा. महापौर मॅडम या लेखा परिक्षणाच्या अहवालामध्ये तर काहीच दिलेले नाही. आपण आता जे उत्पन्न दाखवलेले आहे ते साडे सडतीस कोटीची ४० कोटी रुपयाची वाढ दाखवली

म्हणजे आपण अडीच कोटी रुपयाची वाढ दाखवलेली आहे. अडीच कोटी रुपये जर आजच्या मालमत्ता कराची आकारणी एका फ्लॅटमागे चार ते पाच हजार रुपये आपण गृहीत धरु. आजच्या रेटप्रमाणे तर फक्त साडेचार हजार सदनिका या शहरामध्ये वाढणार आहेत. म्हणजे एवढे बांधकाम चालू असताना फक्त साडेचार हजार सदनिका या शहरामध्ये वाढणार आहेत म्हणजे ह्याचा अर्थ आपण कुठेही ह्याची शहानिशा करत नाही. मला आठवण आहे श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असताना त्यांना सर्व प्रॉपर्टीचा पुन्हा सर्व्हे करायला लावला आणि त्यावेळी काही वाढ झाली होती. आज या मालमत्ता करामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. मालमत्ता कर १०१ टक्के वाढणार आहे. पण त्याची खबरदारी आपल्या अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे. ही महासभा आहे आणि आम्ही सर्व नगरसेवक येथे बसलेलो आहोत. तुम्ही आणलेले पैसे खर्च करायचे आहे त्याची कुठे चांगली सोय देवू शकतो. पण अधिकाऱ्यांनी जर पैसे आणले नाही आणि ठेकेदार फिरतात व पैसे नाही म्हणून काम करत नाही. ही पाळी या महानगरपालिकेवर येउ नये. म्हणून मालमत्ता कराबद्दल आपण क्लिअर करावे आणि सर्वात महत्वाची गोष्ट आत्ताच पुणे महानगरपालिकेने एक नविन सर्व्हे केलेला आहे. मी परवा वर्तमानपत्रामध्ये वाचले होते. त्याच्यामध्ये बायलॉजीकल इंट्रा सिस्टम, म्हणजे त्या सिस्टममध्ये अशी व्यवस्था आहे की, आपण महापालिकेमध्ये ती प्रथा वापरली आणि पुणे महापालिका ही पहिली महापालिका आहे. त्यांनी ही सिस्टम वापरल्यानंतर संपूर्ण पुणे महापालिकेची जेवढी मालमत्ता आहेत्याचा लेखा त्यांच्याकडे आलेला आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढलेले आहे. जो पूणे महापालिकेचा प्रोग्राम आहे तो आपल्या महापालिकेने करावा आणि त्यामध्ये जो काही खर्च अपेक्षित असेल त्याची आर्थिक बजेटमध्ये तुम्ही तशी तरतुद करावी असे माझे पहिले निवेदन आहे. मा. महापौर मॅडम, आपण सी.एफ.सी. बांधली. अडीच कोटी रुपयाचा खर्च दाखवला. त्यानंतर अनेक खर्च दाखविले. अनेक कम्प्युटर आले. अनेक अधिकारी भरती केले. आजही ह्या बजेटमध्ये दिड कोटी रुपये या सी.एफ.सी. करीता दिलेले आहे. पण सी.एफ.सी. कडे जर तुम्ही लक्ष दिले. यात स्वतः ऑडीटरने आक्षेप घेतलेला आहे. लोकांनी पैसे भरलेले आहे. सहा महिने आधी पैसे भरलेले आहेत. एक वर्ष आधी पैसे भरलेले आहेत. पण आपल्या सी.एफ.सी. मध्ये त्याचा रेकॉर्ड होत नाही आणि त्यांना पुन्हा नोटीस जाते की, तुम्ही पैसे भरले नाही. तुम्ही पैसे भरा. तुमची जप्ती करु. तुमचे नळ कनेक्शन कापू. माझ्याकडे तीन पत्र आहे. त्या सोसायटीचे साडे तीन लाख रुपये एक रक्कमी मी आणून दिलेले आहे. एक रक्कमी, एक चेक. त्या सोसायटीला चार महिन्यानंतर पत्र जाते की, तुम्ही पैसे भरा नाहीतर तुमचे कनेक्शन कापून टाकणार. मी अधिकाऱ्यांकडे गेलो तेव्हा त्यांना त्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली. तुम्ही लोकांना नोटीस पाठवतात की, जर आपण टॅक्स भरले असेल तर ही नोटीस रद्द करावी. कानफटावर मारायचे आणि सांगायचे की, चुकी झाली. महापालिकेने आपल्या यानागरीकांचा अशाप्रकारे छळ करु नये. या सी.एफ.सी. मध्ये आपण दिड कोटी रुपयाची तरतुद केलेली आहे. त्यावर योग्य ती उपाययोजना करा. फक्त पैसे द्या, अधिकारी बसवा आणि जर कोणाला काम करायचे नसेल तर या महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी वाट लावायला घेउ नका. आम्ही या शहरामध्ये जगणार आहोत. काही अधिकारी आले व काही अधिकारी गेले आणि असे येणार व जाणार. पण शेवटी या घरातला नागरीक या शहरामध्ये राहणार आहे म्हणून त्याच्यावर आपण अन्याय करु नका अशी आमची आपल्याला सर्वात कळकळीची विनंती आहे. मालमत्ता कराबद्दल आपण गांभीर्याने या स्थायी समितीचे जे सदस्य होते त्यांनी पुन्हा त्याच्यावर विचार करुन मा. महापौरांना, मा. आयुक्त साहेबांना सांगावे की, ह्या मालमत्ता करामुळे किमान ५० कोटी ही अपेक्षित रक्कम गेली पाहिजे. हा बजेट चांगला असेल, काही सभासद चांगले असले व सत्ताधारी पक्ष जरी चांगला असेल. पण शहरासाठी हे चांगले नाही. ही गांर्भीयाची बाब आहे. दुसरी गोष्ट, आपण जे जे विषय महासभेत घेतले त्या विषयावरच बोलणार आहे. भुईभाडा - आमच्या ऑडीटरने आक्षेप लावलेला आहे. या शहरामध्ये स्वतःची, महापालिकेची किती मालमत्ता आहे? त्याचाही तुमच्याकडे रेकॉर्ड नाही. भुईभाड्याबद्दल या महासभेने मागच्या पाच वर्षामध्ये तीन लक्षवेधी आणली होती. पहिल्या लक्षवेधीमध्ये श्री. आर. डी. शिंदे साहेब असताना त्यांनी धन्यवाद केले होते की, आपण मालमत्तेबद्दल महापालिकेला जाणीव करुन दिली आहे. त्यानंतर त्या भुईभाड्यामध्ये वाढ केली गेली आणि त्या प्रॉपर्टीची छाननी केली गेली. ११५ गाळेधारक आपल्याला मिळाले. त्यांना नोटीसा पाठविल्या. ८००/- रु. मटणाच्या दुकानांना आणि सामान्य नागरीकांना ५००/- रु. त्याच्यात काही चुक नव्हती. एक सामान्य माणूस जेव्हा रस्त्यावर बसतो तो रोजचे ३०/- रु. देतो आणि जो महापालिकेची वास्तु वापरतो. तिथे पाणी आहे, लाईट आहे. त्याला जर ५००/- व ८००/- रु. लावले तर जास्त काहीच होत नाही. पण त्याच्यामध्येही आरोप केले गेले आणि ते रेट कमी केले. रेट कमी केल्यानंतरही पुन्हा वसुली झाली नाही. आज जर आपण हा आकडा बघितला तर महापालिकेच्या आणि मागच्या मा. महासभेमध्ये याचा कर अधिकाऱ्यांनी सांगितले की, फक्त ४० हजारांची वसुली आहे. म्हणजे महापालिकेचा पैसा वसुल करण्याची क्षमता या अधिकाऱ्यांमध्ये नाही. तर या शहराचा विकास होत आहे हे आपण कसे काय समजायचे? तुम्हाला तुमच्या मालमत्तेबद्दल माहिती नाही. तुम्हाला तुमची वसुली माहित नाही. आपण कोणाकडून मागत आहोत त्याची माहिती नाही. म्हणजे शेवटी अधिकाऱ्यांनी काम करायचे की नाही हा प्रश्न उभा राहिलेला आहे. माझ्या लक्षात असे येते की, सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आता येथे नाही. सन्मा. सदस्य आसफि शेख ह्यांनी या सभागृहात असा शब्द वापरला होता की, .......

**महेंद्रसिंग चौहाण :-**

निवेदन यहाहै की, नगरसेवक जो भी बात कर रहे है वहासत्ताधारी की बात न करे। वहाअपना वक्तव्य दे। उनको जो वक्तव्य देना है वहादे। वहादुसरो की बात क्यों करते है? आप उदाहरण मत दिजीए। आपका काम हम लोगोंका विरोध ही करना है तो करिए लेकीन सत्ताधारी का नाम क्यों लेते हो? यहागलत है। इसपर मेरा आक्षेप है। मॅडम, सत्ताधारी का नाम लेने के लिए उन्हे आप सीधा ना बोलिए, अपनी बात बोले।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच सभागृहामध्ये सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी हे उद्‌गार काढलेले होते, जोपर्यंत या अधिकाऱ्यांची लेफ्ट राईट होत नाही, जोपर्यंत या महापालिकेच्या एका अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करत नाही. तोपर्यंत इथला साचा सुधारणार नाही. ही वेळ ह्या बजेटच्च्यावतीने येथे स्पष्ट होत आहे. हे आम्ही बोलत नाही ही दिलगिरी व्यक्त केली ती सत्ताधारी पक्षाने .........

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर एकदा बोलून झाल्यावर त्याच विषयावर पुन्हा सारखी सारखी चर्चा कशाला? सगळ्यांनी बोललेले आहे. तेच मुद्दे येथे रिपीट होत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या भुईभाड्याबद्दल आपले जे गाळे आहेत. आपले तलाठी ऑफिस, आपल्या महापालिकेच्या नगरभवनमध्ये तलाठी ऑफिस आहे. शासनाने आपल्याकडून पाच कोटी रुपये डायरेक्ट कापून घेतले. पण आपण तलाठीचे पैसे वसुल करु शकत नाही. म्हणजे शेवटी आपण फक्त उत्पन्न दाखविले हे ५० लाखाचे उत्पन्न भुईभाड्याचे होणार आहे, तर होणार कुठून आमचे असे म्हणणे आहे. कारण अधिकाऱ्यांना वसुली करण्याची क्षमता नाही आणि तसे त्यांच्या मनातही नाही की, आम्ही पैस वसुल करावेत आणि सर्वात महत्वाची गोष्ट या शहराला जो पैसा देत आहे, जो या शहराला काहीतरी देत आहे. त्याच्यावर अन्याय हा सत्ताधारी पक्ष करत आहे. सन्मा. सदस्यांनी ऐकून घेण्याची मनःस्थिती ठेवा. या शहरामध्ये जे फेरिवाले आहेत त्या फेरिवाल्यांमध्ये बहुतेक युनियन ह्यांचीच आहे. रोजचे पैसे देतात. नगरपालिकेच्या काळापासून आतापर्यंत या फेरिवाल्यांकडून या महापालिकेने कोट्यावधी रुपये म्हणजे अडीच कोटी रुपये आपण ह्यावर्षी दाखवलेले आहे. मागच्या वर्षी दोन कोटी, कोट्यावधी रुपये वसुल करुन दिले पण त्यांच्याकरिता मार्केट बांधण्याची क्षमता ह्यांच्यामध्ये आलेली नाही आणि अतिक्रमण हटवायला जातात. म्हणजे तुम्ही या शहराला काय दिले. आम्ही आरोप करणार नाही तर काय करणार? या शहरामध्ये सब्जी मार्केट नाही. आपण ऐवढे पैसे वसुल करुन सुध्दा त्यांना न्याय देवू शकलो नाही. तर आपण कशावरुन सांगता की, हा चांगला बजेट आहे. मा. महापौर मॅडम, जास्त बोलले की कळ लागते. पण आम्ही जे बोलतो ते सत्य बोलतो. सत्याशिवाय आम्ही बोलत नाही. या गोरगरिबांवर अन्याय करु नका. त्यांना न्याय मिळवून द्या. या फेरिवाल्यांना मार्केट द्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इन्हे शहरका विकास भी देखना नही आता। शहरमे क्या भला हो रहा है वहा देखना भी इन्हे नही आता। शहर का डेव्हलपमेन्ट हो रहा है, वहादेखना वहानही जानते। देखने के लिए इनकी आँखे नही है। भला देखनेका इनके पास काम नही है। अच्छा हो रहा है, वहादेखनेका दनके पास मन नही है। इन्हे सारी बुरी चीजे दिखाई देती है। इनको शहरमे क्या विकास हुआ है यहाअच्छाई नही दिखाई देती है। यहाएकही तरफसे देखते है।

**मा. उपमहापौर:-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण सभागृहला असे सांगितले की मी माझे वक्तव्य दोन मिनिटांमध्ये संपवतोय आणि माझ्या नंतरसन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल बोलणार आहेत. तुम्ही एवढे बोलता तर सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल हे केवढे बोलणार आहेत. त्यांना बोलायला काहीतरी ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचे काही मुद्दे आहेत. मा. महपौरमॅडम, या शहराच्या गोरगरीबांना न्याय मिळावा. जर विकास झाला असता तर सन्मा. नगरसेवकाला कोर्टात हॉस्पिटल बांधण्यासाठी जाण्याची पाळी आली नसती. या सभागृहतील सन्मा. नगरसेवकाला कोर्टात जावे लागते. ही शरमेची बाब आहे.

**महेंद्रसिंग चौहण :-**

मॅडम, आप उनको बताईए की, इस शहरमे हॉस्पिटल किधर नही है। बताईए कौनसी बिमारी है जिसका भाईंदरमे इलाज नही होता है। हरतरह का इलाज होता है। आप बोलनेके लिए लिमिट दिजीए। बोलनेवाले तो बहूत है। इन्हें बजेट के बारे मे बोलनेको कहा तो यह विकास के बारे मे बोल रहे है।

**मिलन पाटील :-**

हे एकदम उत्कृष्ठ बजेट आहे आणि हे आमच्या स्थायी समितीच्या अध्यक्षांनी मांडलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या कक्षामध्ये पत्रकारही बसलेले आहेत. जर मी या बजेटच्या विरुद्ध किंवा काही वेगळे बोललो असेल तर उद्या पत्रकारांनी माझा निषेध करावा आणि जर मी चांगले बोललो असेल तर पत्रकारांनी ही चांगले बोलावे लिहावे अशी मी विनंती करत आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महपौर मॅडम, यह परबोलनेकी कोई नियोगिता नही है। आप बजेट पर बोलिए ना।

**मा. उपमहापौरः-**

सर्व सदस्यांना विनंती आहे की, एका सदस्याने एका वेळेला बोलावे आणि दहा मिनिटामध्ये आपला विषय संपवावा. आपल्या समोर दोन-तीन विषय आहेत. त्यापैकी एक लेखापरिक्षण अहवाल, मा. लेखापरिक्षक श्री. सुरेश बनसोडे साहेब ह्यांचे आपण सर्व सभागृहाने अभिनंदन करायला पाहिजे आणि ह्याच्यामध्ये काही त्रुटी आहेत. त्याच्यावर सदस्यांनी आपली मत व्यक्त केलीच पाहिजे असे गरजेचे नाही. या ज्या त्रुटी आहेत ह्या संबंधित डिपार्टमेंटला त्यांनी त्याची पुर्तता करण्यासाठी कळविलेले आहे आणि याबाबत स्वतः लेखापरिक्षक श्री. सुरेश बनसोडे साहेबांनी देखिल सभागृहला निवेदन केले तर इतर सदस्यांना बोलण्याची आवश्यकता पडणार नाही. दुसरी गोष्ट आपण हे जे आजचे बजेट केलेले आहे. मा. रोहिदास पाटील साहेबांनी अनुमोदन दिलेले आहे आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण ज्या विषया वर बोलत आहत त्या सगळ्या विषयामध्ये अधिकाऱ्यांनी बसून चर्चा केलेली आहे. स्थायी समितीने चर्चा केलेली आहे. आपल्याला अशी विनंती आहे की, दहा मिनिटामध्ये जर आपण बोललात तर बऱ्याच सदस्यांना आपली मत व्यक्त करता येईल. ही मत व्यक्त करताना बजेटमध्ये कुठच्या प्रोव्हिजनसाठी, कुठच्या हेडखाली कुठला खर्च अधिक प्रमाणात पाहिजे, कमी प्रमाणात केला पाहिजे किंवा उत्पन्नाची नविन स्त्रोत आपल्याला कशाप्रकारे देता येईल या विषयी जर आपण बोललात तरअधिक चांगले हेईल. सत्ताधाऱ्यांनी काय केले आणि आम्ही कुठे कमी पडलो. आम्ही कुठे जास्त आहेत. आपल्याला वाटले की, आम्ही सत्ताधारी कमी पडलो तरत्या विषयात आपणही इंटरेस्ट घ्यावा तरजनता आपल्याला अधिक जोमाने मदत करेल. आपल्याला हे कोणत्या राजकीय हेतूनं बोलत नाही. प्रत्येक सदस्याला आपली मत व्यक्त करायची आहे हे मान्य आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हत्रे साहेब हे गेल्या अर्ध्या तासापासून हात वर करुन आहेत ह्याचे ही आपण भान ठेवा. इतरही सदस्य आहेत. आपण सकारात्मक दृष्टीने विचार करा. ह्याच्यामध्ये लपवणे - छपवण्या सारखे काही नाही. प्रत्येक गोष्ट आपल्या समोर प्रिंट आऊटने आणलेले आहे. त्याच्यामध्ये आपल्याला काय बोलता येईल. नविन सुचना काय करता येईल ह्याला अनुसरुन बोलावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी गेल्या ४५ मिनिटांपासून बोलत आहे तरमाझी आपणाला सभागृहच्या वतीने विनंती आहे की, पक्षानुसार प्रत्येक पक्षाला १० ते १५ मिनिटाचा अवधी द्यावा. त्या अवधीमध्ये त्यांनी त्यांचे जे मत असेल ते अंदाजपत्रका वरचे मत त्यांनी अभिप्राय मांडावा. बी.जे.पी.चे सदस्य सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी दोन तीन पक्षाचे निवेदन त्यांनी एकटयांनीच घेतले आहे. तरीसुद्धा त्यांना खाली बसण्याची विनंती करा.

(सभागृहात गोंधळ)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रतन पाटीलजी सभागृहमध्ये आपण बोलताना अजूनपर्यंत आयुक्त उठून गेलेले आहेत. अशी वेळ येऊ नये की, सदस्य उठून जातील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहासाठी दुदैवी बाब अशी आहे की, एकाच दिवशी एवढा महत्त्वाचा विषय असताना सचिवानी दोन सभा लावली आहे. ही चर्चा कशी व्हावी. चांगल्यापद्धतीने व्हायला पाहिजे पण दोन तीन तासाचा विषय ठेवला म्हणून ही पाळी आली आहे. तरी मी ह विषय संपवितोय. उपमहापौरसाहेब, वाढीव कुठे दाखवायची. कारण वाढीव नाही. म्हणून मौन धरायला लागते. वाढीव करा. नंतरआम्ही सुचना करु. श्री. सुमन शेखरसाहेबांनी पोल-खोल कार्यक्रम केला हेता. तो पोल-खोल कार्यक्रम या सभागृहमध्ये आणावा लागेल. या अधिकाऱ्याची पोल खोलाची लागेल. तेव्ह आम्ही सुचना करु.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरमॅडम, महनगरपालिकेतर्फे मा. स्थायी समिती, परिवहन समितीचे सन २००७-०८ चे मूळ अंदाज पत्रक सभागृहापुढे आज आणले. आयुक्तांनी आपल्याला सादर केले. जनतेला समजण्याकरिता आता हे आमच्या पुढे आणले आहे. माझी एक सुचना अशी होती की मघाशी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी बोलले, आपल्या बाजूच्या ठाणे महनगरपालिकेमध्ये दोन दोन दिवस बजेट या विषयावर सभा होते. सकाळी ११.०० ते सायं. ७.०० वा. पर्यंत आणि हा जो अर्थसंकल्प दिलेला आहे. या अर्थसंकल्पाला प्रशासन, स्थायी समिती, मी स्वतः स्थायी समितीमध्ये काम केलेले आहे. आम्हांला एक-एक आठवडा स्थायी समितीकरिता मिळायचा आणि अधिकारी तर तीन महिन्यापासून कामाला लागतात. परंतु, सदनापुढे हे जे बजेट शेवटच्या दिवशी येते. त्यादिवशी रात्र-रात्र जागून आम्ही काही मुद्दे काढत असतो. काही प्रशासनाच्या वतीने हेतू

परस्पर केले जाते, काही अनावधानाने केले जाते. ह्याच्यावरजे लास्ट फायडिंग आहे, शेवटचा कॉलम ज्याला बजेटचा म्हणतो तो सुधारीत करण्याचा प्रत्येक नगरसेवकाचे कर्तव्य आहे.गटनेता वगैरे नाही. एखादा नगरसेवक आहे तो गटनेता नाही. पण चार्टड अकाउंट आहे हे जे बजेट आपले मांडलेले आहे. आयुक्त साहेब, आता नाही. बऱ्याचशा नाजुक परिस्थितीमध्ये आयुक्त साहेब सभागृहतुन निघुन जातात. ह आमचा अनुभव आहे. सदरच्या बजेटमध्ये २००३ ते २००४ ची ३२ करोड ३४ लाखाची तुट आहे २००४-२००५ मध्ये २६ करोड ५ लाखाची तुट आहे आणि २००५-०६ मध्ये १२२.५६ ची तुट आहे आणि २००६-०७ मध्ये ८०.३६ ही जी तूट दाखविली गेली आहे. तशीच सेम खाली खर्चाची आहे. खर्चामध्ये प्रत्यक्ष खर्च ४३.३८ तूट २७.५२ ची आहे. सन २००४-०५ मध्ये ३४६८-३५, १९.०८१, १२६६.२५, ४४.८०% ही खालची टक्केवारीमध्ये तुट दिलेली आहे. म्हणजे ही खर्चाची तुट २७.५२% सन २००३-०४ ला आहे. म्हणजे तुट ४३.३९ लाख खर्चाची आणि २००४-०५ मध्ये ३४.६८लाख एवढी तुट आलेली आहे. त्याच्यानंतर २००५-०६ मध्ये १२६ कोटी ७० लाख एवढी तूट आलेली आहे आणि आत्ताचा विद्यमान जो अर्थसंकल्प आपण मांडलेला आहे. तर सदर अर्थसंकल्पामध्ये ८५ कोटी ६९ लाख एवढी तूट अगदी क्लिअरकट आहे. हे अगदी तुम्हाला दाव्याने सांगतो. कारण यामध्ये तुमच्याकडे सन २००३-०४ ला ३२.२५ लाखाची तूट त्यावेळेला होती. त्यानंतर २६ कोटी ५ लाखाची तूट २००४-०५ ला आहे. १२२ कोटी ५६ लाखाची तूट सन २००५-०६ ला आहे. सन २००६-०७ मध्ये ८० कोटी ३६ लाखाची तूट आजच्या तारखेला आहे. जमेची बाजू आणि खर्चाची बाजू, दोन्ही सांगितल्या यामध्ये विशेष लेखापरिक्षक यांनी जो अहवाल सादरकेला आहे. हा अहवाल सन २००५-०६ चा आहे. आम्हाला दुदैव वाटते की, गेल्या मा. महासभेमध्ये जवळ जवळ पाऊण तास आम्ही भरपूर अभ्यास करुन माहितीच्या अधिकारामध्ये स्वतःचे पैसे खर्च करुन आम्ही माहिती मिळविली. या महापालिकेमध्ये जे अनेक अधिकारी आहेत. जे आज आपल्या आजूबाजूला डायसवर बसले आहेत. जे सचिव आहेत आणि अन्य बरेच काही जे मी बोलतोय त्याच्यावरते तुम्हांला विश्लेषण देतील. अधिकारांवर विश्लेषण द्यायचे त्यांना अधिकार नाही. कारण महापालिकेच्या थकबाकीमध्ये थकबाकीदारअसलेला कसूरदारमाणूस जरमिलन म्हात्रे थकबाकीदारअसेल तरतो नगरसेवक म्हणून निवडून येऊ शकत नाही. हे मी तुम्हांला त्यावेळेलाच सांगितले होते. जो अधिकारी थकबाकीदार असेल त्याला या सभागृहामध्ये आम्ही बोलतो त्याच्यावरविश्लेषण करण्याचा कोणत्याही अधिकार नाही. महापालिकेने दि. २६/१२/२००६ ला पत्र दिलेले आहे. यामध्ये श्री. विजय पाटील याच्यावर ३६ लक्ष ३३९ रु. थकबाकी दाखविली. श्री. हरेश पाटील ६३ लाख ९१६ रु., श्री. अजित पाटील ९४ लाख ७०७ रु. श्री. सुनिल काळे ४५ लाख २३८ रु. त्यानंतर सदर ह्या अधिकाऱ्यांची दरवर्षी देय वेतनवाढ पुढीलप्रमाणे श्री. विजय पाटील ह्यांना आपण पुरस्कार दिले. थकबाकी ठेवले म्हणून या प्रशासनाने पुरस्कार दिलेले आहे. आता हे पुरस्कार किती रुपयाचे ते मी वाचून दाखवितो. श्री. विजय पाटील ह्यांना २०० रु. चा तर श्री. हरेश पाटील ह्यांना २७५ रु. तर श्री. अजित पाटील ह्यांना २७५ रु. चा, श्री. मनोहर म्हात्रे ह्यांना २०० रु., श्री. संजय तायशेटे ह्यांना २०० रु. आणि श्री. सुनिल काळे ह्यांना १५० रु. चा पुरस्कार आहे. हे जे पुरस्कार दिले आहेत ह्या त्यांच्या वेतनवाढी आहेत. म्हणजे त्याने आपल्याकडे जी लाखाची रक्कम ठेवली. प्रशासनाकडून गेल्या १४-१४ वर्षापासून ज्या वसूल्या प्रशासनाने करायचे आणि अनेक ऑडीटर आलेत गेलेत त्यांनी आपले आपले रंगवले. कोणी काळ्या रेघाने, तरकोणी लालने तरकोणी हिरव्याने रंगवले पण ह्या वसूल्या अजूनपर्यंत झाल्या नाहीत आणि हा जो अहवाल आहे या अहवालामध्ये गेल्यावर्षी आपल्याला आठवतील. मी येथे गड्डा घेवून उभा होता आणि त्यावेळेला आपल्याला सांगितले होते. ही जी थकबाकी १२ करोड रुपयाची आहे. प्रशासन एवढे बेशिस्त आणि नालायक आहे की, ह्या प्रशासनाने या अहवालामध्ये फक्त रु. ५,००० ची रिकव्हरी दाखविली आहे. तुमच्या आदेशाची सुद्धा पायमल्ली झालेली आहे. त्या करिता बजेटची ही मिटींग झाल्यानंतर आमचा आपल्यावर काही विश्वास राहिलेला नाही. गेल्यावर्षी आपण जे रुलिंग दिले त्याचे पालन आयुक्त आणि प्रशासनाने केलेले नाही. त्याचा अहवाल आपल्याकडे अजून रेडी झालेला नाही. त्याचा परिपाक म्हणजे ह्याच्यामध्ये फक्त ऑडीट प्रोसिडींग प्रमाणे गेल्यावर्षी जे ABCDEFG लिहीले होते. तसेच, ह्यावर्षी सुद्धा ABCDEFG लिहून आयुक्तांनी फक्त पाच हजारांची वसूली ह्याच्यामध्ये दाखविलेली आहे. जी प्रत्यक्ष स्वरुपामध्ये १२ करोड ३६ लाख रु. एवढी वसूली झाली पाहिजे. हे आम्ही गेल्यावर्षी आपल्याकडे विस्तृतपणे विचारले. पण प्रशासन आपल्यापेक्षा एकदम ताकदवारआहे. प्रचंड ताकदवारआहे. त्यांनी टसमस केले नाही. गेल्यावर्षी आपल्या महापालिकेची जी अर्थसंकल्पेची सभा होती. त्याच्यातला लोगउपयोगी असा जो डिसीजन होता. पिठासिन अधिकारी म्हणून जो दिला की, सदरची वसूली करुन एक महिन्यामध्ये पुढच्या मिटींगमध्ये आपण सादरकरावे. हे आम्हाला एक वर्षानी मिळते. हे आमचे दुदैव आहे. आज ह्या मिटींगमध्ये हा जो अहवाल साहेबांनी दिलेला आहे. हा त्याचा परिपाक आहे. पूर्णपणे पान आणि पान या अहवालावरआपल्याचा चारदिवस कमी पडेल एवढे आपल्याला सभागृहामध्ये काम आहे. परंतु, त्या ज्या अधिकाऱ्यांनी हा अहवाल बनवल्या आहे. आज आम्ही फक्त कर्तव्यपूर्ती, जसे शंकराच्या मंदिरामध्ये जाताना नंदील सलाम करायचा असतो, नमस्कारघालायचा असतो आम्ही तसे काम करतोय. कारण गेल्यावर्षी मी ओरडतो, महापालिकेची १२ करोडची वसूली आहे. ती अजूनपर्यंत झाली नाही. प्रशासनाने केली नाही. आपली जी ऑर्डरहोती, आपण जो निर्णय होता तो सुद्धा प्रशासनाने मानला नाही. परंतु, लेखापरिक्षकांनी आपला थोडाबहूत मान ठेवला आणि त्यांनी त्यांची बाजू पूर्ण केलेली आहे. पुढचे काम, या सभागृहामध्ये मी

बोलतोय. आपण बोलाल निर्णय द्याल. परत गेल्यावर्षीची पुनरावृत्ती यावर्षी होईल ह्याची मला अगदी खात्री आहे. पण यावर्षी मात्र आम्ही सोडणारनाही. ही अर्थसंकल्पाची शेवटची मिटींग आहे. ह्या अर्थसंकल्पाचे तीन तेरा जे वरवाजवायचे आहेत त्याची आम्ही तयारी करु, पण वाईट एवढेच वाटते की, एखादा नगरसेवक प्रशासनाच्या विरोधामध्ये महापालिकेच्या हद्दीतील जनतेच्या पैशाच्या बद्दल आपल्याला काही सुचना करतो. प्रशासनामध्ये एवढे सक्षम अधिकारी आपण आणून ठेवले आहेत. डिग्री होल्डरआहेत. अनेकांना पदोन्नती, वाहन, भत्ते सर्व दिलेले आहे. परंतु, त्यांची ती काम ते व्यवस्थित करत नाही. आपल्या प्रशासनाच्यावतीने ती निष्क्रीयता चालते. त्याचा हा बोलका अहवाल आहे. हे चलचित्रपट आहे असे मी समजतो पण चित्रपट झाल्यानंतरशहरामध्ये त्याच्यावरपण चर्चा होतात ती चर्चा पुढे होणारआहे. आपण हा जो ऑडीट रिपोर्ट बनवलेला आहे व लेखापरिक्षण अहवाल दिलेला आहे. मी म्हटलेले आहे. जवळ जवळ ८९, ८० करोडच्यावरत्याला फुगवटा आहे. आपण आम्हांला पानवारसंधी देणारआहात का? हे आमचे आता प्रास्तविक झालेले आहे. आपण गेल्यावर्षी या सदनामध्ये आपण एक डिसीजन दिला होता, रुलिंग दिले होते आणि परत आयुक्तांनी ह्यावर्षी रु. ५००० ची रिकव्हरी दाखविली आहे. मग गेल्यावर्षी आपण जी रुलिंग दिली ते आम्ही चुकीचे समजायचे का? किंवा माहितीच्या अधिकारात मला जी माहिती मिळाली आणि हे जे पुरस्कार, रिकव्हरी, ऑडिट रिकव्हरी गेल्या १४ वर्षाची १२ करोड ३६ लाख एवढी आहे. हे सगळं आम्ही सभागृहोपुढे आणले त्याच्यावर प्रशासनाने, आयुक्तांनी, लेखापरिक्षकांनी त्या त्या विभागाने काय काय केले? ते ते अधिकारी ज्याची सभागृहात चर्चा झाली. महापौरांचे त्याच्यावर रुलिंग झाले. आदेश आला. परंतु, त्या अधिकाऱ्यांकडून कीती छोटया रक्कमा, कीती मोठया रक्कमा, कीती लाखात आहेत, करोडोमध्ये आहेत. अशा ज्या रक्कमांची वसूली झाली पाहिजे होती. त्याचे वर्षभरामध्ये आपण काय केले? मा. उपमहापौर साहेबांनी मगाशी सांगितले, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांना पण श्री. वैती साहेब हा लेखापरिक्षण अहवाल दि. ३/२/०७ रोजी प्रकरण १८४, ठराव क्र. १८६ मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ३०६, १०७ (३) नुसार मुख्य लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपाचे तसंच केद्र शासनाच्या मा. लेखापरिक्षक, मुंबई यांनी काढलेल्या आक्षेपाची पुर्तता संबधित विभागाने तात्काळ करुन अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांना सादर करावा. व तसे केल्याचे स्थायी समितीस कळवावे असे आदेश देण्यात येत आहे. हा मुळ ठराव आहे. आणि हा योग्य ठराव आहे. त्यामध्ये आपल्या निकालानंतर आपल्या निर्णयानंतर या तारखेला एक वर्षाने या स्थायी समितीचा विषय आला. त्याच्यामध्ये एक महिन्याच्या आत ही मुदतवाढ आणखीन दिली गेली. दि. ३/०२/०७ ची मुदतवाढ म्हणज मार्च महिना उलटुन गेला. ३१/०३/०७ पर्यत येणार व हे आल्यानंतर आम्ही जे काचाकुच करणार त्याचा उपयोग काय? ३१ मार्च झाल्यानंतर आपली बजेटची महासभा गेली व जर स्थायी समितीचा ठराव असता की, बजेटच्या महासभेच्या एक आठवड्या अगोदर तर आम्ही सर्वजण जमलो असतो असा ठराव संमत करण्यात येत आहे ही जी खाडाखोड झालेली आहे. त्याठिकाणी मा. स्थायी समिती सभापती सुचक, अनुमोदक किंवा स्वतः हरेश पाटील जे आपले सचिव आहेत. या लोकांची कुठेही काउंन्टर सिग्नेचर ठरावावर नाही. हा ठराव आम्ही वैध्य मानावा की, अवैध्य मानावा हे आम्हाला सांगा कारण जर मी एखादा चेक दिला. तो भले ५० रुपयांचा चेक असु दे हा अर्थसंकल्पाचा ठराव आहे. हा ऑडीट रिपोर्टवर केलेला पाहिलाच ठराव आहे. या ठरावामध्ये तुम्ही जे कीती बदल करता. त्या त्या अधिकाऱ्यानी, पदअधिकाऱ्यांनी काउन्टर सिग्नेचर केल्याशिवाय खाडाखोडी जसाच्या तसा प्रिन्ट होउन आलेला आहे. ह्याच्यावर आपण आम्हाला नंतर रुलिंग दिलेली बरी. ह्या पानामध्ये पान आणि पान बोलक आहे. मी तर अशी मागणी करतो की, तुम्ही आणखीन दोन मिंटीग ठेवले तरी चालेल २० तारखेपर्यंत वेळ आहे आणि ह्या पान आणि पानांचा आपल्याला जवाब द्यावा लागेल. आपल्याला जनता विचारेल. येत इलेक्शन लागलेले आहे. लागलेले आहे. माझे मतदार मला विचारणार आहेत. की महापालिके मधील हे सर्व आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले व टि. व्ही वर ऐकले म्हात्रे साहेब तुम्ही स्वत : नगरसेवक म्हणुन सभागृहामध्ये काय केले? ह्याच्यामध्ये तुमचा सुध्दा सहभाग आहे. असे ठणकावुन लोक आम्हाला रस्त्यावरुन विचारणार आहेत. आणि मा. उपमहापौर साहेब, हे तुम्हाला जास्त कारण तुम्ही उपमहापौर आहात. महापौर मॅडम आपल्याला जास्त कारण आपण पिठासीन अधिकारी आहात. आणि मला थोडा कमी कारण मी सभागृहात एक नगरसेवक असुन सुध्दा आम्ही सभागृहात बोलतो फक्त ५० माणसं आहेत. इथे ५ लाख माणसे चर्चा करतात. ही ५० माणसं बिचारी बोलत असतील नसतील हा भाग निराळा आहे. पण येत्या अर्थसकंल्प येणाऱ्या ह्या सार्वत्रिक निवडणुकीचा बोलता अर्थसंकल्प लक्षात घ्या. हे जे फ्लॅग दिसतात. तर आम्ही पानापानामध्ये मुरदे काढलेले आहेत. आयुक्त साहेब, आणि प्रशासनाने आपण स्वतः स्थायी समितीची दिशाभुल केलेली आहे हे ह्याच्यामध्ये आह. अनेक प्रकरणात अनेक पानावर पानवाईज बोलणार आहे. तेव्हा हे सगळं इंत्यभुत आम्ही तुम्हाला सर्व समजावुन सांगु या संपुर्ण लेखापरिक्षण अहवालावर भरपुर अभ्यास केलेला आहे. आपण त्याच्यातुन शहराला काय देत असाल तर द्या. अन्यथा जय रामजी की पुढचे वर्ष येतच आह. आमचे अनेक नगरसेवक असतील सुध्दा नसतील सुध्दा पण असणाऱ्यांनी जर शहराची काळजी करावी. नाहीतर, लोक आपली काळजी करणार नाही. एवढं मात्र १०० टक्के सत्य आहे. माझे वक्तव्य मी संपवतोय मॅडम, आपण गेल्या सभेमध्ये जो निकाल दिला होता. बजेटच्या सभेमध्ये खास करुन मी आपल्याला हे सर्व दाखविले तेव्हा आपण एक रुलिंग दिले होते की, मिलन म्हात्रे ह्यांनी जे पुरावे दाखविले, ऑडीट वसुलीच्या संदर्भात सांगत आहे त्यावेळेला सुद्धा तोच फिगर या पत्रिकेमध्ये होता. तो फिगर स्थायी

समितीने सुद्धा सुधरवला नाही. आपल्या आयुक्तांनी ही सुधरवला नाही आणि आपण ही त्याच्यामध्ये काय केले नाही असे आम्हाला वाटते तर त्या जून्या रुलिंगबद्दल आपण प्रशासनाने काय केले ते का केले नाही. तोच फिगर बरोबर कसा आला? गेल्यावेळी सुद्धा पाच हजार व यावेळी सुद्धा पाच हजार असे का झाले याचा आपण खुलासा करावा आणि आम्ही मागे सुचना केली होती की, एवढे बारा करोड रूपयाचे दाखवावे कारण त्यावेळेचे जे अधिकारी होते तेच आज आहेत. त्यावेळेला ते क्लार्क होते आता ते सहा. आयुक्त, उपआयुक्त किंवा जे छोटे क्षेत्रीय अधिकारी असे मोठे मोठ्या पदावर आलेले आहेत. त्याकरीता अत्यंत महत्वाचा विषय आहे. पण आपल्याला तुम्हाला आम्हाला सुद्धा विचारणारे आणि आयुक्तांना सुद्धा विचारणारे या सदनाच्या बाहेर सुद्धा भरपूर लोक आणि ॲथोरीटी आहे. असे नाही, ऑडीटर आले ऑडीटरांनी सर्व अहवाल तयार केले त्यांना आपल्या महापालिकेतून गाडी दिली. ग्रीन कोर्ट क्लबला गेले. भरपूर जेवणावर ताव मारला. कोंबड्या खाल्ल्या बाकी सगळ केले. थँक्यु, टाटा, बायबाय केले आणि निघून गेले व बजेट ही त्यांच्या बरोबर गेले हे समजू नका. येणारे वर्ष तुमची आमची परिक्षा घेणारे आहे हे लक्षात घ्या. आपण स्वतः पदाधिकारी या नात्याने जनतेला काहीतरी देवू या. बाकी माझी काही इच्छा नाही. सरळ सुड अशी इच्छा आहे. आपल्या दोघांचा संपूर्ण नियम गेल्यावर्षीचा प्रशासनाने कोणत्या बसनात गुंडाळून टाकला आहे. त्याचा उहपोहाझालेला बरा. धन्यवाद.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, आपल्या मिरा भाईंदर महानगरपानिकेचे बजेट सन २००६-०७ व सन २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रक हे अंदाजपत्रक आमच्या स्थायी समितीच्या अध्यक्षांनी उत्कृष्ट असे बनवलेले आहे. त्याला कमी वेळात कमी अनुभव असताना ही इतका सुंदर असा बजेट बनवलेला आहे. गरीबांवर कोणताही बोजा न टाकता आजपर्यंत जे बजेट पाच वर्षामध्ये झाले त्याच्यामध्ये हे बजेट उत्कृष्ट असे लोकांनी वाचल्यानंतर लोकांना जे कळाले त्याच्याबद्दल लोकांनी सुद्धा प्रशंसा केलेली आहे. आम्ही नगरसेवक तर करतोच परंतु, इतके उत्कृष्ट हे बजेट आहे. त्याचप्रमाणे आपले लेखापरिक्षक श्री. बनसोडे साहेब यांनी इतक्या सुंदररित्या आजपर्यंत जे लेखापरिक्षक झाले त्यांनी सगळ्यांनी गाश्या गुंडाळलेल्या होत्या व आपली तुंबडी भरलेली होती. परंतु, हा इतका सुंदर आणि हूशार अधिकारी त्याने जो अहवाल दिलेला आहे हा इतका उत्कृष्ट आणि जान आहे की ह्याचे वाचन खरोखर झाले पाहिजे. प्रत्येक पानाचे वाचन झाले पाहिजे आणि ह्याचा शहानिशा झाला पाहिजे आणि ह्याच्यावर जे ताशोरे ओढलेले आहे. त्या अधिकाऱ्याने ह्याचा पाठपूरावा करुन ह्याच्यावर कार्यवाही केलीच पाहिजे. ह्या मालमत्ता करामध्ये, परिच्छेद (१) डोंगरीचे एक प्रकरण आहे. हा एकटा माणूस श्री. कोकाभाई डोंगरीवाला ह्याच्यामध्ये मालमत्तेमध्ये इतका घोटाळा झालेला आहे आणि या अशापद्धतीने घोटाळे करुन ह्या लोकांची नाव लागली. पण जो गरीब असेल, ज्याला काय माहिती नसेल, जो अनपढ असेल त्याचे काय? ह्या पैशावाल्यांनी पैसे घेउन त्याची मालमत्ता कागदपत्र फिरवले असतील तर त्या गरिबाचे काय? तो कोणाकडे दाद मागणार? ह्या अधिकाऱ्यांनी त्यांना आपले करून घेतले त्याच्याकडून पैशाची अपेक्षा कदाचीत असेल, तरच हे काम झालेले आहे आणि ही मालमत्ता फिरवलेली आहे पण ह्याच्यामध्ये गरीबाचे काय आणि हे गरिबांचे गेल्यानंतर ते आता काय करणार हा कोर्टकचेरी करणार तर ती लोक आपल्या महानगरपालिकेला धरणारच कारण प्रतिवाढी आता तो असला, म्हणजे ह्याच्यामध्ये महानगरपालिकेचा सहवास आलाच कोर्ट कचेरी महानगरपालिकेला ही करावी लागणार. कोर्टा मध्ये अधिकाऱ्यांना सुद्धा जावे लागणार आहे. त्याच्यासाठी आपल्याला वकील लागणार आहे. म्हणजे महानगरपालिकासुद्धा ह्याच्यामध्ये येणार आहे. असे काहीक आहेत. राई मुर्धा मध्येसुद्धा हाच घोटाळा आहे. ह्या पळपट्यामध्ये ते करून जातात. परंतु, पुढच्याला दुसऱ्याला कीती त्रास होतो. कारण त्या बिचाऱ्यावर अन्याय होतो. त्या अन्यायासाठी जंगजंग पछाडण्यासाठी त्याला पुन्हा मुळ पदावर येण्यासाठी त्याचे नाव लावण्यासाठी त्याला कीती खर्च द्यावा लागतो. या अधिकाऱ्याची फक्त एक पैशाची दोन पैशाची शाही लागत असेल कागदपत्र न बघता समोरच्या नावावर करून दिले व वास्तविक खरोखर ज्याचे नाव खरोखर वडीलोपार्जीत इस्टेट आहे त्याचे काय? त्यानी न्याय मागण्याकरिता कोर्टात जावे आणि दहा वर्ष कोर्ट कचेरी करत बसावे मग या अधिकाऱ्यांनी तसे का करावे? त्यांनी हा विचार कधी केला आहे का? त्यागरीबाचे काय होणार आहे आणि ते बिचारे कोर्ट कचेरी ज्यांना न्याय मिळाला किंवा नाही तर ते काय करणार आहेत ह्या प्रॉपर्टीचे जर ह्या लोकांनी असे केले तर ह्यांच्यावर खरोखर कार्यवाही करून जर त्यांच्यानावावर प्रॉपर्टी करत असतील तर ह्याच्यावर काय? ह्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे असे माझे ठाम मत आहे आणि मी श्री. बनसोडे साहेबांचे खरोखरच अभिनंदन करतो की त्यांनी उत्कृष्ठ असे लेखापरिक्षण करून एक एक पावतीचे उदाहरण दिलेले आहे. त्या एक पावतीमध्ये त्यांचे जात भाईबंध आहे नाव श्री. बनसोडे म्हणून आहे. त्या पावतीधारकाचा ह्या माणसाने विचार केला असता की, हा आपला बंधू आहे ह्याचे नाव कशाला घ्यावे? परंतु, नाही त्या माणसाला सुद्धा त्यांनी ह्याच्यामध्ये घेतलेले आहे. त्याचा सुद्धा खोटेपणा त्यांनी चव्हाट्यावर आणलेला आहे. ते अभिनंदनास पात्र आहे म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो जय हिंद जय महाराष्ट्र!

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, याठिकाणी हा जो अंदाजपत्रक सादर झालेला आहे. ह्याच्या बरोबर एक लेखा परिक्षण अहवाल सुद्धा सादर केलेला आहे. खर म्हणजे लेखापरिक्षण अहवालाच्या संदर्भात आजच्या सभेमध्ये चर्चा किंवा निर्णय किंवा असा कुठलाही विषय या विषयपटलावर नाही. ह्याच्यामुळे लेखापरिक्षण अहवालावर बोलायचे की, तो तसा वाचून आपल्या डोक्यात ठेवायचा आहे हे आम्हाला कळत नाही. लेखापरिक्षण अहवाल एवढा मोठा आला मग ते अंदाजपत्रकाच्या मिटींगमध्ये चर्चा करायची की, नंतर कधीतरी चर्चा करणार की, आपण ह्याच्यात ज्या काही त्रुटी काढल्या आहेत त्याच्यासाठी अधिकाऱ्यांना काही वेळ दिलेला आहे. त्यावेळेस त्यांनी घेतलेल्या अग्रीम रक्कमांचे पुर्ननियोजन वेळेत करून द्यायचे आहे. ह्याच्यानंतर तो महासभेसमोर आणणार का? कारण सर्व साधारणपणे नियम असा आहे की, लेखापरिक्षण अहवाल हा स्थायी समितीकडे सादर केला जोतो. स्थायी समितीने त्याच्यावर निर्णय द्यायचा असतो. माझ्या माहितीप्रमाणे स्थायी समितीने त्याच्यावर निर्णय घेतलेला आहे. अधिकाऱ्यांना काही वेळ दिलेली आहे की, ज्या अग्रीम रक्कमा अधिकाऱ्यांच्या नावाने दाखवतात त्या रक्कमांचे समायोजन करण्याची त्या अधिकाऱ्यांना वेळ दिलेला आहे. तेव्हा ती वेळ संपल्यानंतर तुम्ही हा लेखापरिक्षण अहवाल जर काय त्रुटी बाकी असेल तर त्याकरिता पुन्हा मा. महासभेसमोर आणणार का? जर तुम्ही महासभेसमोर आणणार असाल तर मग ह्या लेखापरिक्षणावर आता बोलायची काही गरज नाही. फक्त बजेटवर आजच्या सभेत बोलावे असे एकंदरीत आपल्या सभेची धारणा दिसते किंवा पदाधिकाऱ्यांची धारणा दिसते.

**रिटा शाहा:-**

दोन मिनिटाचे इंटरप्शन करते, स्थायी समिती पुढे हा विषय गेला होता त्याच्यामध्ये एक महिन्याचा पिरियड दिला होता आणि तो एक महिनाही संपला आहे. फक्त दुःखद घटना अशी आहे की, आम्हाला अहवाल दिला आहे तो विषय ह्या विषय ह्या पटलावर घेतलेला नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य प्रफुल्लजी पाटील ह्यांनी जे विचार व्यक्त केले त्याच्याशी मी सहमत आहे. ते अशासाी की, हा जो प्रशासन अहवाल आपणाकडे देण्यात आलेला आहे त्याचा बजेटशी इनडायरेक्ट संबंध आहे. आजच्या सभेपुढे बजेटचाच विषय आहे. जर स्थायी समितीने कम्प्लीशनसाठी एक महिन्याचा, दिड महिन्याचा अवधी दिलेला आहे तर ते कम्पलाईन्स स्थायी समितीनेच पुन्हा एकदा वेरीफाय करायला पाहिजेत आणि त्यानंतर गरज असेल तर तो विषय विशेष अजेंड्यावर आणून तो सभागृहापुढे ठेवावा अशी आमची विनंती आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे त्याच्यामध्ये गेल्या दोन तीन वर्षाचा आपण विचार करता जे अंदाजपत्रक वाढविले गेले म्हणजे फुगवून वाढविली गेली त्याच्यामुळे अंदाजपत्रकामधला बराचसा भाग हा बांधकाम विभागाकडे वर्ग केला असता निधी बांधकाम विभागाने हा सगळ्याचा सगळा वापरला. आजची परिस्थिती अशी आहे की, सगळ्यात दुःखद बाब अशी आहे की, अंदाजपत्रकामध्ये बांधकाम विभागाला बजेट दिलेला आहे जे बजेट बांधकाम विभागाला दिलेले आहे ते खर्च करण्याकरिता त्यांना मिळणार आहेत का? तर माझी अशी अपेक्षा आहे की, त्यांना आजच्या तारखेला शुन्य बजेट आहे कारण ऑलरेडी आपण जी काम काढलेली आहेत त्या कामांची बिल जर देयक विचारात घेतली तर पुढच्या वर्षात एकही विकासाचे काम होणार नाही हे नगरसेवकांनी लक्षात घ्यावे. फक्त प्रभाग समितीचा जो ५० लाखाचा निधी आहे आणि नगरसेवकाचा निधी सोडला तर इतर कुणालाही निधी मिळणार नाही. आपल्या विकासाचे एकही काम होणार नाही. सर्व नोटीस सिरीयल बाब या अंदाजपत्रकामध्ये ही आहे की, बांधकाम विभागाकडून जास्त काम दिल्या गेल्याने जास्त ठेकेदारांना ठेके दिले गेले त्यांना कार्यादेश दिले गेले. कामाच्या ऑर्डर दिल्या गेल्यानंतर काम सुरू झाले व काम सुरू झाल्यानंतर त्यांची बिल द्यायची आहेत. त्या सगळ्या देयकाची रक्कम कीती आहे त्याचा पहिल्यांदा याठिकाणी उल्लेख करावा. मगच बांधकाम विभागाला किती तरतुद मिळणार आहे त्यांचे या ठिकाणी स्पष्ट होईल. तर बांधकाम विभागाने आज याठिकाणी माहिती द्यावी की, बजेट संपूर्ण झाल्यानंतर त्यांच्याठिकाणी आज किती देयक द्यायची उरली आहेत की, ती पुढच्या वर्षाच्या बजेटमधून तुम्हाला ती द्यावी लागणार आहेत. ह्याची माहिती प्रशासनाकडे आहे. मी काही ठिकाणी माहिती विचारणार आहे ती माहिती देण्याची कृपा करावी व काही ठिकाणी मी डायरेक्ट दुरूस्ती सुचवीणार आहे. म्हणजे सभागृहाचा वेळ जास्त वाया जाणार नाही. तर पहिली माहिती अशी आहे की, बांधकाम विभागाकडे पुढच्या वर्षासाठी ही जी देयक द्यायची आहेत. त्या एकूण देयकाची रक्कम किंवा देयक़ नसतील तर कार्यादेश दिले असतील त्यांच्या बिलाच्या आणिकिती काम एकंदरीत आहेत पडलेली किंवा चालू असलेली ह्या सगळ्यांची देयक तुम्हाला द्यायची आहेत त्यांची रक्कम आपण सांगावी.

**दिपक खांबित :-**

जवळ जवळ १० कोटींची बिल अकाउंटमध्ये आज पेंडीग आहेत आणि सुमारे १५ कोटींची काम ही आपली सगळी चालू आहेत. वर्कऑर्डर देवून काम सुरू आहे आणि त्याचा जो खर्च आहे तो पुढील वर्षी पडणार आहे आणि हे गृहीत धरून बजेटमध्ये तेवढीच तरतुद केलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे तुम्हाला २५ कोटी रूपयाची आहे. आज हे बजेट सादर केले ह्याच्यामध्ये बांधकामाला किती तरतुद आहे?

**दिपक खांबित :-**

साहेब, जी देखभाल दुरूस्तीची काम आहेत त्याकरीता तरतुद केलेली आहे पण जी नविन काम आहे रस्ते, गटारे त्या करिता तरतुद केलेली नाही. कारण ह्यावर्षी जवळ जवळ ७ कोटी रूपायाची दवाखान्याकरिता तरतुद केलेली आहे. टेम्बा हॉस्पीटल व मिरा रोडला जे दवाखाना आहेत त्याचे काम सुरू आहे ते दोन्ही मिळून ७ कोटी रूपयाची तरतुद केलेली आहे. जी गेल्यावर्षी नव्हती. त्यामुळे तो पैसा आपल्याला रस्ते, गटारे आणि वॉर्ड मधल्या इतर कामाकरिता मिळालेला होता परंतु, सात कोटी रूपये आपण तिथे दिल्यामुळे आपल्याला ह्यावेळेला बजेट मिळालेला नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण हॉस्पीटलसाठी ७ कोटी रूपये सांगत आहात ना. मग जेव्हा तुम्ही भांडवली खर्च जमेत धरता की, करायचे असे तुम्ही प्रस्तावित करता तेव्हा रस्त्याची काम नित्यनेमाने निघणारी काम आहेत. गटाराची काम नित्यनेमाने येतात. नगरसेवक तर या कामांसाठी येणार. त्यामुळे तो निधी तुम्ही तिथे न वापरता त्याच्यासाठी कर्ज उभारा. महापालिकेने कर्ज उभारायला पाहिजे. महापालिकेने गेल्या चार वर्षात एकदाही कर्ज उभारलेले नाही. आपली परिस्थिती खराब आहे का?

**दिपक खांबित :-**

४८ कोटीचा प्रस्ताव एमएमआरडीए कडे पेंडींग आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

१६४ कोटीचा पाणी पुरवठ्याचा प्रस्ताव एमएमआरडीए कडून सहा महिन्यामध्ये मंजूर झाला होता. तेव्हा आपली नगरपालिका ''बी'' क्लास होती आत आपली महानगरपालिका आहे आणि महानगरपालिकेमध्ये ४०० कोटीचे बजेट बनवणारे. आपला स्टेटस किंवा आपले पद काहीच राहीले नाही का? किंवा आपण कागदोपत्री आपले काय पद दाखवत नाही असा त्याचा अर्थ होत आहे. एमएमआरडीए आपल्याला कर्ज देत नाही ह्याचा अर्थ महापालिकेची परिस्थिती चांगली नाही. आपण चांगले काम करत नाही किंवा आपण भांडवली खर्च करत नाही. भांडवली खर्च करून आमचे एवढे भांडवल आहे हे दाखवत नाही.

**दिपक खांबित :-**

त्यांनी नाकारलेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्यासाठी आपण त्याठिकाणी तरतुद वाढवावी आणि बांधकाम विभागाला याठिकाणी निधी वाढवावा अशी मी दुरूस्ती सुचवित आहे. ह्याच्यावर मी जास्त बोलत नाही. खरे म्हणजे एमएमआरडीए कडे आपली पोझीशन त्याला फायनानशियल क्रिएटीव्हावर्जीनेस म्हणतात जर तुमचे पत टिकवायची असेल. कुठल्याही दरबारी जर पहिजे तुमच्याकडे तुमच्या स्वतःच्या मालमत्ता आहेत त्या सगळ्या मालमत्तांचे व्हॅल्युएशन करून ही एवढी मालमत्ता आमच्या महापालिकेची आहे असे तरी दाखवायला पाहिजे. लेखापरिक्षण अहवालावर बोलत नाही. त्या लेखापरिक्षण अहवालामध्ये बऱ्याचशा अशा गोष्टी आहेत की, प्रॉपर्टीज महापालिकेच्या आहेत. काही प्रॉपर्टीझ महापालिकेला हस्तांतरीत झाल्या आहेत. म्हणजे भांडवली खर्चाचे मी बोलत आहे. जेवढे जेवढे तुम्ही भांडवली खर्च करता ते सगळे तुम्ही कॅपीटललाईझ करून तुमची मालमत्ता आहे असे दाखवायला पाहिजे. जेव्हा तुम्ही दाखवणार की, १९८५ ला ही नगरपालिका स्थापन झाली सन २००२ ला महानगरपालिका झाली. आता सन २००७ आहे. म्हणजे १९८५ ते २००७ इतक्या वर्षामध्ये आम्ही करोडो रूपयाची मालमत्ता उभारलेली आहे. त्याच्यातले काही मालमत्ता म्हणजे भांडवली र्ख्च उदा. सार्वजनिक संडास बांधले व भांडवली खर्चात धरलात तर तीन वर्षात ते संडास तुटणारच असतात. परंतू, तुम्ही रस्ता बांधला तर तो रस्ता भांडवली खर्चात जातो म्हणजे एकप्रकारे तुमची ती ॲसेट निर्माण होते. तुम्ही तो ॲसेट रेकॉर्डवर दाखविला नाही. तर तुमचा गुडविल वाढणार नाही. क्रेडीट वर्जीनेस वाढणार नाही. अशाप्रकारे लेखापरिचणाच्या अहवालामध्ये जे काही म्हटले त्याच्याव्यतीरीक्त जेवढ्या महापालिकेच्या प्रापर्टीज आज आहेत महानगरपालिकेने निर्माण केलेल्या, उभ्या केलेल्या,आणि महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झोलेले ह्या सर्वाचे व्ह्युलेशन करुन ते महानगरपालिकेच्या नावाने दाखवायला पाहिजे आता जुन्या नगरपालिकेचे आपले ऑफीस आहे. पण त्याचे व्ह्युलेशन दाखवत नाही. मालमत्ता दाखवत नाही. शाळा जिल्हा परिषदेकडुन वर्ग करुन घेतल्या आहेत. आता त्या इमारती आपल्या झाल्यात. त्या इमारतींचे व्ह्युलेशन तुम्हाला दाखवायला पाहिजे. जरी तुम्हाला जिल्हापरिषदेने विनामुल्य केल्या असल्या तरी त्याचे मार्केट रेजींग वगैरे करायला पाहिजे. आपण तेव्हा एखाद्या फ्लॅट वर कर्ज मागतो. तुम्हाला बँक दोन प्रकारे कर्ज देण्याचा विचार करते. एक तर तुमच्या फ्लॅटची परचेस व्हॅल्यु किती आहे. एखाद्याने तो फ्लॅट पाच लाखाला विकत घेतला तर त्याच्यावर ७५ टक्के त्याला लोन मिळणार पण तसे करत असतांना ते मार्केट रेट सुध्दा बघतात जर त्या फ्लॅट चा मार्केट रेट १० लाख रुपये असेल तर बँक तुम्हाला वाढीव कर्ज देईल व त्याचे जर चार लाख रुपये असेल तर चार वाढीव कर्ज देईल आणि त्याचे जर चार लाख रुपये असेल तर चार लाखावरच कर्ज मिळेल. अशाप्रकारे जर तुम्ही मालमत्तेचे व्हॅल्यूएशन केले नाही तर

महानगरपालिकेचे पद कधीच वाढणार नाही. बांधकाम विभागाकडे बजेटमध्ये तेवढी ॲडीशनल तरतुद करावी आणि हा जो भांडवली खर्च आहे तो बजेटमध्ये तेवढी ॲडीशनल तरतुद करावी आणि हा जो भांडवली खर्च आहे तो इतर निधीतून न देताना कर्जनिधीतूनच उभारून आपण तो करावा अशी माझी दुरुस्ती आहे व महत्त्वाची बाब अशी आहे की, मालमत्ता करामध्ये २००६-०७ मध्ये आपण ४० कोटी रुपयाचे अंदाज बांधले होते. जेव्हा आपण सन २००६-०७ मध्ये आपण ४० कोटी रुपयाचे अंदाज बांधले. त्यावेळी सन २००५-०६ ला फक्त २४ कोटी रुपयेच आमचा मालमत्ता कर होता. सन २००३-०४, २००४-०५, २००५-०६ याची तुलनात्मक रक्कमा जर तुम्ही बघितल्या तर २६ कोटीवरुन आपण २४ कोटीवरच राहिलो म्हणजे सन २००३-०४ पासून ते २००५-०६ या तीन वर्षामध्ये एकही मालमत्ता वाढली नाही का? हे तुमचे आकडे सांगतात. आपल्याला एकदम अचानक स्वप्न पडले की, गेल्या तीन वर्षामध्ये एकही मालमत्तेला आपण कर लावला नाही म्हणून सन २००६-०७ ला आपण डायरेक्ट ४० कोटी रुपयाची अपेक्षा केली. म्हणजे १६ कोटी रुपयाचे उत्पन्न आपण वाढीव अपेक्षित धरले तर त्याला आपण काहीतरी गणित केले असेल काहीतरी प्रमाण मांडले् असेल ना की, नव्या मालमत्ता शोधून काढा आणि त्यांना टॅक्स लावा. मग आपण जेव्हा ४० कोटी रुपये प्रस्तावित केले होते हे ४० कोटी रुपये त्या वर्षात येणाऱ्या कराचे होते की, त्याच्यामध्ये मागील करसुद्धा थकबाकी होता. ह्याची माहिती टॅक्स विभागाने द्यावी की, ४० कोटी रुपये जेव्हा सन २००६-०७ साली आम्हाला अंदाजपत्रकानुसार अपेक्षित होते तर ते त्या वर्षातले होते की, त्याच्यामध्ये मागच्या वर्षातली सुद्धा काही रक्कम होती. टॅक्स विभागाने माहिती द्या.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़ो.) :-**

सदर रक्कम थकबाकीसहाहोती.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग थकबाकी किती होती?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़ो.) :-**

११ कोटी १५ लाख रुपये होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, एक महत्वाची बाब आहे. जेव्हा जेव्हा ४० कोटी रुपये तुम्ही अपेक्षित अंदाज धरला होता . त्याच्यात १५ कोटी रुपये तुमचे मागच्या वर्षाचे बाकी होते म्हणजे त्या वर्षातले ॲक्च्युअल कराचे आपले २५ कोटी रुपये म्हणजे सन २००५ - २००६, २००६ - २००७ मध्ये आपले फक्त १ कोटी रुपये उत्पन्न वाढले का? सन २००५ - २००६ ला आमचे २५ कोटी रुपये अपेक्षीत उत्पन्न आहे. २४.३० कोटी मिळाले व सन २००६ - २००७ ला तुम्ही ४० कोटी रुपये अपेक्षीत केले. त्याच्यामध्ये १५ कोटी रुपये जुने आहेत असे तुम्ही सांगता नवीन २००६ - २००७ या वर्षात लागू होणार होते २५ कोटी रुपयेच झाले. म्हणजे तुमचे उत्पन्न सन २००६ - २००७ ला १ कोटी रुपयाने वाढले आणि हे जर सन २००६ - २००७ ला वाढले असेल तर सन २००७ - २००८ ला तुमचे ४० कोटी रुपये पुन्हा कसे होणार? म्हणजे १५ कोटी रुपयाने तूमचे हे बजेट कोसळले मगाशी बांधकाम विभागाचा निधी आपण वाढवायला गेलो तर इथे परत कोसळतोय काहीतरी इथे तिथे कोससी न करुन कूठेतरी टिकु द्यायला पाहिजे. साहेब, याठिकाणी एकतर आपल्याकडे येवुन कुठल्याही कराची आकारणी होत नाही असे या आकड्यांवरुन दिसते किंवा एकतर आपल्याकडे अशी बरीचशी प्रलंबित प्रकरणे असतील त्याच्यावर निर्णय झाले नसेल असे एकतरी दिसते किंवा आपण ते अंदाज लावले आहेत ते चुकीचे लावले आहेत. असे दिसते जेव्हा आपण जुनी थकबाकी १५ कोटी रुपये धरतो तेव्हा २५ कोटी रुपये त्या वर्षा पुरती येतात.

**सुरेश बनसोडे :-**

प्रथमतः मा. महासभेला अभिवादन करतो तसेच मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त ह्यांना अभिवादन करतो मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी विचारलेल्या मुद्यावरुन मला काही निवेदन द्यायचे होते. कर आकारणीचे जे १५ कोटी बॅलेन्स आहेत ते पुढे खेचले आहेत हा त्यांचा महत्वाचा प्रश्न होता. तर यावर मी असा खुलासा देवु इच्छितो की, करारनामा पत्रिकेमध्ये जे काही मागचे कॅरीफॉरवडर्स असतात ते पुढे खेचले जातात. तसेच आताच्या वर्षापुढे खेचले जाईल. अकाउंटींगचा नियम आहे त्याने असे होत की ज्या ज्यावेळेच्या टॉशुरींत असतात ते त्या वेळाच्या पत्रिकेमध्ये ह्या प्रत्यक्ष रक्कम या सगळ्या आपणाला मागच्या ह्याच्यामध्ये दिसतात ह्यावर्षीसाठी टॅक्सेसला जे दंड लावलेले आहे जे विलंब झाले आहे. त्याचे जोपर्यंत कोणतेही भाष्य देणे हे योग्य वाटत नाही. हे तर जे जे टारगेट्र आपण फिक्स कलेले आहेत त्याबाबत मी मा. महासभेला असे नम्रपणे कळुन इच्छितो की, समान कर आकारणी किंवा टॅक्स रिबेटस याच्यामुळे जे तोटे झालेले आहेत ते आपल्या मा.महासभेचे निरंतर तोटे झालेले आहेत आणि त्यातुन जे मायनेस झालेले आहेत तो अजुन क्लिअर झालेला नाही. आजच्या ह्यावर्षीच्या ३५ कोटीच्या मागणी मध्ये अशामुळे फरक पडलेला आहे आणि तो फरक कधी क्लिअर होईल ज्यावेळी आपले सगळ बॅलेसींग क्लोज होईल तेव्हा ते क्लिअर होईल. आता आपला जो पुढचा प्रश्न आहे की, तुमच्या बजेटचे अंदाज चुकलेले आहेत का? तर ज्यावेळी आपण हे बजेट करतो त्यावेळी मा. महासभेसमोर म्हणने आपल्याला हा एक टप्पा गाठायचा आहाह्या दृष्टीने आपण मांडलेला असतो. यामध्ये ४० कोटी रुपये यासाठी भरलेला आहे की, आता ४० कोटीचा आकडा हा आपला

अंदाजित आकडा आहे. अर्थसंकल्पाचा आकडा फायरेशन करताना १५ जूनला जे जमा टॅक्सेस आणि वजा टॅक्सेस म्हणजे ते आपल्या करातून कायमचे निघून गेलेले आहेत ते मायनस करुन जे बजेट होईल तो फॅक्च्युअल असेल. शेवटचा मुद्दा असा मांडतो की ४० कोटी रुपये आपण ठेवलेले आहेत. हा आढावा ८ महिन्यानंतर क्लिअर होईल. ही प्रक्रिया आपण एकाच मुद्दयाला सोडत नाही. ही टॅक्सेसी पुढे चालत असणार आहे. तसाच मी अजून एक मुद्दा आपल्यासमोर मांडतो, जो एम.यू.आर.एन.ए. चा जो पैसा येणार आहे तो परफेक्टली आपल्या ह्या प्रश्नावर येणार आहे आणि म्हणून टॅक्स प्रणाली सुधारणा हा प्रशासनाचा असा महत्त्वाचा असा पायाभूत धोरणात्मक निर्णय असणार आहे. तरी माझ्या उत्तराने आपले समाधान झाले का?

**प्रफुल्ल पाटील :-**

नाही. आपण जे काही सांगता ही, प्रक्रिया आहे व ही प्रक्रिया पाच वर्षापासून चालू आहे. पाच वर्षे नगरसेवक राहिले की ते त्या प्रक्रियेत सामीलच होतात. पण कुठल्यातरी प्रक्रियेला आपण कुठलातरी टप्पा गाठत असतो की, पहिल्या वर्षाला आम्ही एवढी कामं केली. दुसऱ्या वर्षात आम्ही परिवहन आणले. तिसऱ्या वर्षात आम्ही सिग्नल लावले. चौथ्या वर्षात आम्ही पाणी आणले. या प्रक्रियेमध्ये कुठचा तरी टप्पा गाठला तो दिसत नाही. आता स्पष्ट तुमच्या भाषेत तुम्हाला सांगतो की, जेव्हा तुम्ही असे सांगितले की, १५ कोटी रुपये मागची थकबाकी आहे. मग तुम्ही सन २००६-०७ या वर्षात फक्त १५ कोटी रुपयेच वसूल केलेले आहेत तेही आठ महिन्यामध्ये म्हणजे तुम्ही फक्त थकबाकी वसूल करत आहात आणि चालू थकबाकी चालूच राहते आणि हे केल्यानंतर कुठेतरी आकडेवारीत मला सांगा की, सन २००६-०७ मध्ये ४० कोटीचेच अपेक्षित उत्पन्न धरता म्हणजे एकही प्रॉपर्टी वाढणार नाही याचा तुम्ही दाखला देता. एकाही प्रॉपर्टी नविन टॅक्स लागणार नाही. तुमच्याकडे नगररचना विभागाकडून एकही प्लान सॅक्शन होउन गेलेला नाही. तुमच्याकडून नगररचना विभागाकडून एकाही प्लानला सी.सी. दिलेली नाही. कुठेही लोक राहायला आलेली नाही. आले आहेत ते सोडून चालले आहेत असे कुठेतरी आपण प्रमाण धरायला पाहिजे. आपण जेव्हा अंदाजपत्रक तयार करतो. तेव्हा आपण प्रमाण धरतो मालमत्ता कर तर मालमत्ता कर कशामुळे वाढेल. तर नगररचना विभागाकडून किती प्लान पास होवून गेले. तीन वर्षापूर्वी गेले ते तीन वर्षात पूर्ण झाले ज्यांच्या ओ.सी. दिल्या नसतील त्यांचे सी.सी.च्या हिशोबाने पूर्ण झाले. त्यांच्या बांधकामाची काही रक्कम, मालमत्ता कराच्या रुपाने आम्हाला मिळणार आहे. कुठेतरी प्रभाग असेल ना. आपण ४० कोटी म्हणता तर ५० कोटी रुपये का नाही म्हणत? माझे मत आहे की, याठिकाणी तुम्ही ५० कोटी रुपये म्हणा आणि बांधकामाला अजून वाढवा. ॲग्जेसमेंट करणे म्हणजे अंदाजपत्रक नव्हे. अंदाज ह्याचा अर्थ काय? मला तुम्ही सांगितले की, १५ फूटावर उडी मारा तर मी मारणार नाही. मला दोनच फूटावर उडी मारता येते हा माझा अंदाज आहे. मग ती कदाचित १.१ असेल किंवा २.५ असेल. पण एकदम १५ फूटावर नाही. तुमच्या ह्या सगळ्या उडया १५ ते २० फूटावरच्या आहेत त्या कधीपण आमच्या जवळ येणार नाही व आमच्या प्रयत्नाने आम्ही त्यांच्याजवळ पोहचू शकणार नाही. म्हणून ४० कोटी रुपयाचे उत्पन्न आपण जेव्हा दाखवतो तेव्हा त्याच्यामध्ये एकतर आपण मागील बाकी असे म्हणायला पाहिजे. जेव्हा आपण हे आठ आणि चार महिन्याचे दाखविले आहे तेव्हा त्याच्यात मागील बाकी सेपरेट दाखवायला पाहिजे. चालू सेवेत दाखवायला पाहिजे. म्हणजे तुमच्या लक्षात आले असेल की, मागच्या वर्षीचे १५ कोटी रुपये बाकी आहेत. माझ्या मते जर तुमचे मागचे १५ कोटीचे बॅलन्स असेल आणि २५ कोटी रुपयाची तुमची करंट मागणी असेल तर ४० कोटी रुपये तुमचे गेल्यावर्षीचे बरोबर झाले. मग ह्यावर्षीच्या उत्पन्नामध्ये वाढ होत असेल तर ती करायला पाहिजे. मग ती वाढ ५ कोटीची असावी असे जर नगररचना विभागाने देईल की, कर विभाग देईल. नगररचना काय देईल तर त्यांच्याकडून सॅक्शन झालेले प्लान व दिलेल्या ओ.सी. आणि कर विभाग अशावरून येईल की, तुमच्याकडे प्रलंबित असलेली प्रकरणे तुमच्याकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत तर इतकी प्रकरण प्रलंबित आहेत. मग आम्ही जेव्हा ४० कोटी रुपये अपेक्षा करतो तिथे आम्ही ५० कोटी रूपयाची अपेक्षा व्यक्त करतो. माझ्यामते आपण ह्याच्यामध्ये वाढ करावी. पाच कोटी रुपये तरी वाढ करावी किंवा दहा कोटी रुपये वाढ करावी. जर तुमचे आकडे हे ५ कोटी रुपये मागील थकबाकी दाखविते आणि २५ कोटी रुपये करंट मागणी दाखविते तर कर विभागाला तुम्ही १० कोटी रुपयाचे टारगेट द्या. आम्हाला बजेट तर वाढवून पाहिजे. आम्ही बजेट फूगवत नाही. बजेट का वाढवून पाहिजे. कारण बांधकाम विभाग मायनस मध्ये आहे. बांधकाम विभागातून आता एक ही काम निघणार नाही.

**अजिज शेख (मा. आयुक्त सो.) :-**

याबाबत मी थोडीशी माहिती देतो की, सन २००७-०८ ला आयुक्तांचे जे सर्वसाधारण अंदाज आहेत ते रु. ३,७५० लाखामध्ये आहे. म्हणजे ३७.५० कोटी रुपये हे ३७.५० कोटी रुपेय ही रक्कम आम्ही कशी काढलेली आहे की, त्यामध्ये ११ कोटी रुपयाची थकित रक्कम आहे आणि करंट वर्षाची जी डिमांड आहे ती २४ कोटी ५१ लाख आहे. अशी टोटल ३४ कोटी १५ लाख रु. इतकी रक्कम होत आहे. जी आज ह्यावर्षामधली डयू म्हणता येईल. ह्या रकमेमध्ये आपण १० टक्के वाढ दिली आहे. आपण जो नॅचरल ग्रोथ कन्सीडर करतोय त्या हिशोबाने ३७ कोटी ५० लाख हे आम्ही फोरकॉस्ट केलेले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, सन २००३-०४ ला २६ कोटी रुपये, सन २००४-०५ ला २४ कोटी रु. वर आम्ही आलो आणि सन २००५-०६ ला त्याच्यापेक्षा ही आम्ही खाली आलो २४.३१ आता आपण जी १० टक्के वाढ प्रस्तावित करुन

हा जो आकडा काढला आहे तो मागे कुठे गेला? हा आकडा मागे कसा फेर होत गेला. मग सन २००३-०४ पासून जर १० टक्के ने वाढ झाली तर २६ खे् २८ व्हायला पाहिजे होते आणि २८ चे ३१ व्हायला पाहिजे होते. ३१ ते ३४ व्हायला पाहिजे होते आणि ३४ ते ३७ हे २००६-०७ ला व्हायला पाहिजे होते आणि मग २००८ ला किती तर ४२ व्हायला पाहिजे. तुमच्या १० टक्के च्या रेशिओने जर आम्ही चाललो तर हे गणित स्पष्ट आहे की, सन २००३-०४ ची रक्कम आम्ही १० टक्के ने वाढवित गेलो तर आज आम्ही ४२-४५ पर्यंत येतो.

**अजिज शेख (मा. आयुक्त सो.) :-**

सन २००३-०४, २००४-०५, २००५-०६ च्या ज्या फिगर दिलेल्या आहेत त्या ॲक्च्युअल वसूलीचे फिगर दिलेल्या आहेत त्या ॲक्च्युअल वसुलीचे फिगर आहेत आणि त्यामध्ये त्यापूर्वीच्या वर्षामधल्या थकबाकीच्या रक्कमा होत्या त्यासुद्धा त्यामध्ये ॲड झालेल्या आहेत. त्यामुळे जे हेरिशन दिसते ते २६ लाखानंतर २४ लाख आले. २४ कोटी ७० लाखावरून ते २३ कोटी ३१ लाख रुपये आले. ह्या फिगर डिकलाईन होत गेलेल्या दिसत आहेत तर ते ॲक्च्युअल वसूलीच्या आधारावर आपण कुट केलेले आहेत.

**प्रफूल्ल पाटील :-**

माझे एकच मत आहे की, जेव्हा १० टक्के वाढ आपण अपेक्षित धरता व दुसरी गोष्ट दरवर्षी तुमच्याकडे मालमत्ता वाढवतात व मालमत्तांवर तुम्ही नवीन कर लावता, मधल्या तीन वर्षामध्ये आम्ही टॅक्सवाढ केली. या तीन गोष्टीवर किती टॅक्स वाढला आहे. त्याच्यासमोर तुमचे रिबेट आणि बिबेट काहीच नाही. आपण अंदाज करताना आपली जबाबदारी बाजूला ठेवून आपण अंदाज करायचा म्हणजे आम्हाला पुढे काय करायला नको असा अर्थ होतो का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ही केवढी दुदैवी बाब आहे की, जो आकडा मी विचारत होतो तेव्हा आयुक्त साहेब बोलले की नंतर देतो आणि सत्ताधारी पक्ष विचारतो तर त्याला तुम्ही एक एक तास देता व आम्ही सत्ताधाऱ्यांचा प्रयोग केला तर तुम्हाला राग येतो आणि जेव्हा मी मुद्देसुद बोलत होतो तेव्हा तुम्ही मला बोलू दिले नाही. म्हणजे शेवटी कशी अब्रु घालवायची आहे ती घालवा.

**शरद बेलवटे :-**

सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब, मागील तीन वर्षाची तुम्हाला मी डिटेल देतो की, सन २००२-०३ मध्ये आयुक्तांचे अंदाज ३० करोड रुपयाचे होते. त्यामध्ये ॲरीअर्स , करंट डिमांड आणि ॲडीशनल होणारी कर वाढ. त्यानंतर त्यावेळेला स्थायी समिती व मा. महासभेने आणखीन चार कोटी रुपयाची वाढ सुचविली आणि ते डिमांड ३४ कोटीवर नेले. परंतु, मूळात सन २००२-०३ ला ३० कोटी रुपयेच अपेक्षित उत्पन्न होते आणि त्यावेळची वसूली २१ कोटी ६१ लाख रुपये झालेली होती आणि ॲरीयर्स तफावत १२ कोटी रुपयाची होती. पुढच्या वर्षामध्ये सन २००३-०४ मध्ये ३४ कोटी रुपयाचे डिमांड आयुक्तांनी दिले होते त्याच्यामध्ये पुन्हा ॲरीयर करंट डिमांड आणि जी काही वाढ होणार ते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन २००३-०४, २००४-०५, २००५-०६ ला तुमचा करंट डिमांड किती होता?

**शरद बेलवटे :-**

त्यावर्षी ३४ कोटी रुपयाचे डिमांड दाखवलेले होते त्याच्यामध्ये २६ कोटी रुपयाची वसूली झाली. २६ कोटीमध्ये मोठया प्रमाणात ॲरीयर्स वसूल झाले होते आणि त्यावेळेला ते डिमांड महासभेने ३७ कोटीवर नेले होते. पण ॲक्च्युअल फिगर ३४ कोटी रुपयाचाच होता.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्यापद्धतीमुळे तुम्ही ४० कोटीवर जातच नाही.

**शरद बेलवटे :-**

आता ४० कोटी नाही...

**प्रफुल्ल पाटील :-**

तिथे २५ कोटी करा.

**शरद बेलवटे :-**

३७ कोटी ५० लाखमध्ये पुन्हा ॲरीयर्स, करंट डिमांड आणि ॲडीशनल १० टक्के वाढ धरली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

करंट डिमांड बजेटवर आहे ना. त्याच्यात मागची बाजू कुठे आली? जर आपण मागची बाजू धरली तर सन २००२-०३ पासून आपण १० टक्के वाढीव दाखवा ना.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यहासिधा-साधा मुद्दा है। जब आपका अंदाजपत्र है सन २००६-०७ का ४० करोड रु. तो आप सन २००७-०८ मे ४५ करोड नही बना सकते है। टॅक्स मे नया नही लगेला क्या? ४० करोड का ४८ करोड रुपया नही हो सकता क्या? तो आपकी कही ना कही चूक है, गलती है। आप गलती को एक्सेप्ट करो ना।

**शरद बेलवटे :-**

सन २००२-०३ मे प्रशासनने आपको जो फिगर दिया था ३० करोड....

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अभी शहर मे नया टॅक्स नए कर से लग रहा है ना।

**शरद बेलवटे :-**

नही लग रहा है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

वहाभरनेका सवाल ही नही पैदा होता है। कही ना कही आपकी प्रशासन की चूक है।

**हॅरल बोर्जीस :-**

बेलवटे साहेब, सन २००२-०३ ला आपण आयुक्तांचे अंदाज ३० कोटी सांगत आहात त्याच्यामध्ये ४ कोटी वाढ करुन ३५ कोटी रुपये झाले. २१ कोटी ६१ लाखाची वसूली झाली व १४ कोटी रुपये थकीत झाली. आता ह्या २१ कोटी ६१ लाखामध्ये सन २००२-०३ याच्यामध्ये तुमची मागील वसूली किती केली व चालू वसूली किती केली?

**शरद बेलवटे :-**

३० कोटी आयुक्तांच्या अंदाजानंतर ३४ कोटी वर गेलेला ३४ कोटीनंतर पुन्हा ३७ कोटी झाले.

**हॅरल बोर्जीस :-**

सन २००२-०३ ची सुरुवात बरोबर केली पण जेव्हा सन २००३-०४ या वर्षात आलात तेव्हा थकबाकी राहिली.

**शरद बेलवटे :-**

पुढे वसूल झालेले आहे म्हणून डिमांड...

**रिटा शाहा:-**

साहेब, माझा महत्त्वाचा मुद्दा असा होता की, आपला जो वसूली करणारा कर्मचारी आहे तो ह्याच्यावर सिरीयस नाही. ते आपल्याला कबूल करावे लागेल.

**शरद बेलवटे :-**

स्थायी समितीमधून मोठया प्रमाणात वाढ करण्यात आली.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी मागील तीन वर्षाचा लेखाजोखा आपल्याकडे मागितलेला आहे. त्याच्यामध्ये चालू व मागील वर्षाची वसूली किती केली ते सभागृहाला सांगा.

**विजय पाटील :-**

सन २००२-०३ ला आपली मागील जी डिमांड होती ती १६ कोटी ५४ लाख इतकी होती. चालू १७ कोटी ४५ लाख रुपये एकूण ३४ कोटी त्यापैकी वसूल झालेले मागील ८ कोटी ७२ लाख चालूपैकी १२ कोटी ८८ लाख रुपये झालेले आहेत आणि एकूण वसूली सन २००२-०३ ला फक्त घरपट्टी २१ कोटी ६१ लाख रुपये झालेली आहे. अग्नेस्ट ३४ कोटी रुपयाच्या २२ कोटी रुपये वसूल झाले.

**रिटा शाहा:-**

आपली टोटल वसूली केवढी आहे? आपल्याला वसूली किती करायची आहे?

**विजय पाटील :-**

चालू वर्षाची डिमांड ३४ कोटी १५ लाख रुपये.

**रिटा शाहा:-**

त्याच्यामधून वसूल किती झाले?

**विजय पाटील :-**

आतापर्यंत २६ कोटी रुपये वसूल झालेले आहे.

**रिटा शाहा:-**

किती परसेन्टेज झाले?

**विजय पाटील :-**

२६ कोटी ५१ लाख रुपये वसूल झालेले आहेत.

**रिटा शाहा:-**

ह्याचा अर्थ तुमचा जो मागचा बजेट आहे व तुम्ही जेवढे आकडे दर्शविले तेवढया आकडयामध्ये कुठे ना कुठेतरी वाढ केलेली आहे. मुद्दामच वाढ झालेली होती. तुमची ॲक्च्युअल वसूली आणि तुम्ही केलेली वसूली म्हणजे ८ करोड रूपये तुमचे वसूल करण्याचे बाकी आहे. म्हणजे आपली ८०% वसूली झाली.

**विजय पाटील :-**

आता आपली ६७ टक्के वसूली झालेली आहे.

**रिटा शाहा:-**

म्हणजे ४० टक्के वसूली बाकी आहे. मग आपण बजेट बनवताना जो अंदाज घेतो त्या अंदाजामध्ये किती वाढ करायची तेही महत्त्वाचे आहे ना.

**विजय पाटील :-**

१० टक्के वाढवायला पाहिजे. पण तुम्ही सन २००३ पासून २००७ पर्यंत बघा आपण किती टक्के वाढविले आणि ते वाढवल्यानंतर ऑन दि पेपर दिसणारच आहे. मग आता तुम्हाला ती वसूली दाखवावी लागेल. आपला अंदाज कुठे ना कुठे कोशात आहे.

**दिनेश नलावडे :-**

प्रभाग समिती क्र. ३ मधून गेल्यावर्षी सन २००५-०६ च्या अंदाजपत्रकामध्ये किती प्रमाणात टॅक्सची वाढ झाली?

**विजय पाटील :-**

एकूण अडीच कोटी रुपयाची वाढ झालेली आहे.

**दिनेश नलावडे :-**

आणि लेखापरिक्षक श्री. बेलवटे साहेब सांगतात की ४० चे ४८ होणार नाही. पण अजून देखील आमच्याकडे काही बिल्डिंग शिल्लक आहेत त्यांना अजून टॅक्स लागला जात नाही. ह्याच्यामध्ये ही महापालिकेने नुकसान करुन घेतलेले आहे. पाच-सहा वर्षापासूनचा बिल्डिंग तयार असताना त्यांना टॅक्स लावण्यात आलेला नव्हता. पण गेल्यावर्षी सन २००५-०६ मध्ये अडीचशे ते तीनशे कोटी रुपयाचे एक्स्ट्रा महानगरपालिकेचे उत्पन्न वाढलेले आहे. आपली महानगरपालिका अजून कुठे मागे आहे? टॅक्स विभागामध्ये पाठीमागे का येते?

**विजय पाटील :-**

पाठीमागे आलेली नाही. आयुक्तांचे अंदाज होते ३७ कोटी ५० लाख रुपये, स्थायी समितीने ते ४० कोटी रुपये केलेले आहेत. हा जो फिगर दिलेला आहे हा योग्य आकडा आहे असे वाटते.

**दिनेश नलावडे :-**

चालू वर्षामध्ये प्रभाग क्र. ३ मधून २००७ व २००८ मधून आपल्याला अंदाजित सांगतो की, कमीत कमी चार-पाच कोटी रुपयाचा एक्स्ट्रा उत्पन्न मिळण्याचे साधन आहे. जर बरोबर चेक केले आणि अधिकारी चांगले काम करत असतील तर चार ते पाच कोटी रुपयाची वाढ होउ शकते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, नगररचना विभाग व कर विभाग या दोघांचा सर्व्हे होउन कुठली मालमत्ता वाढलेली आहे. हे कोणला पडलेले नाही. हे त्यांना विचारायला जात नाही व ते ह्यांना विचारायला येत नाही. म्हणून या महापालिकेमध्ये नुकसान झालेले आहे. मालमत्ता कराबाबत या महापालिकेमध्ये कोटयावधी रुपयाचे नुकसान आहे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, माझ्या वॉर्डमध्ये अशा कितीतरी बिल्डिंग आहेत की, त्यांना टॅक्स लागलेला नाही. समोरून लोक येतात. त्यांना नोटीसा देतात की, आम्ही तुमचे कनेक्शन कापू. पण तुमच्याकडून जर त्यांना दिले गेले नाही तर ते टॅक्स कुठून भरणार? आणि ह्याचा सर्व्हे कोणी करायचा? अधिकाऱ्यांनी करायचा की, आम्ही करायचा?

**प्रफुल्ल पाटील :-**

पाण्याचे कनेक्शन आहे पण टॅक्स लावलेला नाही.

**लिला पाटील :-**

काही काही बिल्डिंगला एक वर्षाच्या अगोदर टॅक्स भरलेला आहे. त्यानंतर त्यांना तीन-तीन वर्षे बिल दिलेच नाही. असे ही प्रकरणे आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयुक्त महोदय, यावर्षाची सन २००६-०७ ची करंट डिमांड सांगा.

**अजिज शेख (मा. आयुक्त सो.) :-**

२४ कोटी ५१ लाख रुपये.

**प्रफुल्ल पाटील :-**

जर करंट डिमांड २४ कोटी रुपये असेल तर हे एवढे ४० कोटी रुपयाचा फिगर कसा आला आणि हे २४ कोटी रुपये किती वर्षापासून येत आहे. सन २००३-०४ पासून २४ कोटी रुपयेच आहेत.आपण असे म्हणता की प्रत्येक वसूलीमध्ये मागची वसूली आहे.

**अशोक पाटील :-**

श्री. विजय पाटील साहेब, मागील वर्षाची नविन कर आकारणी किती रुपयाची झाली?

**विजय पाटील :-**

सन २००५-०६ ची २४ कोटी रुपये व या चालू वर्षामध्ये २४ कोटी ५१ लाख रुपये असे एकूण गेल्यावर्षी दिड कोटी रुपयाची वाढ केलेली आहे.

**अशोक पाटील :-**

शहरामध्ये नविन वसाहती निर्माण झालेले आहेत.

**विजय पाटील :-**

गेल्या वर्षीच्या आणि ह्या वर्षीच्या चालूमध्ये १ कोटी ५१ लाख रुपयाची वाढ झाली आहे.

**अशोक पाटील :-**

सन २००५-०६ साली किती कोटीची वाढ झाली?

**दिनेश पाटील :-**

श्री. विजय पाटील साहेब, प्रभाग क्र. ३ मधूनच तीन कोटी रुपयाची वाढ झालेली आहे. मग आपण अडीच कोटी कसे बोलता? काहीतरी गडबड होत आहे.

**विजय पाटील :-**

श्री. दिनेश नलावडे साहेब, आपण म्हणता ते बरोबर आहे. १ कोटी की, सव्वा कोटी रुपयाची वाढ झाली आहे ती एकूण आली. त्याच्यामध्ये शिक्षण कर, रोजगार हमी हे सर्व फिगर त्याच्यामध्ये आले म्हणून ते दिड ते पावणे दोन कोटी रुपये दिसत आहे. पण जी ॲक्च्युअल घरपट्टी आहे त्याचा दिड ते पावणे दोन कोटी रुपयांचा फिगर वाढलेला दिसत आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आता सध्या चार महिन्यापूर्वी फक्त टॅक्स लागला व त्या बिल्डिंगची वसूली चालू आहे व भरपूर मोठया प्रमाणात वसूल केलेली ही आहे. ८० टक्क्यापर्यंत वसूली झालेली आहे व २०% रक्कम बाकी आहे. ती दाखवत नाही.

**विजय पाटील :-**

ती रक्कम ह्याच्यामध्ये आलेली आहे. आपण फक्त घरपट्टीच्या फिगरबाबत बोलत आहोत. बाकी शिक्षण कर, रोजगार हमी नाही तर मालमत्ता कराबाबत आम्ही बोलत आहोत.

**दिनेश नलावडे :-**

आयुक्त साहेब, आपण जेव्हा बिल्डिंगला टॅक्स लावतो तो बिल्डिंग पूर्ण झाल्यानंतर की काही लोक त्याठिकाणी येतात. आपण त्यांना सर्व सुविधा देतो. लोक राहतात. चार पाच वर्षानंतर सोसायटीचे रजिस्ट्रेशन होते त्यावेळी आपण टॅक्स लावतो. प्रोसिजर काय? ज्याठिकाणी ज्या ज्या बिल्डिंगला त्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली चार-पाच वर्षे टॅक्स लागला नाही आणि आपल्या महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे साधण ही तेच आहे व हे जे नुकसान होत आहे त्याच्यावर कार्यवाही कोण करणार आहे व तिथे त्या अधिकाऱ्यांची जबाबदारी काय आहे? मी तुम्हांला अश हजारो सोसायट्या दाखवितो.

**विजय पाटील :-**

मध्यंतरी आपण सर्व्हेक्षण केले होते. प्रत्येक ठिकाणी जावून प्रत्येक इमारतीचे सर्व्हेक्षण केलेले आहे. भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम), मिरारोड येथील सर्व्हेक्षणाची ज्या इमारतींना कराची आकारणी झालेली नाही अशा इमारतीचे सर्व्हेक्षण करुन प्रत्येक इमारतीला कराची आकारणी केलेली होती.

**दिनेश नलावडे :-**

आयुक्त साहेब, मला ह्या विषयी बोलायचेच होते, मी आपल्या निर्दशनात एवढे आणून देतो की, जेव्हा आपण टॅक्स आकारणी करतो तेव्हा आपण त्यांना अगोदरच पाणी कनेक्शन दिलेले आहे असे दिसते. तसे कनेक्शन देताना आपण त्या बिल्डिंगला टॅक्स लागला किंवा नाही त्याची पाहणी करतो की नाही. अगोदी पाणी कनेक्शन दिले जाते व नंतर टॅक्स लागतो असे कसे काय होते? हे असे झालेले आहे आणि साहेब, आता जो एकदम तीन करोड रुपयाचे आपले उत्पन्न वाढले आहे.

**अनंत पाटील :-**

पाटील साहेब, राई-मुर्धा कंपनी, उपरीटंड कंपनी ते गेल्या दोन वर्षापासून सील केले आहे व त्या कंपन्या आता खोलल्या गेलेल्या आहेत व त्याचा व्यवहार चालू आहे आणि त्या कंपन्यांकडून १० ते १५ लाखाची वसूली करायची आहे त्यासाठी आपण काय कार्यवाही केली? आपली वसूली झालेली आहे का?

**विजय पाटील :-**

ती जी प्रॉपर्टी आहे ती जप्त करण्याची कार्यवाही करत आहोत. पेपरमध्ये त्याची ॲड दिली जाईल व कार्यवाही केली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ही चुकीची माहिती आहे. त्याठिकाणी मी स्वतः गेलो होतो. तिथे दोन सर्व्हे आहे. त्या मालकाने एक सर्व्हे नंबर खरेदी केलेला आहे. त्याने महापालिकेचे पैसे भरले आहेत व प्रॉपर्टी टॅक्स ही भरलेला आहे. तरी देखिल आपण बोलता. तुम्हाला याबाबत काय माहितच नाही का?

**अनंत पाटील :-**

आपली सील तोडून त्याने कंपनीचा व्यवहार चालू केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या मालकाने पैसे भरलेले आहेत. तुम्ही जावून सील खोलली आणि तुम्हीच जप्तीच्या गोष्टी करतात. तुम्हाला ती गोष्ट माहित नाही असे वागता.

**अनंत पाटील :-**

सील लावलेले तोडले आहे आणि त्याची वसुली करणे आपल्या हातात जरी असले तरी आपण असेच सोडलेले आहे. आपण त्याच्यावर कुठली कारवाई करणार? कारवाई करुन १५ लाखाची वसुली करु शकता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे जे सांगातात, तर त्याठिकाणी कधी सील मारलेली आहे हे देखिल तुमच्या लक्षात आहे का? सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे या केबिनमध्ये ज्या ए. सी. लावलेल्या आहेत त्या काढून टाका. मग ते बरोबर बाहेर फिरतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, याठिकाणी सन २००३-०४, २००४-०५, २००५-०६ यांचे करंट डिमांड कृपया सांगावे.

**विजय पाटील :-**

करेट डिमांड १९ कोटी ९० लाख रुपये.

**प्रफुल्ल पाटील :-**

मागची थकबाकी किती आहे?

**विजय पाटील :-**

१२ कोटी ३७ लाख रुपये.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन २००५-०६ ची करंट डिमांड आणि थकबाकी सांगा.

**विजय पाटील :-**

सन २००४-०५ ची २२ कोटी ८९ लाख रुपये आणि मागची थकीत १० कोटी ३९ लाख रुपये.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन २००५-०६ ची डिमांड सांगा.

**विजय पाटील :-**

मागील १० कोटी ४३ लाख आणि चालू २४ कोटी रुपये

**प्रफुल्ल पाटील :-**

सन २००५-०६ व २००६-०७ ची मागणी एकच आहे.

**विजय पाटील :-**

सन २००६-०७ ची ११ कोटी १५ लाख रु. व २४ कोटी ५१ लाख रुपये.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण म्हणता की, १० टक्के आम्ही वाढ दाखवितो. १० टक्के वाढ दाखवितो आणि दरवर्षी नविन प्रकरणे तुमच्याकडे येतात आणि तुम्ही टॅक्स वाढवलेले आहेत. आता जर तुम्ही सन २००३-०४ मध्ये जर तुम्ही ३ कोटी रुपयाने उत्पन्न वाढविले तर सन २००४-०५ ला अजून ३ कोटी रुपयाने उत्पन्न वाढले पाहिजे. सन २००५-०६ ला त्याच्यापेक्षा अजून उत्पन्न वाढले पाहिजे. तुमचा हा जो रेशिओ हा तुमचाच जुळत नाही. याठिकाणी मालमत्ताची प्रस्तावित करवाढ ही ५ कोटी रुपये वाढविलेले आहेत. ५ कोटी रुपयाची वाढीव तरतुद करावी आणि ही तरतुद बांधकाम विभागासाठी द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब, सन २००३-०४ मध्ये ४ कोटी रुपयाची तुट आहे. सन २००४-०५ मध्ये १२ कोटी रुपयाची तुट आहे आणि सन २००५-०६ मध्ये १४.१९ = ३० कोटी रुपयाचे जवळ जवळ चालू वर्षाचे येणे बाकी आहे. ह्याच्यामध्ये ५५ करोड रु. करावे म्हणजे १५ वाढवावे. या शहरामधल्या कुठल्याही बिल्डरचे फ्लॅट आपण ताब्यात घेतलेले नाही. लिलाव केलेला नाही. थकबाकीदारांना थकबाकी अशा नोटीसा काढल्या आहेत. महापालिकेचा प्रचंड पैसा लाखो रुपये त्याच्यावर खर्च केलेला आहे. पण एकही फ्लॅट महापालिकेने प्रशासनाने ताब्यात घेवून त्याचा लिलाव केलेला नाही. असे किती फ्लॅटचे आपण लिलाव केलेले आहेत. जाहिर लिलाव केलेला नाही. आपण नोटीसा काढल्या आहेत. पान भरुन वर्तमानपत्रामध्ये लाखो रुपयांची बिल भरुन नोटीसा काढल्या आहेत. आपल्याला हे माहित आहे. त्यावेळी आपण स्थायी समितीमध्ये होतो. पण त्या एका ही फ्लॅटचा लिलाव झालेला नाही. पण त्या जाहिरातीची वसुली आपण काढली का? काहीच नाही. त्यामानाने आयुक्तांचे अंदाजसुध्दा येथे चुकलेले आहेत. स्थायी समितीचे ही अंदाज चुकलेले आहेत. तिथे ५५ करोड रुपयाची फिगर घ्यावी. १५ जास्तीत जास्त, आम्ही ३० म्हणत नाही. आपण ज्या जाहिराती दिल्या होत्या त्याची फक्त नोंद काढा. आयुक्त साहेब, आपल्या सहीच्या ज्या जाहिराती वर्तमानपत्रात आल्या होत्या त्याच्यामध्ये टॅक्स प्लस मालमत्ता याचा लिलाव तुम्हाला करायचा आहे. फक्त टॅक्सचा नाही. हाउस टॅक्स प्लस इमला म्हणजे स्ट्रक्चर याचा लिलाव करण्याचा नोटीसा आपण दिल्या होत्या. ती रक्कम तुमच्याकडे येणारच. तुमचे ५० हजार भरले नाही म्हणून तुम्ही त्यांचा २ लाखाचा फ्लॅट सेल करणार. लिलावाला गेलात तर त्याचे तुम्हाला ४ लाख मिळणार आहेत. पण ५० किंवा ४५ हजार रुपयामध्ये कोण ते घेणार नाही. त्याची

ही एक देखिल सिंगल केस झालेली नाही आणि एकेका बिल्डरच्या नावाने २०-२० फ्लॅट आपल्याकडे निघाले आहेत. माझ्याकडे तर नोटीसा वगैरे आहेत. म्हणून आपण ५५ ची तरतुद त्याच्यामध्ये करावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

विशेष शिक्षण कराबाबत याठिकाणी प्रशासनाने स्पष्टीकरण करावे. पण आपण जो विशेष शिक्षण कर दाखविला आहे तो विशेष शिक्षण कर या वर्षात वाढणार आहे का? त्याची टक्केवारी वाढणार आहे का?

**विजय पाटील :-**

रेटेबल व्हॅल्यु वर एक टक्का आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

जर रेटेबल व्हॅल्यु वर एक टक्का शिक्षण कर राहणार आहे तर गेल्या सन २००६-०७ ला तुम्ही शिक्षण कर किती दाखविलात आणि सन २००७-०८ ला किती दाखविता ते बघा.

**मिलन म्हात्रे :-**

वैती साहेब, त्या लेखाशिर्षकाचे क्लिअर करा. मग आपण पुढे जावू या.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याच्यामध्ये ४० कोटी रु. सन २००६-०७ ला मालमत्ता कर दाखविला. तिथे विशेष शिक्षण कर किती दाखविला तर ९४.६५ सन २००६-०७ जेव्हा ४० कोटी रु. तुम्ही मालमत्ता कर दाविला तेव्हा विशेष शिक्षण कर ९४.६५ दाखविला आणि सन २००७-०८ ला ४० कोटीचे उत्पन्न दाखवितात आणि विशेष शिक्षण कर १ कोटी ४४ लाख मग ५० लाख रु. जर इथे विशेष शिक्षण कर वाढतो. याचा अर्थ तुमचा मालमत्ता कर ९९ टक्के वाढला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, बजेटवर जी चर्चा सुरु आहे ती जेवणानंतर पुर्नश्च सुरु राहील व आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर ही दिले जाईल.

(लंच टाईम दु. २.४५)

**नगरसचिव :-**

जेवणानंतर पुन्हा बजेटच्या चर्चेला सुरुवात करावी ही विनंती.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, मगाशी विषय असा होता की, सन २००६-०७ साली ४० करोड रुपये मालमत्ता कर दाखविला होता. त्याच्यावर विशेष शिक्षण कर हा ९४ लाख रुपये. आता २००७-०८ ला तेवढेच अपेक्षित आहे, मालमत्ता कर ४० कोटी रुपये. पण विशेष शिक्षण कर मात्र, १ कोटी ४४ लाख रु. झाले तर हा १ कोटी ४४ लाख रु. कसे होईल? जर तुमची मागणी ४० कोटी रुपयाची होती.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, १ कोटी ४४ लाख रु. आपण जे विशेष कर म्हटलेले आहे ते आपण रेटेबल व्हॅल्युवर डिटरमिन केलेले आहे. कॅलक्युलेट केलेले आहे. रेटेबल व्हॅल्यु आहे त्याच्या १ टक्के आपण शिक्षण कर घेत असतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमची तीच रेटेबल व्हॅल्यु दाखवून ४० कोटी रु. २००६-०७ दाखवले. २००६-०७ जेव्हा तुमचा ४० कोटी रुपयाचा मालमत्ता कर आहे. मग तिथे तुमचा विशेष शिक्षण कर ९४ लाख रु. कसा आला? मग तो ही १४४ लाख रु. यायला पाहिजे. विशेष शिक्षण कर १४४ लाख रु. न करता ४५ कोटीच्या बरोबरीचा करावा. ४५ कोटी उत्पन्नाला जोडून तो प्रोरेटा विशेष कर करावा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आपण मालमत्तेची रक्कम दाखवलेली नाही. मालमत्तेचा लिलाव कुठेही दाखविलेला नाही म्हणून मी ५५ सांगत आहे. माझे जे ५५ चे प्रपोझल ते निरंक आहे. तुम्ही पेपरच्या नोटीसा काढल्या आहेत. त्यांची लिलावाची मुदतही पार झाली आहे. प्रशासनाने एक ही इमला किंवा एकही फ्लॅटचे लिलाव केलेले नाही. मग त्या लिलावाची रक्कम आपण ह्याच्यात का ॲड करु नये? शेकडोने फ्लॅट आहेत, शेकडोने प्रॉपर्टीज आहेत म्हणून मी ५५ चे सांगत आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण जप्तीची कार्यवाही केलेली होती. त्याप्रमाणे काही ठिकाणी स्थवर मालमत्ता व जनरल मालमत्ता अशा कारवाया आपण केलेल्या होत्या. परंतु, प्रत्यक्षात जी लिलावाची कार्यवाही आहे ती आपण केलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तशातल्या किती प्रॉपर्टीचे आपण लिलाव केले नाही. आणि त्याची येणारी रक्कम आपण दाखवलेलीच नाही. त्या लिलावाची रक्कम तुम्ही ॲड करुन फिगर घ्या. एका फ्लॅटचे दोन हजार रुपये फक्त हाउस टॅक्स आहे. लिलावाची येणारी रक्कम तीन लाख रुपये आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

लिलावाच्या कारवाईमध्ये आपली जी रक्कम येणं असते, ती आपण आपल्या फंडामध्ये जमा करुन घेतो आणि उर्वरित रक्कम आहे ती संबंधितांना देत असतो.

**मिलन म्हात्रे :-**

मग, वर्तमानपत्रामध्ये ज्या नोटीसा निघालेल्या होत्या त्या हजाराने नोटीसा होत्या. त्या रक्क्मेचा आपण इथे कुठे उल्लेख केला आहे का? आणि हे पुढे वर्षभर चालणारच आहे. अख्खे टॉवरच्या टॉवर बाकी आहेत. मोठमोठया बिल्डर लोकांच्या १५-२० फ्लॅट तुम्हाला तुमच्या ताब्यामध्ये घ्यायचे आहे त्याचा लिलाव करायाचा आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण जरी लिलाव केला तरी आपल्याकडे तिच रक्कम जमा होणार जी आपण डिमांडमध्ये दाखवलेली आहे. उर्वरित जी रक्कम होणार आहे ती...

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे ती रक्कम थकबाकीमध्ये आली. परत एकदा सांगतोय सन २००३-०४, ४ कोटी रुपये, २००४-०५ १२ कोटी रु., २००५-०६ १४.१९ कोटी रु. आणि सर्व मिळून ३० कोटी रुपये झाले. तुमचे हे यायचे आहे ते यायचे आहे, ते ॲड नाही म्हणजे ते थकबाकीमध्येच येणार ना. ही अमाउंन्ट ही तुमचीच फिगर बोलत आहे. आम्ही बोलत नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

३० कोटी रुपये आपण कसले म्हणता?

**मिलन म्हात्रे :-**

२००५-०६ पर्यंत असे गेल्या तीन वर्षाचे तुमचे येणं बाकी आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

सन २००३-०४ ला जी करंट रक्कम होती ती १९ कोटी ९० लाख रु. आणि त्यामध्ये १२ कोटी ३७ लाख रुपये थकबाकीमध्ये वसूली झालेली आहे व त्यामध्ये आपली जी वसुली होती ती करंट मधली होती आणि थकबाकी पैकी १० कोटी ३९ लाख रुपये....

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण हा जो ४० कोटीची फिगर देता त्याच्यामध्ये ३० टक्के तुमचे किती प्रलंबित आहे ते बघा ना त्याकरिता आम्ही तुम्हाला ५५ करायला सांगत आहोत. ही वसूली कोणीच करत नाही. एवढी अपेक्षित रक्कम दाखविली आहे. त्यामुळे आता काही गरज नाही. वसुली कोणी करत नाही. ३१ नोव्हेंबर पर्यंत तुमची ८० टक्के रक्कम वसुल झालेली नाही हे अगदी सुर्यप्रकाशा एवढे स्वच्छ आहे. तुम्हांला ज्या ज्या मुभा द्यायच्या आहेत त्या प्रशासनाने, स्थायी समिती, महासभेने आम्ही सर्व ठराव पास करुन सर्व मशिनरी पुरविली आहे. स्टाफ ठेक्यावर दिला. वाहने भाड्यावर दिली नवीन वाहने आणुन दिली. तुम्हाला आम्ही सगळं केले.

**अजिज शेख ( मा. उपायुक्त सो.) :-**

आता जे आम्ही तुम्हांला फिगर दिलेल्या आहेत ते थकबाकी आणि कंरटची अशी मिळुन आम्ही तुम्हाला एकंदरीत रक्कम दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची बाकी किती आहे? ती ॲड करा व ५५ फिगर करा. आम्ही तेच बोलत आहोत. तुमचे गाडे पुढे जातच नाही. वसुली होत नाही आणि फिगरही पुढे जात नाही.

**अजिज शेख ( मा. उपायुक्त सो.) :-**

आपण जे सन सन २००३-०४ किंवा त्यानंतरच्या वर्षाची जी थकबाकी रक्कम म्हणत आहात ह्यामध्ये पुढच्या वर्षामध्ये थकबाकी पैकी काही रक्कम वसुल झालेली असेल. करंटपैकी काही वसुल झालेली असते त्याच्या आधारावर आपण नेट डिमांड फिक्स करत असतो. समजा, सन २००३-०४ ला ४ कोटी रुपये जर थकीत असेल तर त्याची वसुली पुढे झाली नाही असे म्हणता येणार नाही ना. त्यातली काही रक्कम वसुल झालेली असते.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे २००४ वगैरे सोडा. आता सन २००६-०७ चे बोलू या. नोव्हेबर महिन्यामध्ये ८० टक्के वसुली क्रॉस केली का?

**विजय पाटील :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जे आज झाले नाही जे उद्या होणार कशावरुन आपण बोलता. हे तर आम्ही प्रॅक्टीकली अनुभवतोय की, झालेले नाही, म्हणजेच पुढे येणार नाही. म्हणून तुम्ही ती जी दाखविता तो मोठा फिगर इथे दाखवा. ते ४५ बोलत आहेत मी ५५ बोलतोय. आपण जे काय खर्च केले, वर्तमानपत्राच्या जाहिरातीवर लाखो रुपये आपले खर्च झालेले आहेत. तेवढे ते लाखो ही आपले वसुल झाले नसतील आणि त्याच्यामध्ये स्पेसिफिक तुम्ही

कालावधी दिलेला होता की, या कालावधीमध्ये अमुक अमुक रक्कम भरणा केली नाहीतर, प्रशासन अमुक अमुक करेल. त्या नोटीसमध्ये १०-१० हजाराच्या वर सर्व फिगर होते आणि शेकडो, हजारो नोटीसमध्ये ते खातेदार होते. ते आपण डिनाय करतो का? माझ्याकडे वर्तमानपत्राच्या कॉपी ठेवल्या आहेत.

**अजिज शेख ( मा. उपायुक्त सो.) :-**

आपण वसुलीसाठी प्रत्येक वर्षी अशा लोकांच्या याद्या जाहिर करत असतो. ज्यांच्याकडे ५ हजार किंवा १० हजारापेक्षा ........

**मिलन म्हात्रे :-**

आपण १०० लोकांचे केले हे बरोबर आहे. तर नोव्हेंबर महिन्यामध्ये त्याच्यातल्या ८० लोकांची तुम्ही वसुली केली पाहिजे हे तर सत्य आहे. ३१ तारखेपर्यंत आपण नोटीसचे धरु. ३१ नोव्हेंबरपर्यंत तुम्हाला ते कम्प्लशन आहे की, जी थकबाकी आहे ती तुम्ही वसुल करु शकता आणि केलीच पाहिजे. पण या येथे काहीच झालेले नाही. म्हणजेच आपला बॅकलॉक पूर्ण बाकी आहे. ही रक्कम तुम्ही इथे वाढवा आणि त्यामध्ये ही प्रोव्हीजन करावी त्याच्यातून आम्हाला जे काही उत्तर द्यायचे आहे ते द्या ना. येथे शिक्षण करासंदर्भात सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब बोलले त्याचा तुम्हाला अजून मेळ बसत नाही. फक्त तुम्ही १ टक्क्यांचा हिशोब करता आणि वर ते डिफरन्स बसत नाही. कुठेतरी आम्हाला ते बसेल असे काहीतरी सांगा. मी प्रश्न विचारला की, आपण ज्या नोटीसा काढल्या लिलाव झालेले नाही. नोटीसवर आपण खर्च केले. त्यानंतर १०० पैकी २० जणांना भरले असे समजा, बाकी ८० राहिले. त्यांचे आपण काहीच केले नाही. ही अशीच परिस्थिती आपण पुढे ठेवायची नाही. जो विचार देतो त्याचे सगळे तुम्ही घेता. म्हणजे टी.व्ही. फ्रिज हे सर्व आपण जप्त करता.

**अजिज शेख ( मा. उपायुक्त सो.) :-**

ह्यामध्ये जी टोटल डिमांड आहे थकबाकी आणि करंटचे त्याच्यामध्ये ८० टक्के किंवा ९० टक्के अशा आपण फिगर धरुन दिलेल्या नाही. आपण १०० टक्के डिमांड दिलेली आहे. त्यामुळे त्याच्यामध्ये आपण किती वाढ करणार आहे?

**मिलन म्हात्रे :-**

कशामध्ये?

**अजिज शेख ( मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही ज्या ३७ कोटी ५० लाखाचे कोडकास्ट केलेले होते. नंतर ते स्थायी समितीने ४० कोटी रुपये केलेले आहे. जे मा. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या पुस्तकामध्ये ९ नंबरचा जो सेक्शन आहे त्याच्यामध्ये ४० टक्के आपले प्रशासन म्हणते. आयुक्तांनीच आपल्याला डेप्रीशिएशन केले आहे. श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांच्या वेळेला चढता आलेख आहे आणि आताचे आयुक्तांचे डेप्रीशिएशन आहे की, ३७.५० कोटी करा. म्हणजे आयुक्तच बोलतात की, कमी वसुली करा, हे सरळ आहे. आयुक्तांचे प्रशासनावरचे अहवाल आहेत. हे पुढचे तुम्ही बघा ना.

**प्रफुल्ल पाटील :-**

ती वसुली नाही अंदाज आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी जर एखादा धंदा करतो किंवा व्यापार करतो तर मी मोठी अपेक्षा ठेवली पाहिजे ना. म्हणजे माझे मजूरवर्ग सांगतात की, आपण १ करोड रुपयाचा धंदा करायचा आणि मी सांगणार की, तुम्ही ७० केले तरी चालेल. हा असाप्रकार झाला आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो पान क्र. १ वर आहे आणि पहिल्या पानावर सर्वसाधारण करामध्ये मालमत्ता कर आहे. त्या मालमत्ता कराच्या फिगर याठिकाणी दाखविलेल्या आहेत. त्या प्रत्यक्ष जमा झालेल्या ज्या रक्कमा आहेत त्या दाखविण्यांत आलेल्या आहेत. सुधारीत अंदाज २००६-०७ चा जो आहे आणि नविन अंदाज २००७-०८ चा आहे. त्याच्यामध्ये फिगर्स प्रस्तावित केलेले आहेत. त्याच्यामध्ये प्रशासनाने जी फिगर दाखविलेली आहे ती ३७.५० ची आहे. त्याच्यामध्ये स्थायी समितीने वाढ करुन ती ४० पर्यंत नेलेली आहे आणि आता मा. महासभेमध्ये आपली जी काही चर्चा उपस्थित झालेली आहे. त्याबद्दल सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील चर्चा करत आहेत. ती चर्चा अजुनपर्यंत अपुर्ण आहे व त्यांनी जे प्रस्तावित केलेले आहे ते ४५ पर्यंत प्रस्तावित केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे ना. आम्ही तुम्हाला निराळे फिगर सांगतो ना. त्याचा उल्लेख तुम्ही कुठे केला आहे.

**मा. आयुक्त :-**

५५ ही फिगर आपण कशी ग्राह्य धरणार आहे?

**मिलन म्हात्रे :-**

पुढचे ४ कोटीचे थकबाकी आहे. १२ कोटीचे आहे.१४.१९ = ३० हे फिगर्स समोरच आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्या ज्या फिगर्स आहेत. त्याच्यामध्ये आपण जे सांगत आहात त्या सगळ्या रक्कमा विलीन झालेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा हा जो अहवाल दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपण हा जो अहवाल वाचन आहात.

**मिलन म्हात्रे :-**

या अहवालामध्ये आपल्या हाउस टॅक्सने काय काय दिवे लावले आहेत ते दिसत आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या बाबतीमध्ये आपण बोलत नाही. आपण बजेटवर बोलत आहोत अहवालावर आपण बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पण आम्हांला बोलायला लागते ना.

**मा. आयुक्त :-**

आपण काय बोलायचे आहे ते आपण बोला. अहवालाच्या बाबतीमध्ये आपण बोलत नाही. आपण बजेटच्या ज्या फिगर्स आहेत. त्याच्यावर आपण बोलत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

हा अहवाल का दिलेला आहे. तर प्रशासनाने अजुनपर्यंत काही केले नाही. आणि काय करायचे आहे? म्हणुन महापालिका किती लॉसमध्ये आहे. ते दिसत नाही.

**मा. आयुक्त :-**

लेखा विभागाने जो अहवाल तयार केलेला आहे. तो महापालिकेच्या कायद्यातल्या तरतुदीप्रमाणे तो अहवाल दिलेला आहे आणि तो निर्देश दिलेले आहेत. त्या निर्देशाप्रमाणे तो अहवाल दिलेला आहे आणि तो अहवाल स्थायी समितीला सादर करण्यात आलेला आहे. आपण सभागृहामध्ये जी चर्चा करत आहोत ते बजेटवर चर्चा करत आहोत. आणि बजेटवर चर्चा करत असतांना जो अहवाल लेखविभागाने दिलेला आहे. त्याच्यामध्ये प्रत्येक डिपार्टमेंटने ज्या ज्या त्रुटी काढलेल्या आहेत. त्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी किंवा त्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्या त्रुटी दुर करण्यासाठी अंमलबजावणी अशाप्रकारे त्यांनी प्रस्तावीत केलेला अहवाल आहे. त्या अहवालाचे आणि ह्या बजेटचा काही संबंध नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे?

**मा. आयुक्त :-**

आपण बजेटचा विषय स्वतंत्र घेतलेले आहे. आपण बजेटच्या विषयावर चर्चा करणार आहोत तर आपण बजेटच्या विषयावर चर्चा करु या ना.

**मिलन म्हात्रे :-**

समजा, या अहवालामध्ये दिलेले आहे की, तुमच्या डिपार्टमेंटचे ५० करोड रुपये वसुल करायचे आहे. ते डिपार्टमेंटने केलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

तो जो अहवाल सादर केलेला आहे. तो आपल्या मुंबई प्रांतिक अधिनियमाप्रमाणेच अहवाल सादर केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी कुठे बोलतो की, बेकायदेशीर केला आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या अहवालाची पुर्तता स्थायी समितीला सादर करण्यात येईल. स्थायी समिती त्याच्यावर विचार करेल.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी सतितीने या सभेच्या अगोदर करायला पाहिजे होते. त्याला उशिर झाला आहे. हेच आम्ही सांगत आहोत.

**रिटा शहा :-**

साहेब, स्थायी समितीमध्ये हे झालेले आहे. स्थायी समितीमध्ये या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी त्यांना एक महिन्याची मुदत दिली. ती ही संपली आहे. हे मान्य करते की, बजेट आणि अहवाल यामध्ये काही घेणं देणं नाही. परंतु या अहवालामध्ये आपल्याला जी रक्कम वसुल करायची आहे. ती खोटी आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

लेखापरिक्षकाला कॉल करा ते सांगतिल ना.

**रिटा शहा :-**

साहेब, ती वसुलीच आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

कार्यवाही का होत नाही.

**मा. आयुक्त :-**

ती वसुली होणारच आहे. ती वसुली होते की, नाही. त्याचा जो अहवाल आपल्याला दिल्यावर आपण ते मान्य कराल की, काहीतरी प्रगती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेचा प्रगती अहवाल आलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीने ह्या अहवालावर एका महिन्यामध्ये पुर्तता करण्याबद्दल सर्व विभागांना निर्देशित केलेले आहे. आता पुढच्या आठवड्यामध्ये जी स्थायी समिती होईल त्या स्थायी समितीमध्ये हा अहवाल देण्यात येईल आणि जर त्यांनी त्याची पुर्तता केली नाही तर त्याच्यावर ॲक्शन निश्चित राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्या अगोदर महासभा होउन गेली.

**रिटा शहा :-**

साहेब, ते ही सांगा की किती वर्षाचा अहवाल आहे. आणि आपण त्यांना किती वर्ष संधी दिली आयुक्त साहेब, आपण जरा स्ट्रीक व्हा आणि त्यांना त्यांचे डिसीजन शिकवा हा एका वर्षाचा अहवाल नाही तर १० वर्षाचा अहवाल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मुख्यलेखापरिक्षकांना सागांयला सांगा की, ह्याच्यावर त्यांचे म्हणणे काय? त्यांचा ह्या ऑडीटशी काही संबध नाही. आजच्या मिटींगशी ही काही संबध नाही.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आपण हे वाचतांना काही ठिकाणी अधिकाऱ्यांची नावे आहेत. श्री. रमेश म्हात्रे, १ मे महाराष्ट्र दिन, त्यांच्या समोर १५,००० रु. लिहीले आहे. ह्याचा अर्थ १ मे हा दिन साजरा करण्याकरीता त्या कार्यक्रमासाठी त्यांनी जे पैसे घेतले, उचल केली त्याची बिल जमा केली नाही किंवा त्यांनी जिथे जमा केले असेल तिथे केले असेल. त्यातुन ऑडीटपर्यंत बिल पोहचले नाही. असा त्याचा अर्थ होतो.

**लिओ कोलासो :-**

साहेब, याचा अर्थ १५,००० रु. त्याच्याकडुन येणे आहे. असे होत नाही. त्यामुळे तो फिगर ऑडिटला घेणं आवश्यक नाही.

**मा. उपमहापौर :-**

तर ह्याच्यातल्या बऱ्याच गोष्टी समायोजित होतील. बऱ्याच गोष्टी प्लस पोलिओसाठी नोंदी आहेत त्या समायोजित होतील. आणि या संदर्भात स्थायी समितीचे सभापती मा. स्टिवन मेंडोसा साहेबांना आपण सभागृहाच्यावतीने विनंती करत आहोत की, पुन्हा एकदा याविषयामध्ये किती प्रगती झाली आहे. याचा आढावा घेण्यासाठी आपण एक सभा घ्यावी. आणि पुढच्या सभेला आपण थोडक्यात त्याची माहिती द्यावी. की, तो आलेख कसा आहे आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आपण जे सांगत आहात की, बजेटमध्ये ही रक्कम वाढवायची आहे तर दरवर्षी आपण अहवाल मागत होतो. श्री. नाकाडी साहेबांकडुन अहवाल अपेक्षित केला होता. तशी आपल्या सर्वांची मागणी होती. परंतु, श्री. बनसोडे साहेबांनी अहवाल देवुन खुप चांगल्या कामाला सुरुवात केलेली आहे. त्याच्यामध्ये आपण कुठे कुठे कमी आहोत किंवा कोणत्या डिपार्टमेंटमध्ये आपल्याला अधिक काम पेंडींग पडलेले आहे. तो विभाग कमजोर आहे. कमिश्नर साहेब, आपल्यालाच या सर्व गोष्टीचा पाठपुरावा करायचा आहे. आमच्या फक्त माहितीमध्ये आहे. आपण जी ५५ कोटीची संख्या करारामध्ये निश्चित करण्याचे सांगता तर मला वाटते की, ती तेवढी होत नाही. आता जेवढा फिगर स्थायी समितीने धरला आहे. त्यामध्ये अडीच कोटी रुपयाची वाढ धरलेली आहे आणि मा. महासभा, सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेबांच्या माध्यमातुन अडीचच्या ऐवजी अजुन ५ कोटी रुपये म्हणजे साडे सात कोटी रुपये आपण ऑलरेडी ह्याच्यामध्ये वाढ करत आहोत. ह्याच्यामध्ये आयुक्तांनकडील बजेट आलेला आहे. साडेसात कोटीं रुपये आपण त्याच्यात मा. महासभेची वाढ करत असु आणि त्याच्यात आपण सांगता ती वाढ करु म्हणजे ही वाढ साधारणपणे अजुन १० कोटीच्यावर जाते तर ते शक्य होणार नाही. तेवढे आपल्यालापुढे हाउस टॅक्स मिळेल असे वाटत नाही. आणि पहिल्यांदा आपण थोडेसे रियालिस्टीक बजेटकडे चाललो आहोत. बरीचशी बिल पेंडीग आहेत. बरीचशी काम अर्धवट कामामध्ये आहे त्याचे पेमेंट बाकी आहेत. बरीचशी काम अर्धवट जातील. पुन्हा आपण मागच्या बजेटसारखी उधारी पुढच्या वर्षावर ही टाकुन ठेवु. त्याच्यापेक्षा या बजेटच्या निमित्ताने या अधिकाऱ्यांना मी एक निवेदन करतो की, आपण जेवढी तरतुद केलेली आहे. तेवढ्याच कामांबद्दल जास्त प्रयत्न केले तर अधिक चांगले राहेल. अन्यथा “ ये रे माझ्या मागल्या, ही परिस्थिती परत परत पुढे येत राहिल आणि सन्मा. सदस्य

मिलन म्हात्रे साहेब, आपणाला जर याविषयावर असे वाटत असेल की, हा विषय या पध्दतीने मांडला तर आपला हाउस टॅक्स नक्की वाढतो तर असे एखादे उदाहरण आपण दिले तर आपल्याला अधिक पध्दतशीरपणे या विषयाची मांडणी करता येईल.

**रिटा शहा :-**

मुख्यत्वे आपण पहिलेच बोललो की, आपण कुणावर आरोप करत नाही. जो अहवाल दिला आणि ज्या अधिकाऱ्यावर पैसे बाकी आहे तर आमचे बोलण्याचा अर्थ असा नाही. की त्यांनी हे पैसे घरी नेले. कुठल्या ना कुठल्या कामासाठी त्यांनी ते पैसे घेतले असेल फक्त त्यांचे कर्तव्य होते की, त्यांनी ते पैसे कुठे वापरले आणि कसे वापरले हे ऑडीट डिपार्टमेंट आणि संबधित विभागाला द्यायला पाहिजे. त्याच्यामध्ये ते चुकले आहे. म्हणुन या बजेटवर आपला वेळ वाया गेलेला आहे. तर त्या अधिकाऱ्याला आपण समज घाला की, आठ दिवसात, पंधरा दिवसात पूर्ण माहिती द्या. स्थायी समितीपुढे ही सदर विषय ठेवायची गरज पुढच्या अहवालापर्यंत मला असे वाटते की, हे सर्व रेग्युलर होणार आणि आता येणाऱ्या वर्षामध्ये जे काही पैसे ते घेणार देणार त्याचा हिशोब बरोबर डिपार्टमेंटकडे देणार तर त्याचा प्रश्न परत भविष्यामध्ये उद्‌भवणार नाही आणि राहिले कराच्या बाबतीत तर कराच्या बाबतीत काही अशा इमारती, फ्लॅट जो आपला फॅक्टरी एरिया आहे जिथे टॅक्स बाकी आहे तो टॅक्स कसा वसुल करायचा त्याचा आपण पहिलांदा विचार करायचा आहे. आणि तुम्हाला नेमके सांगते की, आपण मिरा रोड कार्यालयामध्ये गेलात किंवा भाईंदर पुर्वेच्या कार्यालयात गेलो किंवा कूठेही गेलो तर उत्तर एकच मिळले की, सर्व लोक वसुलीवर गेले आहेत आणि गंमत अशी आहे की, वसुलीवर जातात. आणि ते मुख्यालयात येउन बसतात. मी डोळ्यांनी बघितले आहे. मी कोणाचे नाव घेत नाही. तशी माझी इच्छा नाही. परंतु, ते वसुलीच्या बहाण्याने मुख्यालयात येउन दोन तीन तास बसुन राहतात. मग वसुली कशी होणार? शासन आणि प्रशासन येथे बसुन भांडतो आपले कर्मचारी त्याच्यावर आहेत. वसुलीच्या नावावर आपल्याला जेव्हा झिरो निकाल मिळतो तेव्हा ते सर्व वादविवाद निर्माण होतात. मग आपण गेल्यावेळी दिलेले रिबेट जे आपण पब्लिकला दिले होते. तसे काहीतरी पारितोषीक किंवा त्यासाठी ज्या माणसाला वसुलीसाठी ठेवले त्याला काहीतरी शिक्षा व त्याने ८० टक्के वसुली करायलाच पाहिजे. आपण त्यांना तशी शिक्षा ठेवा की, ह्या पिरीयडमध्ये एवढे काम झाले पाहिजे. मगच ही वसुली होणर आपण इथे नुसते वादविवाद करुन अर्थ नाही व बजेटची चर्चा लांबविण्यात ही काही अर्थ नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

कोंडवाडे आता आपण बघितले की, कोंडवाड्यामध्ये सन २००३-२००४ मध्ये १.४८ लाखाचे उत्पन्न होते. २००४ - २००५ ला २.३६ लाखाचे उत्पन्न होते, २००५ - २००६ ला १.२२ वसुल केलेले आहेत. आणि २००६ - २००७ मध्ये पहिल्या महिन्यामध्ये आपण ऑलरेडी १.२७ वसुल केलेले आहेत तर तीन लाख रुनपये आयुक्तांचा अंदाज होता तो बरोबर होता स्थायी समितीने १ लाख रुपये करायला नको. जेव्हा २००६ - २००७ ला ऑलरेडी आठ महिन्यामध्ये १.२७ लाख रुपये वसुल केले तर बारा महिन्यामध्ये आपली वसुली दोन लाखाच्या ही पुढे जावु शकते. म्हणजे आयुक्तांचा जो अंदाज तीन लाख रुपयांच होता तो बरोबर आहे. तो स्थायी समितीने तीन लाख रुपयेच ठेवायला पाहिजे. तो स्थायी समितीने तीन लाख रुपयेच ठेवायला पाहिजे होता. कारण ह्याच्यापुर्वी तशा वसुल्या झालेल्या आहेत. सन २००४- २००५ ला २.३६ झालेली आहे. पे ॲन्ड पार्कच ही आपण बघा २००३ - २००४ ला आपली वसुल ८.४ लाख आहे. सन २००४ - २००५ ला ८.१६ आहे. २००५ - २००६ ला ६.०९ आली आणि एकदम आपण ५ लाख रुपयांवर आलोत म्हणजे एंकदरीत पे ॲन्ड पार्कच्या आपल्या जागा कमी झाल्या किंवा तिथे कूठे काही झोपडपट्टी झाली? का लोकांनी गाड्या विकुन टाकल्या या तिन्ही पैकी काहीतरी कारण घडले असले. म्हणुन आपण ही रक्कम कमी दाखवितो. पाच लाखाची ही रक्कम जेवढी १० लाखाची होती तिच ठेवायला पाहिजे होती. सन २००३ - २००४ ला जेव्हा आपली ८ लाख रुपये वसुली होउ शकते तर २००७ - २००८ या सालात १० लाख रुपये वसुली नाही? त्या दृष्टीने आपले प्रयत्न होत नसतील. पे ॲन्ड पार्कमध्ये आपले लक्ष नसणार कारण गाड्यांची संख्या वाढलीच पे ॲन्ड पार्कच्या जागासुध्दा वाढलेल्या आहेत. त्यामुळे वसुली वाढली पाहिजे. त्याठिकाणी ती १० लाख रुपये करायला पाहिजे. होर्डिग्जच्या बाबतीत अंदाज बरोबर धरलेले आहे. कारण तसे म्हटले तर होर्डिग्जच्या संख्या वाढत असल्या तरी मागच्या काही वसुल्या समाधानकारक नाही. २२ लाखाच्या वर आम्ही कधी गेलेलो नाही. त्यामुळे २९ लाखाचा हा जो अंदाज आहे तो बरोबर आहे. याठिकाणी रुग्णवाहिका भाड्याच्या संदर्भात २.३६ लाखाची सन २००५-०६ ला वसुली होती आणि आपण सन २००६-०७ ला साडे तीन लाख रुपये दाखवलेली आहेत पण त्याच्यात फक्त ७२ हजार रु. वसुली आहे. म्हणजे रुग्णवाहिका किंवा शववाहिका ही आपली काम करत नसेल असा त्याचा विषय होउ शकतो. अशाप्रकारे काय आहे का? ती रुग्णवाहिका आपण आद्यावत ठेवायला पाहिजे कारण आपलेच इन्कम त्याच्यामध्ये बुडत आहे. त्याप्रमाणे (ब)-४, अतिक्रमण, जप्ती व दंड वसुली यामध्ये आपण २० लाखाचा अंदाज धरलेला आहे. परंतु, आतापर्यंत आपण कधी ७ लाख रुपयाच्या वर गेलेलो नाही. म्हणजे अशी अपेक्षा करु या की, यावर्षी जास्त वुसली होईल. कारण तुम्ही दिलेले फिगर आम्ही कमी करण्याच्या भानगडीमध्ये जास्त पडत नाही. ते वाढवायच्या मार्गावर आम्ही जास्त जातो. अनधिकृत बांधकाम तोडण्याच्या संदर्भात आपण २० लाखाची तरतुद केलेली आहे. रस्ता नुकसान भरपाई बांधकाम - ह्याच्यामध्ये आपण दिड कोटी रुपयाचे अंदाज धरले होते. परंतु, सन २००५-०६ या सालामध्ये १ कोटी ५ लाख

रुपयाचीच आपली वसुली आहे. म्हणले नुकसान भरपाई आहे. याठिकाणी अडीच कोटी रुपये धरलेले आहेत. पण बऱ्याचशा ठिकाणी रस्ता नुकसान भरपाई आपल्याला मिळत नाही. आपल्याकडे अशा पध्दतीने रस्ते खोदलेले जातात. काल रस्ता केला आणि आज खोदला. म्हणजे रस्ता एवढा झटपट खोदला जातो की, तितक्या वेळामध्ये त्यांचा एवढा प्रस्ताव जर असेल, पाईप लाईन टाकण्याच्या किंवा इलेक्ट्रीक केबल टाकण्याचा काल रस्ता झाला आणि रात्री त्यांना परवानगी कशी काय दिली. ते लगेच उद्या रस्ता खोदतात. अशी समन्वय समिती आपल्याकडे पूर्वी गठीत करण्यात आली होती. मी समन्वय समिती जर कार्यरत नसेल तर आपण ती ठेवावी. समन्वय समितीने मान्यता दिल्याशिवाय कुठल्याही टेलिफोन किंवा इलेक्ट्रीकवाल्यांना अरजन्सीचे मॅटर सोडल्यास, कुठलाही रस्ता खोदायला किंवा प्रस्तावित लाईन टाकायला मग त्या इलेक्ट्रीकच्या असू दे किंवा टेलिफोनचे असू दे. त्यांना परवानग्या देवू नका असे रस्ते खोदल्यानंतर ते आमच्या रेकॉर्डवर येत नाही. ते आमच्या रेकॉर्डवर आले नाही की, आम्हाला रस्ता नुकसान भरपाई मिळत नाही. आम्ही क्लम तरी कसे करणार? आमच्याकडे तर काहीतरी डेटा पाहिजे ना किंवा हा रस्ता ह्यांनी खोदला, खराब केला तर याठिकाणची आम्हाला रस्ता नुकसान भरपाई, खरं म्हणजे रस्ता नुकसान भरपाईच्या बाबतीत फार घोळ आहे. मला वाटते की, चार-पाच कोटी रुपये रस्ता नुकसान भरपाई मिळायला पाहिजे. आपण जर समन्वय समिती व्यवस्थित गठीत केली. बांधकाम, आरोग्य आणि इलेक्ट्रीक सिटीवाले व टेलिफोनवाले या सर्वांची समिती करा. म्हणजे उद्या जरी बांधकामवाल्यांना विचारा. नाहीतर, त्यांचे गटार करायचे असेल तर आरोग्यवाल्यांना विचारा. नाहीतर त्यांचे पाईप तोडून आपण गटार करुन टाकतो व ही गटार व्यवस्था खराब करुन टाकतो. रस्ता करताना गटार खराब करतो असे समन्वय समिती असणे फार गरजेचे आहे. पूर्वी या रक्कमा पूर्ण मिळत असे पण हल्ली कमी होत चालल्या आहेत. खरं म्हणजे रस्ता रोजच्या रोज तोडला जातो पण रक्कमा मिळत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, टेंडर मालमत्ता ट्रान्सफर फी बद्दल पान. नं.३ मध्ये ८ नंबर आपल्या मिरा भाईंदरमध्ये दुय्यम निबंधक, ठाणे ........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, खांबित साहेब खुलासा करत आहेत.

**दिपक खांबित :-**

चालू वर्षामध्ये आपण तीन कोटी रुपये वसुल केले. पहिले चार महिने व नंतरच्या आठ महिन्यामध्ये ७८ लाख रुपये व त्यानंतर राहिलेल्या चार महिन्यामध्ये आपण जवळ जवळ सव्वा दोन कोटी रुपयाच्या वर वसुली केलेली आहे आणि आपण परवानगी देण्याअगोदर पैसे भरुन घेतो आणि मगच त्यांना परवानगी देतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग, मी तुम्हाला आता बरोबर म्हटले की, दिड कोटी रुपयाचा जिथे अंदाज बांधला होता तिथे तुम्ही आतापर्यंत तीन कोटी रुपये मिळविले मग पुढच्या वर्षाकरिता पाच कोटी रुपये का नाही धरत?

**दिपक खांबित :-**

साहेब, तीन कोटी रुपये धरले व आपण हे ॲडवान्समध्ये धरतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा तुम्ही दिड कोटी रुपये अंदाज केला होता तर तेव्हा तुम्हाला तीन कोटी रुपये मिळाले. तुम्ही टारगेट कराल तर तुमच्या लक्षात राहिल की, आम्हाला येथून पाच कोटी रुपये मिळाले पाहिजे जेवढे बजेट वाढवाल तेवढे आमच्या स्थायी समितीच्या सभापतींना ही चांगले वाटेल.

**प्रकाश दुबोले :-**

गॅस पाईप लाईनसाठी आपण रस्ता खुदाई केली त्यामध्ये किती वसुली झालेली आहे व किती?

**दिपक खांबित :-**

आपल्याला त्याची माहिती देतो.

**प्रकाश दुबोले :-**

आत्ता जी अमाउंट सांगितली आहे ती एकत्रित दिली का?

**दिपक खांबित :-**

होय. माहिती देतो.

**प्रकाश दुबोले :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र.८ वर दुय्यम निबंधक ठाणे, ४, ७ आणि १० या तीन नोंदणी कार्यालयात आतापर्यंत ३० हजाराच्या वर दस्तावेज नोंदले गेलेले आहेत. आणि सन २००६-०७ यामध्ये नोंदविले असलेले दस्ताऐवज ३० हजार एवढी संख्या आहे. यामध्ये दिवसेंदिवस वाढ ही होणार आहे. त्याकरिता मालमत्ता ट्रान्सफर फी ची प्रस्तावित जी रक्कम आपण दाखविलेली आहे. ही फक्त ५० ची फिगर दाखवलेली आहे त्यामध्ये प्लस पाच करावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

रस्ता नुकसान भरपाई आपण अडीच कोटी रुपये केले तिथे चार कोटी रुपये दाखवायला हरकत नाही. कारण ऑलरेडी तीन कोटी रुपये तुमचे ह्यावर्षी आलेले आहेत. रस्ते खोदण्याचे काम तर रोज चालु आहे. अडीच कोटी रुपयाचे तीन कोटी रुपये करा. कारण तुम्ही तीन कोटी रुपये गेल्यावर्षी सन २००६ - २००७ ला घेतले. दुसरे रस्ते खोदतात. हे आम्हाला माहित नसते. हे डिटेक्शन केले पाहिजे. समन्वय समिती तेवढ्या करीताच केली होती समन्वय समितीने हे डिटेक्ट केले म्हणुन तुम्हाला हे तीन कोटी रुपये मिळाले इमारत परवाना फी व विकास आकारामध्ये गेल्यावेळेला १३ कोटी रुपये दाखविले होते. यावर्षी सुध्दा तुमचे १३ कोटी रुपयाचेच बजेट दाखवित आहे. तुमचा अंदाज काय आहे? म्हणजे इमारतींची संख्या वाढणार नाही का? नविन विकास आराखडे आपल्याकडे मंजुरीला येणार नाही का? आज एस.ई.झेड ला केंद्र शासनाने स्थगिती दिलेली आहे.

**रिटा शहा :-**

साहेब, इमारत परवाना फी याच्यामध्ये आपण ७ लाख रुपये दाखविले. मला असे वाटते की, इमारत परवाना फी ओ.सी म्हणजे ऑक्युपेंशन सर्टिफिकेट मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये ओ.सी घ्यायला कुठलाही बिल्डर पुढे येत नाही. हे माझ्या पेक्षा श्री. घेवारे साहेबांना चांगले माहित असेल. कारण त्यांना माहित आहे की, आपण जर ओ.सी. घेतली नाही तरी ही त्यांना वॉटर कनेक्शन इतर सुविधा मिळणार. आपण ह्याच्यामध्ये काहीतरी सक्ती निर्माण केली की, वॉटर कनेक्शन ओ.सी. घेतल्या शिवाय द्यायचे नाही. तर ते पैसे वसुल होणार आहे. नुसते बुकवर आपण वाढवून द्यायचे आणि आपण बघत बसायचे आणि पुढच्यावर्षी ते परत बजेटच्या समोर दिसणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ४ वर कारखाने, दुकाने व आर्किटेक्ट फि याबाबत गेल्यावर्षी काय अंदाज धरला होता हे मला माहित नाही. पण अडीच कोटी रूपयाचे उत्पन्न दाखवले होते.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, पान क्र. ३ वर मोबाईल सेवा शुल्क सांगितले आहे ते कसले आहेत. टॉवरचे टॅक्स का? २५ लाख रु. आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब याच्या संबंधी आपल्याकडे पत्र आहे. हे पत्र आपण दिलेले आहे आणि त्या पत्रामध्ये आपण सांगितले आहे की, शासनाचे पत्र असल्यामुळे त्यांच्याकडून काही घेण्यात येउ नये. शासनाचा जी.आर. आहे. त्या संबंधीचे आहे. मोबाईल कंपन्यांच्या समस्येबाबत दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

ते परवानगी शुक्लामध्ये आकारा.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब, मोबाईल शुल्क हे आपण लावलेले आहे.

**रतन पाटील :-**

परवानगी शुल्क आपण घेउ शकतो असे त्याच्यामध्ये आहे.

**प्रकाश दुबोले :-**

आपण हे जे मोबाईल शुल्क लावलेले आहे त्याच्यामध्ये बी.एस.ई.एस. चे जे टॉवर पडलेले आहेत त्यांना शुल्क लावू शकत नाही का? हे बी.एस.ई.एस. चे टॉवर १०० च्या आकड्यात आहे. त्यांना आपण शुल्क लावू शकतो की नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

कारखाने, दुकाने, आर्कीटेक्ट फी अडीचशे, अडीच कोटी रूपये सन २००६-०७ ला दाखविले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

बी.एस.ई.एस. चे टॉवरचे काय? त्याचे जर शुल्क लावता येत असेल तर ते पैसे वाढतील ना.

**रतन पाटील :-**

मागे पेपरला आले होते की, आपल्या येथील एका नगरपालिकेच्या संदर्भात, अशापद्धतीने एम.एस.ई.बी. च्या टॉवरचे वसुल केलेले आहेत.

**दिलीप घेवारे :-**

आतापर्यंत आपण मोबाईल शुल्क म्हणून ३३ लाख ८ हजार २६१ रूपये वसूल केलेले आहेत. परंतु, आता शासनाने २९ जानेवारी २००७ ला परिपत्रक काढलेले आहे त्याच्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्याची आता सेवाशुल्क वसुल करू नये असे आदेश दिलेले आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

बी.एस.ई.एस. बाबत तसा काही निर्णय आहे का? आपण बी.एस.ई.एस. कडे मागणी तरी करा. त्यांच्याकडे जर तसा निकाल असेल तर ते आपल्याला माहित तरी होईल. त्यातून लाखो रूपये जमा होतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

कारखाने, दुकाने, आर्कीटेक्ट फी सन २००६-०७ मध्ये अडीच कोटी रूपये आपण प्रस्तावीत केली आणि आता २००७-०८ मध्ये तो अंदाज ५० लाखावर आलेला आहे. म्हणजे ज्यावेळी अडीच कोटी प्रस्तावित केली तेव्हा काही कारखान्यांची संख्या जास्त होती आणि आता भाईंदर मधून कारखाने निघून गेले किंवा दुकाने बंद झाली किंवा आर्कीटेक्ट पळून गेले असा काही प्रकार आहे का किंवा आपण कारखाने शोधलेच नाहीत. आर्कीटेक्ट शोधले नाही. त्यांच्याकडे आपण ॲप्रोच झालो नाही. त्यांना आपण विचारले नाही की, तुम्ही कारखान्यांनी लायसन्स घेतले आहे की, नाही. बरेचसे कारखाने भाईंदर मध्ये असेच आहेत त्यांच्याकडे महानगरपालिकेचे लायसन्स नाही. दुकानाचे सुद्धा लायसन्स नाही. त्याच्यात जर व्यापक मोहिम सुरू केली असेल तर आपला अंदाज बदलला आहे का किंवा आपण व्यापक मोहीम लक्षात घेउन अडीच कोटी रूपये सन २००६-०७ मध्ये प्रस्तावित केले होते आणि तीच व्यापकता लक्षात घेउन अडीच कोटी रूपयाचे मग ५० व्हायला नको.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब, आपण ३० लाखापर्यंत सांगितलेले आहे. तुमच्या दृष्टीने ते बरोबर आहेत स्थायी समितीने ते वाढवलेले आहे. परंतु, आपल्याकडे एवढे चुकीची सिस्टम आहे की, लोक तुमच्याकडे परवानगीसाठी येतच नाही. तुमच्याकडे प्रोसिजर सोपी नाही. एकाच टेबलकडे गेले की त्या लाकांचे काम झाले पाहिजे. अशी काहीच सुविधा नाही. तुमच्या एका फाईलवर रिमार्क जवळ जवळ सात ते आठ अधिकाऱ्यांचे लागतात आणि प्रत्येक ठिकाणी चार-पाच दिवस जातात, कामधंदे सोडून तुमच्याकडे परवान्यासाठी कोण येणार नाही. तेव्हा तुम्ही इथे कितीही आकडे वाढविले तरी लोक तुमच्याकडे स्वतःहून कोणी येणार नाही. आपण सुविधा व्यवस्थित करा खाली सी.एफ.सी. कडे एक खिडकी पद्धत करा ना की, त्याठिकाणी त्यांनी अर्ज केला की, आठ दिवसामध्ये त्याला परवानगी मिळेल. त्याच्याकडून पैसे भरून घ्या. तुमच्याकडे उपायुक्त, डॉक्टर्स आहेत. तुम्ही त्याच्यावर अधिक्षक नेमता पुन्हा तुमचे निरिक्षक आहेत, पुन्हा आयुक्तांकडे यायचे. म्हणजे एका कामासाठी व्यक्तीने किती ठिकाणी फिरायचे? त्यासाठी काहितरी सुसूत्रता आणा ना. आपले नक्कीच पैसे वाढतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त महोदय, यामध्ये दुसरी एक गोष्ट अशी आहे की, आता आपण लायसन्स द्यायला सुरूवात केली. तुम्हाला हे ही माहित आहे की, ग्रामपंचायत काळातील किंवा नगरपरिषदेतील काळातील अनेक लोकांकडे एन.ओ.सी. नाही, भोगवटा दाखला नाही. जे आपण आता नक्की करा की, सरासरी सर्वांना लायसन्स द्यायचे. तर परत जो निकष लावतात. भोगवटा दाखला नाही. एन.ओ.सी. नाही. हे नाही ते नाही म्हणजे तुम्ही जे अपेक्षित धरले आहे ते पुर्ण होणार नाही आणि सरसकट प्रत्येकाला लायसन्स द्या आणि अन्न व रिन्युअल फुड ॲन्ड ड्रग्समध्ये करण्याची गरज नाही. फक्त पाच वर्षासाठी दिलेले आहे. म्हणजे त्या एका माणसाने आज लायसन्स घेतले व ते रिन्युअल करून घेतले. पाच वर्षाची फि ते एकदम घेतात. फक्त करारनाम्यामध्ये किंवा जागेमध्ये जर काही फेरफार झाला, त्यांनी कळविले तर त्याच्या लायसन्स मध्ये फरक होतो अन्यथा पाच वर्षा साठी ते बरोबर आहे. ह्याच्यामुळे पाच वर्षाचे उत्पन्न सरसकट आणि दुसरे म्हणजे आपला जो अधिकारी वर्ग लागत आहे तो लागत नाही. म्हणून तुम्ही आता जर सरसकट सर्वांना लायसन्स द्यायचे असेल मग त्याच्याकडे फक्त एनओसी पाहिजे ही त्याच्यामध्ये एवढीच अट आहे. त्या दुकानदाराचे स्वतःचे दुकान असले पाहिजे. भाड्याने असेल तर भाड्याच्या मालकाची एनओसी पाहिजे. अन्यथा कोणी कोणाच्या नावावर लायसन्स घेईल व आपल्यावर ठप्पा येईल. फक्त ती वास्तु, सदनिका जो माणूस आहे त्याच्या नावाने असली पाहिजे. पुन्हा आपण कंपनीचे सर्टीफिकेट किंवा हे ते विचारायला गेलो तर पुन्हा हा ४० लाख ५० हजार भरले तरी हे होणार. ह्यामध्ये मोठी रक्कम वाढ होणार आहे. म्हणून तुम्ही हा निर्णय घ्या आणि आता दोन डिपार्टमेंट वेगवेगळे काम करतात म्हणजे श्री. संजय तायशेट्टे एनओसी देतात त्यांनी लोकांना सरसकट नोटीस पाठविली. त्या दुकानामध्ये काम आहे की, नाही. त्यादुकानामध्ये काही वस्तु चालते की नाही. कुठला कारखाना किंवा वस्तु आहे. एका बाजूने माझ्या आईचे दुकान आहे म्हणून मी धनराजजींना सांगितले व धनराजजी तुमच्याकडे आले. माझ्या आईचे दुकान नउ वर्षापासून बंद आहे. तुम्ही ताबडतोब लायसन्स घ्या नाहीतर, तुमच्यावर दंडात्मक कार्यवाई करण्यात येईल म्हणजे हे काय आहे असे त्यांना विचारल्यावर त्यांनी सांगितले की, माझ्याकडे नोटीस नाही म्हणून मी सरसकट नोटीस काढली. म्हणजे ह्यापद्धतीने तुमची वसुली होणार आहे. जो काम करतो त्याला नोटीस नाही व ज्या दुकानामध्ये काही नाही त्याला तुम्ही नोटीस पाठवतात. म्हणून त्यांच्याकडे जर अधिकारी बळ नसेल तर त्यांना अधिकारी बळ द्या आणि ह्या उत्पन्नामध्ये नक्कीच वाढ होण्याची शक्यता आहे. पण त्याच्यामध्ये थोडी शिथलाई आपल्याला कायद्याच्या दृष्टीने घ्यावी लागेल.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, जे कारखाने आहेत त्याचे पहिल्यांदा लहान लहान गाळे होते आता त्यांनी पहीला माळा, दुसरा माळा बांधलेला आहे. त्यांचा सर्व्हे करून त्यांना तेवढा टॅक्सतरी लावला आहे का, तोही बघणे गरजेचे आहे.

त्यांच्या तशा परवानग्या ही आपल्याकडे नाही. त्यांनी महापालिकेचे परवाने घेतलेलेच नाही. बऱ्याच कारखान्यांना परवाने नाही.

**धनराज अग्रवाल :-**

परवाना या विषयावर मी पण बोलणार आहे असे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी जसे सांगितले की, दोन्ही एका डिपार्टमेंटकडून आम्ही परवाने घेतले म्हणजे सगळे फॉर्म भरून दिले, सर्व झाले. दुसरा डिपार्टमेंट त्यांना नोटीसा पाठवितात की, तुम्ही लायसन्स घेतलेले नाही. पण ते सर्व एकदम चुकमूक होतात की, आम्ही कोणाकडून लायसन्स घ्यायचे आहे. आपल्याकडेच काही नक्की नाही आणि फॉर्म भरल्यानंतर आपल्याला दहा अटीशर्ती आहेत. ते आपल्या महासभेमध्ये पास झालेले आहे. सरसकट दुकानांना लायसन्स दिले पाहिजे. पण आता तुम्ही तीथे अडी करतात. हे तुमचे बरोबर नाही असे काही सांगून कागद फेकून देतात व दुसरे आणा मग हे लायसन्स कोणी घेणारच नाही. मग उत्पन्न कुठून वाढणार? त्यांची दूकाने आहेत ते कमर्शिअल टॅक्स भरतात त्यांनी स्वतःने ते दुकान घेतलेले आहे. ते महानगरपालिकेचे टॅक्स भरतात त्यांना तुम्ही लायसन्स का देत नाही. तुमची ओ.सी. नाही. तुमची बी.सी. नाही असे काहीतरी बोलून त्यांना परत पाठवतात. ते सर्व शिथिल करायला पाहिजे. ज्यांनी लायसन्स मागितले त्यांनी लायसन्स दिले पाहिजे त्यांच्या नावावर खोली पाहिजे.

**रिटा शाहाः-**

साहेब, याच्यामध्ये मी अजून एक मुद्दा उपस्थित करते की, परवाना देतेवेळी आपण सर्व बाबी लक्षात घ्यायला पाहिजे. ती मालकीची दुकाने आहेत का? परंतु, परवाना देताना आपण त्याच्यामध्ये अशी अटीशर्ती टाका की, परवाना दिला म्हणजे सदर दुकान की ती बिल्डींग अधिकृत होणार असा त्याच्यामध्ये आपण काहीतरी शिक्का मारून द्यावा जसे आपण टॅक्समध्ये शिक्का मारून देतो. पाणी विभागाने हल्ली एक नोटीस पाठविली आहे की, तुमच्या पाण्याच्या मिटरचे जे चेम्बर असते त्या चेम्बरमध्ये पाणी भरले असेल तर मीटर वाचवू शकणार नाही व तुमचे कनेक्शन कापण्यात येईल अशी कारवाई करणार अशी नोटीस पाठविली आहे. र्दुदैवाची गोष्ट अशी आहे की, भाईंदर हा खाडीचा शहर आहे आणि आमचा जो ग्रामपंचायत कालीन शहरी विभाग आहे तिथे आपण कितीही वेळा चेम्बर रिपेरिंग केला तरीही ते जमिनिमध्ये पाणी मुरते आणि ते मिटरपर्यंत पोहचते. कितीवेळ मिटर बदली करायचे आणि अशी गंमतीची बाब आहे की, शहरासाठी बिल लावतो ते आपल्या मिटर रिर्डींग पेक्षा जास्त असते आणि आम्ही भरतो. पण हा मिटर आम्ही घडीघडी कितीवेळा रिपेर करायचा आणि अशा नोटीसा पाठविल्या म्हणजे लोकांमध्ये गैरसमज निर्माण होतो व गंभीर वातावरण निर्माण होते. लोक आमच्याकडे नोटीसा घेउन येत आहेत की, आमच्या येथे चेम्बरचे पाणी भरते. माझ्याच बिल्डींगमध्ये मी वर्षातून चारदा रिपेरींग करते तरीही त्याच्यात पाणी मुरते. त्याच्यावरही आपण काहीतरी निर्णय द्या.

**मदन सिंग उदितनारायण :-**

मा. महापौर मॅडम, पान क्र. ८ वर भाईंदर पुर्व - पश्चिम भुयारी गटार योजनामध्ये ५ करोड रूपये दाखविले आहे. त्याच्यावर आपली पूर्ण योजना कितीची आहे?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ज्या सुचना अगोदरच्या पानावर केले त्याच्याबाबत आपण त्या तक्त्यावर काय लिहिले? बदल केले, नाही केले. आपण सिरीयल नंबरने घ्या म्हणजे लवकरात लवकर आटपेल. ७ नंबरचे काय झाले? आम्ही ज्या सुचना केल्या आहेत त्याचे शेवटला काय झाले? तुम्ही सांगा ना, ही तरतुद करता येणार नाही. ती तरतुद आम्ही तीथे कॅन्सल करू शकू. आम्ही १० सांगितले तुम्ही ५ केले काहीतरी कराना आणि पुढे घ्या.

**रतन पाटील :-**

आयुक्त साहेब, आता सध्या जो विषय चालू होता तो सदरचा विषय आपण अर्धवट ठेवला होता. जेव्हा स्थायी समितीची चर्चा चालू होती तेव्हा आपण तो अर्धवट ठेवला. आपण त्याच्यावर रिमार्क केला की, संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्याबाबत आपल्याला माहिती देतो. पण ह्याच्याबाबत आपण त्याकरिता परत चर्चा केली नाही. माझी एक सुचना आहे ती आपण त्याच्यात नमुद करून घ्या. आपण दुकानाला जो टॅक्स लायसन्ससाठी लावतो. शंभर फुटाचे किंवा दिडशे फुटाचे दुकान असेल तर त्याला सुद्धा पाचशे रूपये लावतो आणि २५० किंवा ५०० स्क्वेअर फुटाचे सुद्धा दुकान असेल तर त्याला सुद्धा ५०० रूपये लावतो ते योग्य नाही. त्याला जी आकारणी आहे ती स्क्वेअर फुटवर करावी. जेणेकरून जास्तीत जास्त महापालिकेचे उत्पन्न आणि लायसन्स फिद्वारे वाढेल. कारण त्याच्यात स्क्वेअर फुटची मागणी ठेवा. मोठे मोठे हॉटेल्स मोठे मोठे लॉजिंग बोर्डींगर्स हे एवढे स्क्वेअर फिट वाढते. त्याच्यावर आकारणी केली तर आपले उत्पन्न निश्चितच वाढणार आहे. अशा पद्धतीची माझी एक सुचना त्याच्यात नमुद करून घ्या.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण जे सांगितले त्याच्यामध्ये ५५ कोटी रूपये आपण सांगत आहात. स्थायी समितीमध्ये ३७.५० कोटी रूपयाचे अंदाज होते आणि त्याच्यामध्ये स्थायी समितीने ४० कोटीची जी प्रोव्हीजन केलेली आहे आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी ५ कोटी रूपायाची सुधारणा सांगितल्यानंतर या पाच कोटी रूपयाचा इफेक्ट आपण दिवाबत्ती कर आणि शिक्षण कर याच्या मध्ये त्या

प्रपोशनमध्ये वाढवल्यानंतर साधारणपणे साडेसात कोटी रूपयाची वाढ अशीच होते. म्हणजे त्याच्यात आपण जे ५ कोटी रूपये धरतो. ते प्रपोशनेट जर वाढले तर ते ४५ ऐवजी ४७ करोड रूपये होईल. तर त्याच्यापेक्षा जास्त वाढवू नये. ५५ जो अंदाज पकडत आहात त्याच्यात ५ कोटी रू. वाढ दिलेली आणि प्रपोशनमध्ये वाढ दिली तर साडेसात कोटीपर्यंत........

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांनी असे म्हटले की, लिलाव करून रक्कमा जास्त मिळतात. दर तीन महिन्यांनी आपण बजेट रिन्यु करतो ना.....

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण लिलावाची पद्धत सांगितली तरी प्रत्यक्ष लिलाव होत नाही ना. ती तेवढी मोठी प्रोसेस आपण फॉलो करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एखादी गोष्ट होत नाही असे मेहेरबानीखातीर बोलू नका.

**मा. उपमहापौर :-**

आपण अंदाज केला आणि त्याच्यामध्ये जास्त मिळाले तर हरकत नाही. परंतू आपण मुळातच जास्त पकडू नये.

**मिलन म्हात्रे :-**

आपण पेपर नोटीस काढली. सगळे काय झाले आणि कारवाईच झाली नाही ना. त्याचे मी बोलत आहे.

**मा. उपमहापौर :-**

बजेटमध्ये ही जी ४५ कोटी रूपायाची फिगर आहे त्यात २ कोटी रूपये वाढवावे व ४७ कोटी रूपये करावेत पण ५५ कोटीपर्यंत नेउ नका.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हाला काहीतरी फायनल सांगा ना.

**मा. उपमहापौर :-**

४७ कोटी रूपये करा त्याचा प्रपोशन वाढला की आपोआप तसे होईल. ४७ नको ४५ कोटी रूपयेच ठेवा त्याच्यात ५ ची वाढ करा.

**मदनसिंग उदितनारायण :-**

१३ करोड है तो इसमे ५ करोड रूपया क्यो रखा गया है?

**दिपक खांबित :-**

वहा लोनसे निकालनेका है ना।

**मदनसिंग उदितनारायण :-**

लोन से निकालने का है और जो भाईंदर पूर्व - पश्चिम भुयारी गटर है। अपने शहर के लिए, भाईंदर पुर्व के लिए अत्यावश्यक सेवा है। यहा जल्द से जल्द होना चाहिए तो इसको पुरा १३ करोड किया जाए और लोन दुसरे चीजपर लिया जाए। पिछली मा. महासभा मे भी इसपर चर्चा हुई थी। और आप लोगोने रूलिंग दिया था। उसका करेक्शन पेज नंबर ३२ पर भी किया जाए। ८ बढाकर १३ किए जाए।

**प्रफुल्ल पाटील :-**

अनुदाने आणि अंशदानेमध्ये जो महागाई भत्ता आहे. २००५-०६ ला १३३.७९ लाख होता. २००६-०७ ला हा आपला महागाई भत्ता कमी का झाला?

**शरद बेलवटे :-**

आपल्या नगरपालिकेची महानगरपालिका झाली म्हणून शासनाने आता महागाई भत्ता कमी केला आहे. ते फक्त पाच वर्षापर्यंत मिळेल आणि आता ६०टक्के पर्यंत मिळेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे पाच वर्षानंतर शासनाने आपला महागाई भत्ता बंद केला का?

**शरद बेलवटे :-**

नंतर पुढे ते बंदच होईल. आपल्याला जी अनुदाने मिळणार आहे ते महापालिका झाल्यानंतर ऑटोमॅटीकली बंद होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे ते वाढवू नका पण बिनशेतीसारा अनुदान आपले वाढले पाहिजे कारण एवढी एन.ए.ची प्रकरणे होतात मग एन.ए चे अनुदान का मिळत नाही? भाईंदर एवढी कामे चालू आहेत तर त्याचे अनुदान वाढले पाहिजे.

**मिलन पाटील :-**

एन.ए.ची प्रकरणे आपल्या येथून एफ.एस.आय.साठी जातात ना. बिल्डिंग प्लान आपल्याकडून पास होतात. आपल्याकडून किती एफ.एस.आय जातो त्याप्रमाणे त्याच्यावर एन.ए. होतो मग आपल्याला ते

कळायला पाहिजे. कलेक्टर कडे करोडो रुपयाचे इनकम जाते मग आपल्याकडे तीन लाख रुपयेच येतात. ते कशा करता आहेत? एन.ए तर आपल्याकडून जाते ना सी.सी. तर आपण देतो त्याच्यानंतर ते एन.ए. करायला जातो. आपल्या येथे घरबसल्या हिशोब असायला पाहिजे. एक एक बिल्डर पाच पाच लाख फूटाचा एफ.एस.आय पास करतात. त्याचे इन्कम जाते कुठे ?

**प्रफुल्ल पाटील :-**

बिनशेतींच्या प्रकरणावर आपण मागणी करतो शासन स्वतः ठरवून देतो जो झेड.पी चा टॅक्स असतो त्याच्याबरोबर ते क्लब करून घेतात आणि प्रत्येक वेळेला ते झेड.पी. ला आणि लोकल अॅथोरिटीला अनुदान देत असतात आता एन.ए. ची प्रकरणे वाढल्यामुळे त्यांचा तो एनए टॅक्स वाढला. जेवढा एन.ए. वाढला त्याप्रमाणे आपल्याला तेवढे अनुदान मिळाले पाहिजे.

**मिलन पाटील :-**

पुर्वी पेक्षा आपला एन.ए टॅक्स जास्त वाढलेला आहे ना आणि प्रशासन आपल्याकडेच आहे आणि आपल्याला घर बसल्या तसा हिशोब मिळाला पाहिजे. आमच्या इथे किती पास होवून गेले त्या हिशोबानेच मिळाले पाहिजे. त्याप्रमाणे त्यांच्याकडे आपण मागणी करायला पाहिजे ना. आपल्याकडून जो एफ.एस.आय. जाणार त्याचाच एन.ए. होणार की नाही. एन.ए मध्ये आपल्याकडून फाईल जाणार त्याच्यावरून तुम्ही त्यांच्याकडे मागणी करायला पाहिजे. दिड लाखामध्ये काय होणार आहे. दिड करोडची आपण मागणी करायला पाहिजे.

**शरद बेलवटे :-**

सन २००४-०५ ला जे बिनशेती सारा अनुदान मिळालेले आहे हे ऑल ओव्हर महाराष्ट्राच्या नगरपालिका आणि महानगरपालिकांसाठी शासनाकडून एखाद जी आर निघतो त्याच्यात आपल्या वाटणीला जेवढे आलेले होते त्या हिशाबाने आम्ही पुढे पकडलेले आहेत व सर्वांसाठी तो जी.आर. एकाच वेळेला निघतो.

**मिलन पाटील :-**

वाट्याला येतो म्हणजे आपण भीक मागायचे आहे का? आपला हक्क म्हणून आपण छिनुन घ्यायचा आहे.

**शरद बेलवटे :-**

२८ फेब्रुवारी २००२ ला जी महापालिका इस्टॅब्लीश झाली व त्याचा जो जी.आर. निघाला त्याच्यामध्ये पाच वर्षापर्यंत तुम्हाला अनुदान देय आहे त्यानंतर पुढे नाही.

**मिलन पाटील :-**

आपल्याला चार वर्षे झाली आहेत तर आपण चार वर्षा आधीचे मागू शकतो की नाही. तुमच्याकडे आहे ना, आपला एफ.एस.आय. किती गेला?

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला दोन लाख रूपये मिळालेले आहे आणि अपेक्षित रक्कम दिड लाख म्हणजे अजून कमी झाले. आठ महिन्यामध्ये दोन लाख रूपये मिळाले व आपण पुढच्या वर्षात दिड लाख रूपये अपेक्षा करतो. म्हणजे आपले हे अनुदान कमी होत आहे का?

**मिलन पाटील :-**

तुम्ही तुमची मागणी काय करणार आहात की नाही?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, शासन अनुदानाचा तर अनुदान देणारे शासन आहे. त्यामुळे शासन ठरवणार की अनुदान किती द्यायचे आहे. बिनशेतीच्या बाबतीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून जी माहिती प्राप्त होते त्याच्यावर ते संबंध महाराष्ट्रभर कोणाला किती द्यायचे ह्याचा निकष ठरविला जातो.

**मिलन पाटील :-**

आपण शासनाला काय कळवणार की नाही. आमच्या येथे १० लाख फुट एफ.एस.आय. पास होउन एन.ए. करिता ही प्रकरणी गेली आहेत. हे आपण दिले पाहिजे. शासन काय देणार?

**लिओ कोलासो :-**

साहेब, जे बिनशेती अनुदान आहे त्याच्यामध्ये जिल्हापरिषदेचा सोर्स आहे आणि महापालिका झाल्यामुळे तो सोर्स आपल्याकडे अनुदानाच्या रूपाने येत नाही. त्यामुळे हा पॉलिसी मॅटर आहे. ह्याच्यावर कोणी मागणी करायला पाहिजे आणि त्याचे नॉम्स बदलून घेतले पाहिजे. तर हे आपल्याला मिळू शकेल.

**हॅरल बोर्जीस :-**

शासनाला कळवा.

**शरद बेलवटे :-**

आपली मागणी होती आणि सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब हे मला मागच्या वेळी बोलले होते की, मी येतो तुझ्या बरोबर अनुदान घ्यायला. पण ते आलेच नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आम्हाला नेले नाही.

**शरद बेलवटे :-**

स्थायी समितीमध्ये सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी मला असे सांगितले होते की, ४ टक्के लोन मिळू शकतो.

**मिलन पाटील :-**

बेलवटे साहेब जे तुमचे पैसे अनुदानाचे कापले ते मिलन पाटील ह्यांनी आपल्याला सांगितले तेव्हा तुमची झोप उडाली.

**शरद बेलवटे :-**

हे चुकीचे विधान आहे. हे तुम्हाला मी सांगितले. मी तुम्हाला जी. आर. दाखवितो.

**प्रफुल्ल पाटील :-**

महत्वाचा मुद्दा असा आहे की, नागरी सुविधा अनुदान हे तुम्ही सन २००६-०७ ला ८ कोटी रूपये प्रस्तावित केले आणि २००७-०८ ला फक्त एक कोटी हा एवढा फरक का?

**अशोक पाटील :-**

आपण दरवर्षी प्रत्येक बजेटमध्ये शाळा, इमारती, अनुदानाचा उल्लेख करत असतो. दरवर्षी ती फिगर फुगत वाढत चालली आहे. यावर्षी पाच करोड रूपयाची झालेली आहे. ह्याचे पुढच्या वर्षी ६ करोड रूपये होतील. परंतु, ते वसुली करण्या संदर्भात आपल्याकडून काहीच कार्यवाही होत नाही किंवा शासनाकडून आपल्याला अनुदानाच्या बाबतीत काहीच सहकार्य होत नाही. हा मधील दरवर्षीचा फुगीर आकडा असतो.

**दिपक खांबित :-**

सदरचा प्रस्ताव हा शिक्षण संचालनाकडे आहे.

**अशोक पाटील :-**

ह्याचा पाठपुरावा कोण करतो? मागील दोन वर्षापुर्वी सुद्धा हा विषय निघाला होता.

**दिपक खांबित :-**

पाठपुरावा सुरू आहे.

**अशोक पाटील :-**

या शाळा, इमारती अनुदानाच्या संदर्भात शासनाकडून आजपर्यंत एक तरी पैसा आलेला आहे का?

**मिलन पाटील :-**

आपण दरवर्षी प्रस्ताव पाठवितो. मागे आपण अधिकारी नेमले होते व त्यांनी प्रस्ताव बनवून पाठविले होते. परंतु, या संदर्भातला पाठपुरावा कोण करत नाही.

**दिपक खांबित :-**

मा. मुझफ्फर हुसैन साहेब बोलले होते की, एम.यू.पी पण केले होते आणि मंत्रालयामध्ये शिक्षण संचालकाकडे फायनलसाठी आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण फायनल पाठपुरावा बोलता ना, तर ह्या पाठपुराच्याचे पत्र बघा. आज १७ तारीख आहे व इथे १८ तारीख लिहिलेली आहे. हे बघा.

**दिपक खांबित :-**

पाठपुराव्याची मोठी फाईल आहे.

**शरद पाटील :-**

नुसती १८ तारीख लिहिलेली नाही तर शुक्रवार दि. १८ तारीख आहे.

**एस. ए. खान :-**

आयुक्त साहेब, आपण नोंद घ्या की, मा. आमदार मुझफ्फर हुसैन ह्यांचे पत्रिकेवर नाव छापतात व त्यांची काही अपॉईंटमेंट घेत नाहीत त्यांना बोलवत नाहीत व पत्रिकादेखील त्यांना घरी द्यायला कोणी जात नाही. प्युन मा. वैती साहेबांच्या ऑफिसमध्ये पत्रिका देवून जातात म्हणजे लल्लु पंजु आहे का? अन्यथा आपण नावच छापू नका.

**हॅरल बोर्जीस :-**

ही प्रथा बरोबर नाही. संबंधित खात्याला तसे कळवा.

**प्रफुल्ल पाटील :-**

शेवटचा मुद्दा आहे. नागरी सुविधा केंद्राची आपण आठ कोटी रूपयाची २००६-०७ प्रोव्हीजन केली आणि २००७-०८ ला फक्त १ कोटी रूपयाची तर ७ कोटी रूपये कमी का केले?

**दिपक खांबित :-**

आपण १ कोटी रूपये दिले होते. परंतु, गेल्यावर्षी मा. महासभेने त्याच्यामध्ये ७ कोटी रूपयाची वाढ केली की, तुम्ही प्रस्ताव पाठवा आणि मांगा. आपण प्रस्ताव दिलेले आहेत. परंतु, ती निधी अजून काही आपल्याकडे आली नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण ८ कोटी रूपयाचा प्रस्ताव दिला होता का?

**दिपक खांबित :-**

होय, आपण प्रस्ताव दिला होता.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रस्ताव दिला मग अपेक्षा करायला हरकत नाही. प्रस्ताव दिला नसेल तर अपेक्षा करू नये.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, लेखाशिर्षक पान क्र. ६ वर संकीर्णमध्ये जे सत्यप्रत फि, जन्ममृत्यु दाखला फी, हे जे ५ लाख रूपये दाखविलेले आहे. यावेळेला आपल्याकडे विवाह नोंदणी सुद्धा आलेली आहे. त्यातुन काही उत्पन्न होणार आहे की, नाही?

**शरद बेलवटे :-**

शासनाला देणार.

**प्रकाश दुबोले :-**

आपण त्यांच्याकडून दाखल्याची फि वगैरे घेणार ना.

**शरद बेलवटे :-**

नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्त साहब, अभी २००७-०८ के बजेटपर काफी चर्चा हुई। जकात कर आपने बताया ७१.७६, महाराष्ट्र शासन का अधिवेशन चालू है। व्यापारीयोको उधर पहिले बोला गया है की, इस सेशन मे आपका जकात समाप्त कर देंगे। आपने जकात के उपर कुछ किया है क्या? कैसा ऑक्ट्राय लगाऐंगे। किस हिसाब से अपना इनकम रहेगा। अगर अपना जकात गया तो अपके यहा ७१ करोड रूपया की भरपाई कैसे करेंगे?

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपके पास मंत्रालय से जकात हटानेके लिए जी.आर आया हुआ है।

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

अद्याप शासनाकडून तसा काही निर्णय झालेला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

समझा, आता निर्णय झाला, अधिवेशन चालू आहे व निर्णय झाल्यावर एकदम ७१ करोड रूपयाचा आपला बजेट फेल होईल.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यामध्ये त्यांनी रक्कम विचारलेली नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्त महोदय, इथे पण शेष लावलेले आहे की, पैसे फार कमी मिळतात. ७१ कोटी रूपयाच्या ठिकाणी आपल्याला ४० कोटी रूपये मिळणार नाही.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

पण ज्या बाबी आपल्या समोर नाही त्या होणार आहेत, होणार नाही अशा चर्चाच करता येत नाही. झाल्यानंतर शासन जे निर्देश देईल त्याप्रमाणे कार्यवाई केली जाईल. ज्याबाबी आपल्या समोर आज नाही त्याचे आपण शासनाच्या अगेन्स्ट चर्चा करणे.....

**शिवप्रकाश भुदेका :-**

लेकीन गर्व्हरमेंटने ऐसी जबान दिया है की, ऑक्ट्राय खत्म करनेका है।

**मा. आयुक्त :-**

सभागृहाला मी सांगू इच्छितो की, या संदर्भामध्ये मध्यंतरी जो निर्णय घेतला. नगरपालिका स्तरावर जकात कर रद्द करण्याचा तर जकात कर रद्द केल्यानंतर शासनाकडून त्याबाबतीमध्ये प्रत्येक नगरपालिकेला अनुदान प्राप्त होईल. त्याप्रमाणे जर समझा आज महापालिकेचा जो जकात कर आहे. तो बंद करण्याबद्दल शासनाने त्याबाबतीत जो निर्णय घेतला तर त्याचे रिम्बर्न्समेंट कसे करायचे हे शासन ठरवेल आणि शासन जी.आर प्रमाणे आपल्याला आदेश देईल त्याप्रमाणे आपण कार्यवाही करणार आहोत आणि ते सभागृहासमोर येणारच आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण ठेकेदारांना जे जकात दिलेले आहे ते दंड वसुल करते. दंड वसुल कसा केला जातो तर व्यापाराला रोडवरून उचलून घेउन जातात. तुमच्या दुकानावर येउन तुमचे मालसामान जप्त करते. तुमच्या दुकानावर येउन तुमचे मालसामान जप्त केले जाते, खाते जप्त केले जाते आणि तिथे त्यांना बोलावून बसवतात. मा. महापौर मॅडम, तिथे व्यापाऱ्यांना १-१ दिवस जेलसारखे बसवतात आणि देड वसुल करून घेतात ते दंड वसुली महानगरपालिकेतर्फे झाले पाहिजे. आपण इथे नुसते १ लाखाची तरतुद दाखविली आहे. त्याचे कारण काय? त्यांना आपण कमाई करून द्यायचे, महापालिकेला नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उसमे अपने अधिकारी को बिठाते है, उनका गलती है।

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा जकात वसुलीचा आपण ठेका दिलेला आहे हे आपल्या सर्वांच्या परवानगीने. त्यामध्ये अशीच तरतुद आहे की, जी १० पट दंडाची रक्कम होती ती महापालिकेच्या फंडामध्ये जमा व्हायला पाहिजे. अशा कोणत्या नागरीकांचा त्यांनी माल पकडलेला आहे. व त्यांचा माल आमच्याकडे यंउन आम्ही निर्णय घेतलेला नाही. अशी कोणती बाब आहे. एखादी बाब तुम्ही आम्हाला सांगावी. अशी कोणतीच बाब प्रशासनाच्या लेवलवर......

**धनराज अग्रवाल :-**

कमीत कमी शंभर बाबींसाठी मी तिथे गेलो होतो व तिथे सेटलमेंट होते. ५ हजाराचे २ हजार रूपये द्या व सोडा. वीस हजाराचे पाच हजार रूपये द्या व सोडा अशी सेटलमेंट होते. इथपर्यंत ते येत नाही. तुम्हाला सर्व माहित आहे. व्यापाऱ्यांची तिथे ४-५ तास खोटी होते. त्यांची गाडी उभी असते त्यांना त्या गाडीवर भाडा लागतो म्हणून ते येथे नाही. तो तिथेच सेटलमेंट करून पार होतो.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

या अनुषंगाने आपण सर्व गटनेते, मा. उपमहापौर, मा. महापौर, मा. आयुक्त साो., आपल्या सर्वांच्या समक्ष त्यांना बोलावून पब्लिक हेअरींग घेतली होती आणि त्यानंतर अशाप्रकारचा कोणताही वाद उत्पन्न झालेला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

त्यानंतर १० दिवसापूर्वी हिराबाजारातून एका माणसाला उचलून नेले. त्याच्या खिशात हिरे होते. त्यांनी बोंबा मारले की, मी ऑक्ट्रायवाला आहे तुम्ही तिथे चला त्याला बसवून ठेवले.

**शिवप्रकाश भुदेका :-**

साहब, आपके राज्य मे सब सुखी है। ऐसा आप बोलो मत, हम बहुत बार आपके पास कम्प्युटरवाले सोनेचांदीवालो का मोर्चा लेकर आये थे। सब दुःखी है। आप ऐसा मत बोलो की, आपके राज्य मे कोई कम्प्लेंट आती नही है।

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, हीराबाजारवाले सर्व तिथे गेले व प्रेशरवर्क झाले त्यानंतर त्यांनी सोडले. असे कोणाला अपहरण करून घेउन जाउ शकतो का? त्याला तसा अधिकार आहे का? कोणाचे खातेवही घेउन जातो, कोणाचा माल सामान घेउन जातो, कोणाचे हिरे जप्त करून घेउन जातो माणसांना घेउन जातो.

**रिटा शाहा:-**

महत्वाचा मुद्दा असा आहे की, दंड वसुल करण्याचा अधिकार कोणाचा?

**शिवप्रकाश भुदेका :-**

महापालिकेकडे.

**रिटा शाहा:-**

महापालिकेचा अधिकार आहे तर तो ठेकेदार व्यापाऱ्याला उचलून घेउन जातो जागेवर बसवतो व ही बाब खरी आहे. जशी गुंडागीरी असते तशा प्रकारची त्यांची वर्तवणूक आहे आणि वारंवार तक्रार मा. उपमहापौर, आपल्याकडे, मा. महापौर मॅडमकडे सर्वांकडे पब्लिक आलेले आहेत, व्यापारी आलेले आहेत त्यांनी सांगितले की, असा एक ही प्रकार घडला नाही आणि जो ३७ हजराचा आकडा दाखवितो त्याचा अर्थ असा होतो की, मिरा भाईंदर शहरामध्ये जकात चारी होतच नाही. मग वादविवाद, झगडा हे कशाप्रकारे? त्याचा अर्थ आपली जी दंडात्मक वसुली व्हायला पाहिजे ती होत नाही. आपल्या महानगरपालिकेच्या तिजोरीत ते पैसे येत नाही. ते मधल्या मधे कुठेतरी फिरून जाते आणि कोणाच्या निजी स्वार्थासाठी ते पैसे खातात त्याचा अर्थ तसा होता. ३७ हजार रूपये आपल्याकडे जमा झालेले आहेत. मग ह्याचा अर्थ असा झाला की, आपल्याकडे जकात चोरीचे प्रकरण होतच नाही. मग ही कम्प्लेंट कशासाठी? आणि नगरसेवक सभागृहामध्ये उठून बोलतात ते काय चुकीचे बोलतात असे का?

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

सदस्य खोटे बोलतात असा त्याचा अर्थ होत नाही.

**रिटा शाहा:-**

साहेब, आपण त्या विभागाचे अधिकारी आहेत. आमच्यापेक्षा तुम्हांला ते जास्त माहित आहे.

**धनराज अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब, उपमहापौर साहेबांना विचारा किती व्यापाऱ्यांना घेउन आलोत, कितीवेळा मोर्चा आला तर त्याचे उत्तर काय? तर आता होणार नाही.

**रिटा शाहा:-**

म्हणून ३७ हजार रूपये दंडात्मक वसुली दाखविली आहे तिथे तुम्ही १० लाख रूपये दाखवा. मग सर्व आपोआप बरोबर येणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काही अधिकाऱ्यांना टारगेट दिला जातो. आज इनकम टॅक्सची रेट पुर्ण महाराष्ट्रामध्ये चालू आहे. ती रेट फक्त जे चोरी करतात त्यांना फक्त टारगेट म्हणून दिले आहे आणि टारगेट दिल्यानंतर तो अधिकारी त्या कामाला लागतो. आपल्या महापालिकेमध्ये जसे मालमत्ता कर, पाणी कर आहे त्याप्रमाणे टारगेट द्या पाहिजे तर त्यांना टारगेटमध्ये बक्षीस ही द्या. पण जोपर्यंत तुम्ही टारगेट देत नाही तोपर्यंत या महापालिकेच्या कुठल्याही उत्पन्नामध्ये वाढ होणार नाही आणि जसे सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी सांगितले की, या रक्कमेमध्ये वाढ करा आणि त्या तिथे नेमलेल्या अधिकाऱ्याला सांगा एवढी वसुली झालीच पाहिजे. लोकांचे वसुल करत आहोत पण आपण टारगेट देत नाही. सेटलमेंट! सेटलमेंट! सेटलमेंट! त्याशिवाय तिथे दुसरे काही होत नाही.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

सभागृहामध्ये याबाबतीमध्ये गैरसमज व्हायला नको. या बाबीबाबत स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. नागरीकांच्या सोयीसाठी दंडात्मक दंड लावण्याचे अधिकार ठेकेदाराला नाही. ह्याच्याबाबतचे आपण सर्व व्यापारी असोसिएशनला लेखी कळविलेले आहे. त्यांच्याकडे कोणीही दंड भरू नये. या लेखी सुचना दिलेल्या आहेत. तसेच, त्याठिकाणी बोर्ड लावलेला आहे. नागरीकांनी सुद्धा याची दखल घेउन त्यांच्यावर अन्याय होत असेल तर त्यांनी एक सिंगल पत्र द्यायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

तिथे आपले अधिकारी का बसवत नाही.

**प्रकाश दुबोले :-**

व्यापारी जर आपल्या महापालिकेत आणले तर आपण सेटलमेंट करू का, की पुर्ण दंड घेणार?

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

जर तो मॅटर दंडात्मक मध्ये येत असेल तर दंड लावलेले आहे. आपण १ लाखापेक्षा जास्त रक्कम वसुल केलेली आहे.

**प्रकाश दुबोले :-**

तो १० पटीने दंड देता जर येथे ऑफिशियली आला आणि तिथे तो सेटलमेंट करून जेवढे पैसे भेटतात तेवढे घेतो. जर तुमच्याकडे व्यापारी आला तर तुम्ही सेटलमेंट करणार का? तुम्ही सेटलमेंटमध्ये पावती द्या.

**गजानन भोईर :-**

साहेब, आपण असे सांगितले होते की, तिथे टेबल बसवून आपली माणसे बसु द्या.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

तिथे आपली माणस आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

ते त्यांना दंड वसुली कशी काय करू देतात.

**गजानन भोईर :-**

माझ्या एका व्यापाऱ्याकडून त्याने पावणे दोन लाख रूपये वसुल केले होते. असे किती व्यापारी आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर महोदया, दुसरी एक बाब तुम्हांला बोलू इच्छितो की, ३ कोटी ४० लाख रूपये मार्गस्थ फी ते पास झाले आहे का? आपण मार्गस्थ फी हायवेवर घेवू शकत नाही. ऑक्ट्रायच्या दंडांची रक्कम येथे वाढवा. कमीत कमी १० लाख रूपये करा.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, मी जे पत्रिकासंदर्भात विचारले, आपण आमदारांची उद्याची अपॉइंटमेंट घेतली का, जो कार्यक्रम ठेवला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खान विचारलेला प्रश्न त्यांनी पत्रिका दाखविल्या होत्या व आत्ताच पत्रिका सभागृहामध्ये वाटण्यात आलेल्या आहेत. ह्यापत्रिका कुठल्या डिपार्टमेंटकडून छापण्यात आलेल्या आहेत आणि समाजकल्याण सभापती तसेच त्या डिपार्टमेंटचे अधिकारी कोण आहे? कोणी येउन ह्यांचा वेळ घेतला होता? कारण मला सुद्धा माहित नव्हते. आता पत्रिका दाखविल्यानंतर माहित पडले.

**एस. ए. खान :-**

अधिकारी कुठे आहेत त्यांना बोलवा ना.

**धनराज अग्रवाल :-**

बजेटवर चर्चा होउ द्या त्यानंतर याविषयावर चर्चा करा.

**एस. ए. खान :-**

बजेटमध्ये ही पत्रिका आली आहे ना.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मार्गस्थ फी चे काय करता? त्याचा खुलासा करा.

**एस. ए. खान :-**

अन्यथा आपण हा कार्यक्रम रद्द करा. सन्मा. सदस्य जयंत पाटील हे त्या कमिटीचे सदस्य आहेत. त्यांना देखिल माहित नाही. हा छपाईचा टेंडर कोणी काढला?

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

मार्गस्थ दाखला वसुल करण्यासाठी मा. महासभेने मंजुरी दिलेली होती त्याप्रमाणे नॅशनल हायवेला आम्ही रिक्वेस्ट पत्र वगैरे दिलेली होते. पण अजून अद्याप ते क्लीअर झालेले नाही. पण आपण नियमाप्रमाणे मार्गस्थ फी लावू शकतो.

**धनराज अग्रवाल :-**

तसा नियम आहे का? मार्गस्थ फी लावणेकरिता.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय. आपल्या कायद्यामध्ये तरतुद आहे. आपल्याला आपल्या पर्यायी जागा नाही व हायवेला आपल्याला जरी भाड्याच्या जागा मिळाल्यातर आपण लावू शकतो त्याप्रमाणे बांधकाम विभाग प्रयत्न करीत आहे.

**अशोक पाटील :-**

मार्गस्थ फी आपण सुरू करणार आहात का? साडेतीन करोड रूपयाची तरतुद या बजेटमध्ये करण्यात आलेली आहे. आपण जी प्रोव्हीजन केलेली आहे तशी वसुली करणार आहात का?

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

वसुलीची कार्यवाही जर सुरू झाली तर ती पाच कोटी रूपयापेक्षा जास्त होईल आपल्याकडे जे वाहन जातात ते खुप मोठ्या प्रमाणात आहेत.

**अशोक पाटील :-**

तसे प्रयत्न करणार आहात की, फक्त बजेट फुगवण्याकरिता आकडा देत आहात.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण तसे प्रयत्न करणार आहोत.

**रतन पाटील :-**

साहेब, गेल्यावर्षापासुन आपण प्रयत्न करत आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, स्थायी आणि अस्थायी आस्थापना, आपला टोटल पगाराचा खर्च ११ टक्के ने होता आता ह्याला ३५ टक्के वर आणला आहे. रोज उठून भरती चालू आहे. आज सफाई कामगारांची, आज डॉक्टर्सची अशी रोज भरती चालू आहे. पण महापालिका झाल्यावर ते सगळ ताबडतोब भरता येते का? की भरणे जरूरी आहे का? आपल्याला लागतील तसे पद आपण भरले पाहिजे. आपला हा जो खर्च आहे तो खर्च आपण येथे कमी केला पाहिजे. आपले उत्पन्न वाढत नाही आणि आपण हा खर्च पहिलाच वाढवितो. ११ टक्के वरून सरळ ३५ टक्केवर आणले आहे. असे असले तर पुढे आपला विकासच होणार नाही. आपली महापालिका नविन आहे. त्यामुळे आपण येथे कमी करा. आपण हे हसण्यावरी घालवू नका. तुमचा पगार होणार नाही. येथे नंतर काही होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज महाराष्ट्र शासनाची हालत काय आहे? द्यायला पगार नाही. मग ह्या महापालिकेत बिनपगारी काम करावे लागेल. आमचा विरोध नाही, अधिकारी आले पाहिजे. ऐवढे अधिकारी येउनसुध्दा उत्पन्नाचे स्त्रोत वाढलेले नाही. आपण एवढे अधिकारी नेमले, प्रभाग अधिकारी नेमले, सभापती नेमले पण शेवटी उत्पन्न कुठे आहे?

**लिओ कोलासो :-**

सकाळपासून ऐकत आहोत. तुम्ही चार तास एकाच पक्षाचे लोक बोलत आहात आणि आमच्या सत्ताधारी पक्षातील सदस्य बोलले तेही दहा मिनिटे बोलले नसतील. मा. महापौर साहेबा, आम्हाला बोलण्याची परवागनी द्या. बोलायलाच पाहिजे, कारण तुमचे सदस्य स्थायी समितीमध्ये होते त्यांनी काय केले?

**धनराज अग्रवाल :-**

मॅडम, आम्हाला या विषयावर बोलू द्या. आमचे बोलणे अजून बाकी आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सत्ताधारी पक्षाच्यावतीने या बजेटचे समर्थन करण्यासाठी उशिराने उभा आहे. आपण सर्व विरोधी पक्ष मंडळींना अगदी त्यांचे शेंडीपासून ते मुंडीपर्यंत सर्व मुद्दे आणि उपमुद्दे मांडण्याची संधी दिली व अधिकाऱ्यांना खुलासे करण्याची संधी दिली. तरीही त्यांचे समाधान झालेले नाही. त्यामुळे वाईट वाटते.

**धनराज अग्रवाल :-**

सत्ताधारी पक्ष चुकले असे ते मान्य करत असतील, पण आम्ही मान्य करत नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी सगळी या अर्थसंकल्पाचे समर्थन करताना सांगितले की, कुठलीही नविन करवाढ नसलेला हा अर्थसंकल्प आहे. त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. तरीही या अहवालामध्ये, या अंदाजपत्रकामध्ये अत्यंत चांगल्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. ज्या इतर चर्चेमुळे बायपास झालेल्या आहेत. त्यांचा रेफरन्स सभागृहाने घेतलेला नाही. त्यामुळे मी आता बोलणार आहे. आपण मला अर्धा तास, पाउण तास बोलण्याची संधी द्यावी अशी मी आपल्याकडे अपेक्षा करतो.

**धनराज अग्रवाल :-**

मॅडम, पहिल्यांदा आमच्या विषयावर खुलासा करु द्या.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, खुलासा करा ना.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, या सभागृहामध्ये अंधार होता .......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला बोलू द्या. अन्यथा आम्ही बाहेर जातो.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. त्यांना बोलू द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही गेलो तर सभागृहाचा कोरमदेखील राहणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व धनराज अग्रवालजी आपण बसून घ्या. त्यांना पाच मिनिटे बोलू द्या. नंतर तुम्ही बोला ना. आपल्याला वेळ दिली जाईल.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील कधीपासून उभे आहेत. त्यांना पहिल्यांदा बोलू द्या.

**मा. महापौर :-**

आपल्या सर्वांना संधी दिली जाईल. आपण बसा. सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब बोला.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेबांच्या प्रश्नाला उत्तर द्या. खुलासा करण्याकरिता संबंधित अधिकारी आले आहेत. त्यानंतर सन्मा. कोलासो साहेबांना बोलण्याची संधी द्या.

**मा. महापौर :-**

समाज कल्याण क्रिडा समिती मार्फत प्रोग्राम आयोजित केलेला आहे. त्या कार्यक्रमाची पत्रिका कोणी छापली व कोणी वाटप केली? याचा खुलासा संबंधित अधिकारी करतील.

**एस. ए. खान :-**

तसेच, आमदार साहेबांची अपॉईन्टमेन्ट घेतली आहे का?

**रामचंद्र आसोदेकर :-**

मा. महापौर मॅडम, यांच्या परवानगीने मी बोलत आहे की, सदरचे काम हे टेंडर पध्दतीने देण्यात आलेले आहे व तारीख वगैरे काहीही फिक्स नव्हते व त्यांनी परस्पर पत्रिका छापल्या. मी त्यांना सांगितले होते की, मला फॉरमेट दाखवा. पण फॉरमेट न दाखविता पत्रिका वाटप केल्या आहेत.

**शुभांगी नाईक :-**

पण ह्या पत्रिका छापल्या कोणी, त्याचे नाव सांगा?

**रामचंद्र आसोदेकर :-**

साहेब, आम्ही या पत्रिका कोणीच वाटल्या नाही.

**एस. ए. खान :-**

मग ह्या पत्रिका कोणी वाटल्या व त्याचे पैसे कोण देणार?

**रामचंद्र आसोदेकर :-**

ह्याचे अजून पेमेन्ट झालेले नाही.

**जयंत पाटील :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी तुम्हाला न विचारता तारीख टाकली असेल पण सभागृहामध्ये पत्रिका कोणी वाटल्या?

**रामचंद्र आसोदेकर :-**

या आमंत्रण पत्रिका आम्ही वाटल्या नाहीत.

**जयंत पाटील :-**

आपल्या शिपाईनी वाटल्या.

**रामचंद्र आसोदेकर :-**

साहेब, मला ते माहित नाही.

**जयंत पाटील :-**

पत्रिका वाटायला तो प्रींटवाला आला होता का? शिपाईकडे वाटायला कोणी दिले? मी त्या कमिटीमध्ये असूनसुध्दा मला माहित नाही. मा. महापौरांची आपण अपॉईन्टमेन्टही घेत नाही आणि तुम्ही त्यांचे नाव लिहले आहे. मा. आमदारांची अपॉईन्टमेन्ट घेत नाही. तुम्ही त्यांचे नाव लिहले आहे.

**शरद पाटील :-**

निष्काळजीपणा किती आहे त्याच्यामध्ये तारखा किती, काय कसे वार काय? तारीख काय? काही नाही. नुसते परस्पर छापले.

**एस. ए. खान :-**

हे बघायचे काम कोणाचे आहे?

**मुक्ता रांजणकर :-**

फॉरमेट दाखविला नाही आणि असेच छापायला ह्या पत्रिका पाठवल्या का?

**एस. ए. खान :-**

म्हणजे प्युनने छापायच्या आणि प्युननेच वाटायच्या का? असे आहे का? मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नाव एवढे खराब झाले आहे का? कोणाला ही माहिती द्यायची नाही. छपाईची ॲथोरिटी प्युनला दिली आहे का?

**मुक्ता रांजणकर :-**

प्युन फॉरमेट देतो का?

**उमा सपार :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही या समितीचे सदस्य आहोत. तरी आम्हाला याची काहीच माहिती नाही. आता आमच्यासमोर हे आमंत्रण आले. परवा सभा व त्या सभेमध्ये देखील हा विषय निघाला नाही.

**एस. ए. खान :-**

तुला छपायला आणि वाटायला ॲथोरिटी कोणी दिली? कोणाच्या आदेशाने हे वाटत आहे?

**शिपाई :-**

अनिता पाटील मॅडम.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्या अनिता पाटील ह्या आता सभापती आहेत का? मा. महापौर महोदया, हे तुमच्या समोर सांगत आहेत की, अनिता पाटील यांनी सांगितले.

**जयंत पाटील :-**

ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे माजी सभापती कसे काय पत्रिका वाटायला देवू शकतात?

**रिटा शाहाः-**

मा. महापौर मॅडम, ही सर्व चुकी आपल्या प्रशासनाची आहे.

**जयंत पाटील :-**

प्रशासनामध्ये हा काय गोंधळ चाललेला आहे?

**रिटा शाहाः-**

मॅडम, बांधकाम विभागातर्फे ज्या ज्या वास्तु आपण बनवितो त्याचे पत्रिका काढण्याचे अधिकार प्रशासनाला असतो. परंतु, नगरसेवक स्वतः प्रशासनाची पत्रिका काढतात. मागे आमच्या वॉर्डमध्ये पृथ्वीराज चौहाण मार्गाचे उद्‌घाटन होते तेव्हा नगरसेवक निधीच्या प्याउचे उद्‌घाटन होते. त्याचा कार्यक्रम एकत्रित करुन लावला. नगरसेवकांनी स्वतःने ते काढले. मग बांधकाम विभाग काय करतो? नगरसेवकांनी ते सर्व स्वतः काढायचे का? हे चुकीचे चालले आहे. यामध्ये प्रशासनाची चुक आहे की, असे कार्ड कोणीतरी आणून दिले आणि ते सभागृहामध्ये वाटायला नको होते.

**मुक्ता रांजणकर :-**

आपण हा कार्यक्रम रद्द करा.

**एस. ए. खान :-**

उद्याचा हा कार्यक्रम रद्द करण्याचा आदेश द्या.

**उमा सपार :-**

मॅडम, आपण हा उद्याचा कार्यक्रम रद्द करावा.

**मा. महापौर :-**

समाज कल्याण क्रिडा समिती अंतर्गत जो कार्यक्रम आयोजित केला गेला होता. परंतु, त्या संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा केल्यानंतर असे कळले की, ह्या कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थित झाले नव्हते. कोणाचाही वेळ त्या कार्यक्रमासाठी घेतला नव्हता. त्यामुळे उद्याचा कार्यक्रम हा रद्द आहे असे मी जाहिर करते.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, यापुढे अशा कार्यक्रमाला आमदारांना बोलावताना त्यांची संमती घेण्यात यावी व त्यांची अपॉईन्टमेन्ट घेण्यात यावी.

**मा. महापौर :-**

यापुढे प्रशासन जेव्हा कार्यक्रम आयोजित करेल. तेव्हा इतर सन्मा. सदस्यांचा, शहरातले सन्मा. प्रतिष्ठीत नागरीक आहेत त्यांचा वेळ घेउन आणि संबंधित विभागाचे जे सदस्य आहेत त्यांची संमती घेउनच कार्यक्रम पत्रिका, जो आपण मा. महासभेमध्ये ठराव केलेला आहे त्याप्रमाणे पत्रिका छापण्यात येईल आणि सर्वांना विश्वासात घेउन कार्यक्रम पत्रिका छापली जाईल. प्रशासनाने याची खबरदारी घ्यावी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच्यात सुधारणा करा की, कोणाचे काय कार्यक्रम आहे ते पत्रिकेमध्ये आले पाहिजे.

**रिटा शाहाः-**

मॅडम, महत्वाचा मुद्दा असा आहे की, आमच्याकडे नाल्यावर जो रस्ता बांधला, त्याचा उद्‌घाटन समारंभ ठेवला होता. त्यासाठी आपले जे सार्वजनिक उद्यान आहे तिथे आपण जेवण ठेवतो. आपले जे कर्मचारी झाडू मारतात तिथे त्यांना जेवायला बसायला देत नाही आणि आपण तिथे दुनियाभर जेवण ठेवतो. मग असा प्रकार आपल्याकडे का घडतो? कोणाच्या परमिशनने तिथे जेवण ठेवले होते?

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, राई, मुर्धा आणि मोर्वा ह्या अंतर्गत भागामध्ये जवळ जवळ दिड कोटी रुपयाची खाड्या सफाईसाठी प्रत्येकवेळी तरतुद करतो. त्यासाठी आपण स्वतंत्र हेड तयार करतो. परंतु, यावेळेला या अंदाजपत्रकामध्ये कुठलाही हेड तयार केलेला नाही. येथे नालेसफाई आणि खाड्यांचा कुठेही उल्लेख दिसत नाही. शिलोत्री लोकांची मागणी आहे की, मुळ जेवढ्या मोठ्या खाड्या आहेत त्या खाड्या साफ केल्याशिवाय शहरातल्या खाड्यांचे पाणी जाणार नाही. त्याकरिता त्याच्यासाठी जास्तीत जास्त तरतुद करावी. गेल्यावेळीसुध्दा दिड कोटी रुपये होते. पण अतिवृष्टीमुळे बरेचसे नाले बुजले गेले आहेत. त्यात जवळ जवळ वाढ करावी. खार लॅन्डच्या ज्या उघाड्या आहेत त्या खाड्यांचेसुध्दा नव्याने बांधकाम करावीत.

**मा. महापौर :-**

दिड कोटी रुपयाची नव्हे तर १५ कोटी रुपयाची तरतुद आहे.

**अनंत पाटील :-**

गेल्यावेळी देखील १५ कोटी रुपयाची तरतुद होती ना.

**श्रीकांत मोरे :-**

१५ कोटी रुपयाची तरतुद आहे व गेल्यावेळी १३ कोटी रुपयाची तरतुद होती.

**अशोक पाटील :-**

मोरे साहेब, नालेखोदाई ह्याच्यामध्येच आपण त्या खाड्या अंतर्भुत करत आहोत. १५ कोटीमध्ये संपूर्ण शहराची नालेसफाई, नालेखोदाई या शिर्षकाखालीच आपण तो १५ कोटी रुपयाचा बजेट आखलेला आहे. गेल्यावर्षी १३ कोटी ३३ लाख रुपयाची तरतुद होती. यावर्षी १५ कोटी रुपयाची तरतुद करण्यात आलेली आहे. म्हणजे प्रभागनिहाय नालेसफाई आणि नालेखोदाई ह्याच्यामध्येच त्या खाड्या खोदण्यात येतात. असे तुम्ही जाहिर करा.

**अनंत पाटील :-**

अशातऱ्हेने गेल्यावेळेला शिवनेरी नगरची तरतुद असूनसुध्दा खोदाई झालेली नाही. ती खाडी तशीच्या तशीच आहे. ते बुजलेले आहे म्हणून त्याच्यामध्ये वाढ करण्यात यावी.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी या बजेटचे समर्थन याच्यासाठी करत आहे की, सकाळपासून या विषयावर चर्चा झालेली आहे. पण त्या वेळामध्ये या बजेटमध्ये असलेल्या चांगल्या गोष्टी सरपास करण्यात आल्या. बायपास नाही पण सरपास करण्यात आल्या. यामध्ये महत्वाचे की, सामाजिक सुरक्षाखाली ह्या महापालिका क्षेत्रामध्ये दिव्याचे खांबे लावण्यासाठी वीज बिलाची तरतुद ७५ लाख रुपये करण्यात आलेली आहे. त्यासोबत या शहरातील वीज बिल देण्यासाठी सुमारे ५ कोटी रुपयाची प्रोव्हिजन आपण या अंदाजपत्रकामध्ये केलेली आहे. या अंदाजपत्रकामध्ये १ कोटी २० लाख रुपये आपण औषधे, आपले जे दवाखाने आहेत, ८ सबसेंटर्स आहेत, आरोग्य केंद्र आहे त्यांच्यासाठी आणि त्याठिकाणी येणाऱ्या गोरगरीब माणसाला फुकटचा किंवा कमी किंमतीमध्ये औषधे मिळावीत म्हणून १ कोटी २० लाखांची आपण या अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे. जी अत्यंत चांगली गोष्ट आहे. या महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये २ कोटी रुपयाची डास निर्मुलनासाठी आपण

प्राविधान केलेले आहे. त्याप्रमाणे ३ कोटी रुपये हॉस्पीटलसाठी, कलवट बांधण्यासाठी ३ कोटी रुपये, डी.पी. रोडसाठी दिड कोटी रुपये, नगर भुमापनासाठी आपण १ कोटी ३२ लक्ष रुपयाची तरतुद केली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यासाठी जरी ६ कोटी रुपयाची तरतुद केलेली असली तरी इतर कामांचा सेस घेता ह्या खात्यासाठी अत्यंत चांगल्या अशा प्रोव्हिजन ज्या आवश्यक आहेत त्या ह्या अंदाजपत्रकात मा. स्थायी सभापतींच्या शिफारसीने करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे वॉर्ड नालेसफाईमध्ये जे १५ कोटी रुपये आहेत त्याबाबत सन्मा. सदस्य अशोक पाटील व अनंत पाटील हे जे व्यक्त करत आहेत तर ह्या नालेसफाईसाठी अधिक खाडीची देखील तरतुद होईल. व्यवस्थित नियोजन करता यावे, या शहरात चांगल्या वास्तू निर्माण करण्यात याव्यात म्हणून सल्लागारांसाठी आपण ५० लक्षावरून १ कोटी रुपयाची तरतुद केलेली आहे. स्ट्रीट लाईटसाठी आपण ७५ लक्षाची तरतुद केलेली आहे. पण मा. महापौर साहेबा यामध्ये काही अशा छोटया गोष्टी राहून गेल्या आहेत ते मला निर्देश करणे भाग पडत आहे. त्यामध्ये पहिल्यांदाच मी महापौर साहेबा, त्यामध्ये आपल्याकडे लक्ष देवून बोलतो की, महापौरांच्या आतिथ्य भत्त्यासाठी फक्त ९० हजार रुपयाची तरतुद केलेली आहे. मला माहित नाही की, पुढच्या महापालिकेमध्ये कोण असतील, आम्ही असू, तुम्ही असाल, कोण महापौर असेल. परंतु, येणाऱ्या महापौरांसाठी आपण किमान ही तरतूद ९० हजार रुपयावरुन सव्वा लक्ष किंवा दिड लक्षापर्यंत करायला पाहिजे अशी माझी सुचना आहे. त्याचप्रमाणे या शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा त्रास होत आहे त्याठिकाणी चार लाखांची तरतुद केलेली आहे. ही तरतुद एखाद्या लाख रुपयाने तरी वाढवायला पाहिजे. त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा महाराज जे आपले स्वच्छता अभियान आहे त्याच्यासाठी आपण १५ लाखाची तरतुद केलेली आहे ह्याचा अर्थ या अभियानाकडे आपण अत्यंत चांगल्यापद्धतीने पाहतो असे आम्हांला वाटत नाही हे अभियान अत्यंत चांगले आहे. शहरातील रोगराई, घाण दूर करण्यासाठी हे अभियान एवढे चांगले आहे तर या अभियानाला आपण अधिक हातभार लावायला पाहिजे होता पण ते काही दिसलेले नाही. त्यामध्ये सुद्धा काही तरतुद वाढवायला पाहिजे. त्याचप्रमाणे या शहरात श्वानदंशाचा एक प्रश्न आहे की, कुत्रे चावले तर आपल्याकडे औषध मिळत नाही. सामान्य माणसाला साडे तीनशे रुपयांचे एक इंजेक्शन घेणे कठीण जात आहे. याठिकाणी आपण श्वानदंशाकरिता फक्त ३५ लाखाची तरतुद केलेली आहे ही तरतुद किमान १०-१५ लाखांनी वाढवायला पाहिजे अशी माझी आपणाला विनंती आहे. त्याचप्रमाणे आपले जे नगरभवन आहे. त्याच्यासाठी फक्त २ लक्ष रुपयाची देखभाल दुरुस्ती खर्च दिलेला आहे. तो वाढवायला पाहिजे. या शहरामध्ये अदयापही तळी, विहीरी आहेत. ही तळी विहीरी अधिक स्वच्छ करण्यासाठी डागडुजी करण्याकरिता, दुरुस्त करण्याकरिता केलेले प्रोव्हिजन ५ लाखाचे आहे ते १० लाखापर्यंत वाढवायला पाहिजे आणि मला वाईट वाटते की ते मी आपल्या निर्दशनास आणू देवू इच्छितो की, या शहरामध्ये विकेंद्रीकरणाच्या कारणासाठी ज्या प्रभाग समित्या केल्या त्या अदयापि सक्षम करण्याचया बाबतीमध्ये गंभीरपणे कोणीही बघत नाही. त्याचप्रमाणे ह्या सभागृहाने ज्या काही विधी समिती, पाणी पुरवठा समिती, अन्य ज्या चार समित्या आपण स्थापन केल्या त्यांना फक्त १० लाखाचे प्रोव्हीजन आपण दिलेले आहे हे खरंतर त्या समितीच्या कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत तुटपुंज आहे म्हणून हे प्रोव्हीजन आपण २५ लाखापर्यंत तरी वाढवायला पाहिजे अशी माझी आपल्याकडे विनंती आहे.

**अशोक पाटील :-**

गेल्यावर्षी ४० लाखाचे होते ते निदान ५० लाखाचे तरी करा.

**लिओ कोलासो :-**

त्याचप्रमाणे शहरामध्ये सिग्नल सिस्टीमसाठी आपण फक्त ३ लाख रुपयांची प्रोव्हीजन केलेली आहे. या शहरामध्ये मुख्य रस्त्यालाच फक्त सिग्नल आलेले आहे. इतर ठिकाणी सिग्नल व्यवस्थेसाठी त्या निधीमध्ये आपण वाढ करायला पाहिजे. परंतु, हे पैसे आणायचे कुठून असे आपल्यासमोर तुमच्यासमोर प्रश्न आहे. मा. महापौर साहेबा, मी आपले लक्ष वेधून इच्छितो की, ह्या बजेटमध्ये फोटाग्राफीसाठी गोड गोड चेहरे दिसावेत. हासरे चेहरे दिसावेत म्हणून पाच लाखाचे प्रोव्हीजन केले आहे ते तेवढे करता कामा नये. त्याऐवजी ते २ लाखाचे ठेवावे व त्याच्यातले तीन लाख रुपये उरवून या खर्चावर वर्ग करावे अशी सभागृहाला माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे या बजेटमध्ये माती भरावासाठी ७५ लाखाचे प्रोव्हीजन करण्यात आलेले आहे. माती टाकतो व पाउस आला तर माती वाहून जाते त्या मातीचा भरावाचा उपयोग होत नाही म्हणून ७५ लाखाची प्रोव्हीजन कमीत कमी करुन ती १०-५ लाखावर ठेवावीत आणि ह्या प्रोव्हीजनमध्ये पैसे मी सांगितलेल्या सुचनांच्या कामी उदयोगात आणावे अशी माझी आपणाला नम्र विनंती आहे. पण हे करताना मुद्दामून, सभा सदस्यांनी जी चर्चा केली व सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी बोलले की, नविन नविन कर्मचारी वाढवत आहोत. रोज नविन अपॉइन्टमेंटस् करत आहोत याला कुठेतरी आपण पायबंद घालायला पाहिजे. इथे सन्मा. सदस्या प्रभात पाटील नाही पण सन्मा. सदस्य जयंत पाटील, तूळशीदासजी म्हात्रे, आपले मोरु भाउ आपल्याला असे सांगायचे की, पेशवाई गेली पगारे-नगारे आणि महापालिका जाईल बघारे तर या महापालिकेचे असे होउ नये म्हणून सर्वांनी आर्थिक शिस्त पाळावी आणि हे बजेट प्रत्यक्ष मूळ स्वरूपता आणावे अशी मा. महापौरांची मी आपल्याला आणि आयुक्तांना विनंती करतो व मी माझे पाच मिनिटाचे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी जी सुचना केलेली आहे, काही ठिकाणी तरतुद कमी करुन ज्याठिकाणी वर्ग करण्यासाठी वाढवलेली आहे त्याठिकाणी त्यांनी सुचनाबरोबर केलेली आहे. अधिकाऱ्यांनी त्या सुचना नमुद करुन घेउन त्याचे अंमल करावे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्यांनी सगळ्यांचीच वाढ सुचवलेली आहे. तेवढे जमा कुठून करायचे? आणायचे कुठून, मास्तरांनी ते सुचविलेले नाही ते सुचवा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी साहेबा, पान क्र. ४ वर आमदार आणि खासदार फंडाच्यापोटी १० लाख रुपये सन्मा. या शहराचे आमदार मा. मुझफ्फरजी हुसैन साहेबांनी दिलेले आहेत तसेच ह्या मतदार संघाचे जे खासदार आहेत त्या खासदाराकडून एकही रुपयाचा निधी आला नाही. सन्मा. सदस्य रतन पाटील सकाळ पासून अगदी पोटतिडकीने बोलत आहेत की, महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत कुठेतरी वाढले पाहिजे. आपण त्यांना ५० लाखाचा इष्टांक देवू व त्यांनी खासदार फंड महापालिकेला आणून द्यावा.

**रतन पाटील :-**

त्यावेळेला आम्ही ते आणून देण्याचा प्रयत्न करतोय. मागच्या वेळेला सुचवले होते की, आपण कसे प्रस्तावित करायचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

अंदाजपत्रकावर सकाळपासून बऱ्याचशा सन्मा. सदस्यांनी दुरस्त्या, सुचना अपेक्षित वाढ, अपेक्षित कर्ज ह्याची सांगड घातलेली होती. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी महसूलमध्ये जी वाढ याठिकाणी सुचवलेली आहे त्यामध्ये महत्त्वाची वाढ म्हणजे पाच कोटी रुपये म्हणजे मालमत्ता करापोटी त्यांनी पाच कोटी रुपये, ५० लक्ष रुपये रस्ता नुकसान खोदाई आणि कोंडवाडे, पे ॲन्ड पार्क, जकात दंडात्मक वसूली अशी जवळ जवळ पाच कोटी ६५ लाखाची त्यांनी अपेक्षित महसूली वाढ येथे या सभागृहामध्ये सुचित केलेले आहे. तसेच, पान क्र. २९ वर भूयारी गटारे या हेडखाली आपण ३० लक्ष रुपयाची मा. स्थायी समितीने आपल्याला प्रपोझ केलेले आहेत. मी सभागृहाच्यावतीने आपणाला विनंती करतो की, मिरा भाईंदर शहरामध्ये भूयारी गटार योजनअंतर्गत १० कोटी रुपयाच्या निधी हा कर्जरुपाने उभारून भूयारी गटार योजनेचे जे पहिल्या टप्प्याचे काम आहे ते आगामी वर्षामध्ये हाती घ्यावे आणि या हेडखाली आपण जे ३० लक्ष रुपयाची प्रोव्हीजन स्थायी समितीपुढे दिलेली आहे ते ३० लक्ष रुपये पान क्र. २९ वर अनु. क्र. ९ शौचालय व मुतारी दुरुस्ती यापोटी फक्त २ लक्ष रुपयाची अपेक्षित रक्कम दिलेली आहे. त्याठिकाणी ३० लक्ष रुपये वर्ग करुन अनु. क्र. ९ वर ३२ लक्ष रुपये वाढ करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो. पाच कोटी रुपये जे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी.

**धनराज अग्रवाल :-**

मला बोलले होते की तुम्हाला बोलायला देतो पण तुम्ही सगळं फायनल करत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर आम्हाला सुद्धा बोलायचे आहे. ठराव ठेवत असतील तर अजून भरपूर चर्चा बाकी आहे. आपण ही सभा पुढच्या वेळेला लावा. आजच उरकायची गरज नाही. आमच्या अजून भरपूर सुचना आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

मालमत्ता करापोटी जे पाच कोटी रुपये अपेक्षित उत्पन्न गृहीत धरलेले आहे तर त्या पाच कोटी रुपयाचा विनियोग पान क्र. २९ वर नविन रस्ते व बांधकामे यासाठी १ कोटी रुपये त्यानंतर नविन गटारे याकरिता १ कोटी रुपये पान क्र. ३३ वर....

**रतन पाटील :**

येतील तेव्हा ना.

**हॅरल बोर्जीस :-**

पान क्र. ३३ वर नविन स्ट्रीट लाईट पोटी ७५ लक्ष रुपयाची आपण प्रोव्हीजन दिलेली आहे. आयुक्त साहेब, हे ७५ लक्ष रुपये आपला जो घोडबंदरचा मुख्य रस्ता आहे त्या रस्त्याच्या स्ट्रीट लाईटपोटी या प्रोव्हीजन दिलेला आहे तर या मालमत्ता करापोटी ५ कोटी पैकी १ कोटी रुपये नविन रस्ते बांधकाम, १ कोटी रुपये नविन गटारे दुरुस्ती, दिड कोटी रुपये स्ट्रीट लाईट बसवण्यासाठी म्हणजे तिथे ७५ लाख रुपये पान क्र. ३३

**धनराज अग्रवाल :-**

यह फायनल हो रहा है ना। हम को भी सुचना सुझाना है।

**मा. महापौर :-**

सुचना मांडत आहे आणि सन्मा. सदस्य आपल्याला बोलण्याची संधी मिळणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्यांनी शेवटला सुचना मांडायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

आपल्याही सुचना ठरावामध्ये घेतल्या जातील.

(शिवसेनेच्या व बी.जे.पीच्या सदस्यांनी सभात्याग केला.)

**हॅरल बोर्जीस :-**

नविन स्ट्रीट लाईटसाठी ७५ लाखाची प्रोव्हीजन दिलेली आहे त्याठिकाणी दिड कोटी रुपये वाढ करुन सव्वा दोन कोटी रुपये नविन स्ट्रीट लाईटसाठी आपण घ्यावे. उर्वरित एक कोटी रुपये जे शिल्लक आहेत. तर पाच कोटी रुपयापैकी दिड कोटी रुपये पान क्र. ३३ वर प्रभाग समिती आहे त्याचया निधीपोटी ४ कोटी रुपये असे चारही प्रभाग समितीला १-१ कोटी रुपये यानुसार विभागून दिलेले आहेत. उर्वरित दिड कोटी रुपये व रस्ता नुकसान भरपाई ५० लक्ष रुपये असे २ कोटी शिल्लक राहतात ते दोन कोटी रुपये शिल्लक राहतात ते दोन कोटी रुपये प्रत्येकी प्रभाग समितीसाठी ५० लक्ष रुपये याप्रमाणे २ कोटी रुपयाचे विनियोग करता यावा अशाप्रकारे मा. प्रफुल्ल पाटील साहेबांनी जी ५ कोटी ६५ लाखाची अपेक्षित वाढ सुचविलेली होती त्या अपेक्षित वाढीच्यासमोर त्याच्या खर्चाचा विनियोग आपल्यासमोर ठेवलेला आहे. अंतिम ठराव कायम करण्याअगोदर....

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण आम्हाला सुचना देण्याची संधी न देता ठराव मांडत आहात हे असेच चालले आहे व आता बाकीचे नगरसेवक ही गेले.

**मा. महापौर :-**

सभागृह नेता, आपण दोन मिनिटे थांबा. सन्मा. सदस्यांना सुचना करु द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, पान क्र. ५ वर अनु. क्र. १६ याठिकाणी वाल्मीकी आंबेडकर आवास योजना लिहिलेले आहे तर आता केंद्र सरकारने जो नविन नियम आणला आहे त्याच्यामध्ये ते नसून बी.एस.यू.पी. अंडर जो योजना आहे त्याच्या अंतर्गत मिरा भाईंदरमध्ये ४२७ घरांची विस्थापित लोकांची टेम्परररी यादी आणलेली आहे. जर आपल्याला ४२७ घरकुलांची योजना बांधायची असेल तर ही २५ लाखाची रक्कम खूप कमी पडणार आहे. सर्व्हे नं. २३३, घोडबंदर जर आपल्या ताब्यात मिळाले तर त्या जमिनीची मार्केट व्हॅल्यू किती होणार आहे हे आपण लक्षात घ्या. तसेच त्या ४२७ घरांची त्याठिकाणी वाढ करण्यात यावी. ४२७ घरं आपण २५ लाखामध्ये बांधू शकतो का? गेल्या तीन-साडे तीन वर्षापासून आंबेडकर नगर आणि भोला नगरची लोक रस्त्यावर आहेत. त्यांचे घर आपण कधी बांधणार तर कमीत कमी बी.एस.यू.पी. अंडर आपण जास्त प्रोव्हीजन करावी अशी माझी विनंती आहे. पान क्र. १५ वर बायोमेडिकल वेस्ट गोळा करणे त्यासाठी गेल्यावर्षी आपण ५ लाखाची तरतुद केली होती आणि ह्यावर्षी मा. आयुक्त साहेबांनी ७ लाखाचे केले आहे तर त्याठिकाणी स्थायी समिती ५ लाख रुपये केले आहे. आपण ते वाढवावे अशी माझी विनंती आहे. ५ लाख खूप कमी पडणार आहे. आज मिरा भाईंदर शहरामध्ये हॉस्पीटलची संख्या कमी होत नाही तर वाढत आहे. पान क्र. २० वर अनु. क्र. १५ मध्ये दलित वस्ती सुधारणा याठिकाणी गेल्यावर्षी देखिल ५० होती. यावेळी देखिल आयुक्तांनी ५० ठेवले आहे व स्थायी समितीने परत ५० केले आहे. त्याठिकाणी दलित वस्ती योजनेमध्ये आपण वाढ करावी. अनु. क्र. १८ मध्ये बी.एस.यू.पी. योजना त्याठिकाणी २५ आहेत तर त्याच्यात देखिल वाढ करण्यांत यावी. तसेच, पान क्र. ३३ वर सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब बोलले की, नविन स्ट्रीट लाईट करिता गेल्यावर्षी २.७५ लाख रु. होते तर यावर्षी फक्त २५ केले आहेत. उलट आम्हांला अजून ३०० ची गरज आहे. कारण की आंबेडकर नगर, भोला नगर गेल्या १५ वर्षापासून आहे व त्याठिकाणी अजून स्ट्रीट लाईट नाही. स्थायी समितीला ऑक्टोबरला मंजूरी मिळालेली आहे. तसेच, जनता नगर झोपडपट्टी, घोडबंदर झोपडपट्टी, पेणकरपाडा झोपडपट्टी याठिकाणी स्ट्रीट लाईट मंजूर आहेत पण त्याठिकाणी स्ट्रीट लाईट लागलेली नाही मग त्याच्यासाठी फक्त २५ तर २५ मध्ये कसे काय होईल. त्यांनी उलट कौतुक केले आहे. माझे असे म्हणणे आहे की, वाढ करण्यात यावे.

**लिओ कोलासो :-**

साहेब मी हे जे दिलेले आहे ते बरोबर आहे. हे जे सांगतात ना की, २-३ झोपडपट्टयांचा प्रश्न आहे त्याच्यासाठी ५० लाखाची आवश्यकता नाही.

**रोहित सुवर्णा :-**

दोन-तीन झोपडपट्टया नाही. कृपया त्याठिकाणी ३.२५ करावे. २५ खूप कमी आहे. आपण मला वेळ दिली त्याकरिता धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, लोड शेडींगबद्दल आहे, लोड शेडींगचा संपूर्णपणे या तीन महिन्यामध्ये प्रॉब्लेम होणार आहे. आपल्याकडे स्ट्रीट लाईटपोटी पान क्र. १४ मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती, वीज बिलाचा खर्च, स्ट्रीट लाईट आपल्या येथे संपूर्णपणे येत्या तीन महिन्यामध्ये लोडशेडींगची सुरुवात होणार आहे आणि बरोबर त्याच्याच खाली अकस्मित खर्च म्हणून दाखविले आहे. तर वरची जी काही असेल यामध्ये आपण स्ट्रीट लाईटवर जर सोलार सिस्टम केली तर हा खर्च कमी होउन आपल्याला खाली वाढवायला लागेल. कारण ही

जी नविन सोलार सिस्टम आहे ते बसवायला आपल्याला खर्च येणार आहे. आकस्मिक खर्चाची आपण सुरुवातीला १ कोटी रुपयाची तरतुद करावी. कारण दर दोन लाईटनंतर आपल्याला सोलार सिस्टम हे लावायला लागणार आहे. त्याच्यासाठी अख्ख्या बजेटमध्ये सोलार सिस्टममध्ये कुठेही तरतुद नाही आणि ह्या गर्व्हमेंटच्या स्कीम सुद्धा आहे व त्यात आपल्याला गर्व्हमेंटकडून अनुदान ही मिळणार आहे. या बजेटमध्ये आपल्याला कुठेही सोलार सिस्टमसाठी प्रोव्हीजन केलेली नाही, ती करावी. आम्ही ज्या सुचना केल्या आहेत त्यामध्ये मा. महापौरांनी कुठल्याही लेखाशिर्षामध्ये काय वाढ केलेली आहे ते अजून डिक्लर केलेले नाही. होय किंवा नाही तेही सांगितलेले नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १२२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन करुन ठराव मांडण्यात आला.

**रिटा शाह :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही सांगितलेल्या सुचना त्यामध्ये समाविष्ट केल्या का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला सभागृह नेत्यांच्या कनफरमेशनची जरुरत नाही. मा. महापौरांनी आम्ही केलेल्या सुचनांवर रुलिंग द्यावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहातील सर्व सदस्यांनी योग्य अशा सुचना सुचविलेल्या आहेत त्या सुचना या ठरावात समाविष्ट करुन घेण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर ही आपल्या काही सुचना असतील त्या समाविष्ट करुन घेण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

या संदर्भामध्ये आमची अशी सुचना आहे की, आपण फेरबदल केला किंवा कमी जास्त केले त्याची माहिती सभागृहाला अजूनपर्यंत दिलेली नाही आणि नंतर केलेल्या सुचनांना काही अर्थ नसतो. जसे ऑडीट रिपोर्टची वसूली आहे त्यावर प्रशासनाकडून, तुमच्याकडून काही रुलिंग आले का? इथे ऑडीट वसूलीमध्ये आपण किती केले? मा. महापौरांनी जे पाचचे जे दिले आहेत ते चुकीचे आहेत ते चुकीचे दिले आहे आणि तुम्ही बोलता की ते बरोबर आहे. आयुक्तांनी पाचचे अंदाज दिले आहेत त्यामध्ये आपण काही वाढ केली आहे का? तर नाही केली. पुढे सुचना ही काही केलेल्या नाहीत. त्याबद्दल मॅडम, आपले रुलिंग झालेले नाही. सभागृहामध्ये ती माफ तरी करा. आपल्याला एवढी घाई का? आम्ही मंगळवारी सुद्धा मा. महासभेला यायला तयार आहोत. सभागृह नेते आपण ठरावाचे वाचन केले ना. आम्ही तुम्हाला संधी दिली. ह्याच्यात हा शब्द आला का? ह्या येथे तुम्ही स्पेसिफीक कुठल्या नगरसेवकांची नाव घेतली, बरोबर आहे. बाकीच्यांची घेतली तर नाही. ऑडीट वसूलीबद्दल आपण काय बोललात? अधिकाऱ्यांकडून येणारी वसूली त्याच्यामध्ये आयुक्तांनी पाचचा अंदाज दाखविला आहे त्याच्यात काय सुधार केले का? कारण मागच्या सभेमध्ये असेच झाले आणि त्यात काही केले नाही व त्या पाचचे रिफलेक्शन ह्या बजेटमध्ये परत केले गेले त्याबद्दल काहीतरी बोला. ठराव आपण आरामशीर पावणे सातला वाचा व सातला आपण मिटींग संपू या. काही घाई केलेली नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण नविन बजेटमध्ये जी वाढ केली ती आम्हाला रक्कम सांगा. मग तुम्ही ठरावावर रुलिंग द्या. नंतर आपण आमच्या सुचना घ्याल किंवा नाही त्याची गॅरंटी काय?

**मिलन म्हात्रे :-**

याप्रकरणी गेल्या वेळेला मा. महापौरांनी आदेश दिलेले आहेत. या सभागृहात रुलिंग झालेले आहे ते पाळलेले नाही. त्याबद्दल आपल्या भाषणात कुठेही उल्लेख नाही. ऑडीट रिकव्हरीमध्ये हे चुकीचे आहे हे बरोबर आहे. आयुक्तांचे अंदाज बरोबर असतील तर तसे आपण सांगा. या सभेमध्ये ठरावामध्ये तसे नमुद करा. आयुक्तांनी जे पाच हजाराचे अंदाज दिले आहेत ते बरोबर आहेत. विषय संपला.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपल्याला स्पेशल अशी सुचना आहे की, आपण काय करता की, सभागृहाचे कामकाज चालू असेल व सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा तर अगदी शेवटपर्यंत गप्प बसलेले असतात आणि सभा संपायला येते त्यावेळेला उठून मला खुप बोलायचे आहे असे दरवेळेला निर्दशनास आणून देता. आपण यावर खुलासा करण्याची गरज नाही. आपण तज्ञ आहात या विषयावर माझे काही दुमत नाही. पण या चुकीच्या विषयात तज्ञ आहात. आपण शेवटीच उठता हा आतापर्यंतचा आमचा अनुभव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

यावेळेला ह्याच मिटींगमध्ये ही पद्धती तोडली गेली आहे. आपण दरवर्षी पान व्हाईज चर्चा करतो. तुम्हाला मी मघाशी बोललो की, पान व्हाईज चर्चा करा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील पान व्हाईज गेले तेव्हा आपण आपल्या सुचना मधेमधे दिल्या असता तर त्या सुचनांचा स्वागत केला असता.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांचा प्रश्न नाही.

**मा. उपमहापौर :-**

संपूर्ण दिवसभर अशाच विविध विचार येतील म्हणून आपण सभागृहाचे कामकाज करत असताना प्रत्येकाला १० मिनिटे बोलता आले पाहिजे आणि जास्त बोलणाऱ्यांनी ही ह्या गोष्टी शिकून घेतल्या पाहिजे की, आम्ही किती बोलले पाहिजे? खूप बोलायचे आणि सभागृह सोडून जायचे. म्हणजे सभागृहाचा तुम्ही वेळ वाया घालविता आणि महत्त्वाच्या विषयावर चर्चा टाळण्यासाठी तुम्ही असे करता हे स्पष्ट होते.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सभागृह सोडून गेलेलो नाही आणि सचिवांनी पान व्हाईज घेतलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

बजेटच्या चर्चेची आजची मिटींग उद्यापर्यंत चालली तरी हरकत नाही. परंतु, जेव्हा आपल्या टप्प्यामध्ये आहे. आपण ते करु शकतो त्यावेळेला जाणीवपूर्वक लेट करण्याचे काही कारण नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही का म्हणून लेट करणार?

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला विनंती आहे की, आम्ही आपल्याला वारंवार सांगतो की, सुचना तरी करा पण आपण सुचना करत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, सन्मा. सदस्यांना जे अपेक्षित आहे ते ठरावामध्ये अंतर्भूत करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण कुठले म्हणत आहात? दिवसभर काय झाले? आपण जे वाचन करता त्या ठरावामध्ये कसलाही उल्लेख नाही. ऑडीट वसूलीचे काय केले ते बोला. आमची सुचना आहे बारा करोड दाखवा. त्यावर काय बोलता ते बोला.

**हॅरल बोर्जीस :-**

सभागृहामध्ये नुसते १२ करोड करुन बोलणार चालणार का? त्याला ऑथेनटिक काहीतरी पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे :-**

कसले ऑथेनटिक ? लेखापरिक्षणाचा अहवाल आहे.

**मा. उपमहापौर :-**

लेखापरिक्षणामध्ये पहिलाही सांगितले आहे की, १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त १५ हजार रुपये श्री. रमेश म्हात्रे साहेबांनी उचलले. त्यांच्याकडेच त्यांनी खर्चाची बिल कोणाकडे अदा केली. परंतु, ती ऑडीटरपर्यंत पोहचली नाही म्हणून आपल्याला ती रक्कम दिसत आहे. अशा बऱ्याच रक्कमा आहेत त्यामुळे आपण १२ करोड रुपये अशा काही फिगर सांगू नका. आपल्या सुचना करा. बजेटविषयी ज्या सुचना आहेत त्या करा.

**मिलन म्हात्रे :-**

हे बजेट विषयीच आहे. आयुक्त साहेबांनी पाच हजार रूपये दाखविले आहेत ते बरोबर आहे तेवढेच बोला. मग ते का नाही बोलत.

**मा. उपमहापौर :-**

आपण बजेटवर आपल्या सुचना करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

मी बोलत आहे ना. त्यावर माझी सुचना आहे. तुम्ही त्याच्यावर बोला ना की, तुमची सुचना फेटाळली आणि पाच हजार ही फिगर आहे अशी आपण आम्हांला रुलिंग द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्यांना जे अपेक्षित आहे ते आपण ठरावात अंतर्भूत करुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जर पान व्हाईज रुलिंग दिले असते तर विषय संपला होता. तुम्ही असे करा, माझी जी काही सुचना आहे ती आपण फेटाळा आणि तो जो फिगर दाखवला आहे तो बरोबर दाखवा. त्याव्यतिरिक्त मला आणखिन काही नको.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. उपमहापौरांनी आपल्या नावासह सुचना अंतर्भूत करा असे सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या सुचनांची नोंद घेतली ते बरोबर आहे. मी फिगर बोललो. मला तो फिगर कुठेतरी चौकटीत दाखवा की, हा फिगर आम्ही घेतला आहे. हे मी तुम्हाला परत परत सांगत आहे. माझ्या सुचना घेउ नका. आपण मला फिगर सांगा.

**मा. उपमहापौर :-**

आपण पहिली सुचना केली ती ५५ कोटी रुपयाची.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आमचा काही वाद नाही.

**मा. उपमहापौर :-**

अजून कुठचे?

**मिलन म्हात्रे :-**

ऑडीट वसूलीबाबत गेल्यावर्षी हे प्रकरण गाजले. आयुक्तांनी आदेश देवून सुद्धा पाच चे सहा झाले नाही किंवा साडे पाच हजार ही झाले नाही.

**मा. उपमहापौर :-**

या विषयात आपण असे ठरविले की, सभागृहामध्ये चर्चा झाली की, स्थायी समितीमध्ये आढावा चर्चा होणार आहे त्याच्यामध्ये ही चर्चा होणार आहे आणि हे पॉइंट काय जात नाही. हा जो ॲथोनटीक रिपोर्ट आला आहे असा रिपोर्ट गेल्यावर्षी नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

तेच बोलत आहे की, हा एवढा लेट कसा काय आला?

**मा. उपमहापौर :-**

हा रिपोर्ट आला आहे व त्याच्यावर अंमलबजावणी चालू आहे व जिथे ज्याची ज्याची जबाबदारी जिथे आली आहे. ज्याचे नाव आलेले आहे त्यांना त्याप्रमाणे रिपोर्ट सादर करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे गेल्या १४ वर्षापासून चालू आहे.

**मा. उपमहापौर :-**

बजेटमध्ये पान व्हाईज जी सुचना करायची आहे ती करावी अशी आपल्याला विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी म्हणतो ना, मी जी सुचना केली आहे ती फेटाळून लावा. आणि आहे तो फिगर सांगा म्हणजे विषय संपला. तेही कोण बोलत नाही. ऑडीट वसूलीमध्ये फिगर वाढवले आहे का नाही? तसे सांगा ना की, हे पाच हजार योग्य आहे. आहे तो फिगर बरोबर आहे असे बोला.

**हॅरल बोर्जीस :-**

फिगरबाबत तर तुम्ही बोललाच आहात ना.

**मिलन म्हात्रे :-**

वसूली होईल किंवा नाही पण तुम्ही त्याच्यामध्ये वाढ का केली नाही? ५.५ ही दाखविले नाही ५ आहेत आणि गेल्यावर्षी ही पाचच होते. तुम्ही असे कसे बोलता? म्हणजे लेखापरिक्षकांनी जे अहवालाचे संपूर्ण ताशोरे ओढले आहेत ते चुकीचे आहेत असे तुमचे म्हणणे आहे का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे गेल्या १४ वर्षामध्ये लेखापरिक्षणाचा एवढा सुस्पष्ट अहवाल सभागृहासमोर कधीही आला नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

पण आता आला आहे ना।

**हॅरल बोर्जीस :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी लेखापरिक्षकांना मनापासून धन्यवाद दिलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्यावेळी श्री. नाकाडी ह्यांनी काय केले? गेल्या बजेटच्या मिटींगनंतर जवळ जवळ सहा महिन्यापर्यंत श्री. नाकाडी हे भाईंदरमध्ये होते.

**हॅरल बोर्जीस :-**

स्थायी समितीने त्यांना महिनाभराची मुदत दिल्यानंतर ते पुढच्या स्थायी समितीसमोर येणारच आहे ना.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सुरेश बनसोडे लेखाधिकारी साहेब आपणच त्याच्याशी बोलावे.

**मिलन म्हात्रे :-**

बोला आणि मला हेही सांगा की, महापालिकेच्या मुख्यलेखापरिक्षकांनी सहा महिने काय दिवे लावले. हे बिचारे तीन महिने झाले आले आहेत? त्यांना ७ महिने महापौरांच्या रुलिंगवर काय केले? त्यांचे काम काय?

**सुरेश बनसोडे :-**

सर्वप्रथम मा. महासभेला अभिवादन करतो. तसेच, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त व सर्व सदस्यांना अभिवादन करतो. जो प्रश्न सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी विचारले व त्यांनी काही मुद्दे आपल्यासमोर मांडले त्याचा मी खुलासा करतो. सर्व प्रथम ऑडीट अहवालाबद्दल बरीच चर्चा येथे मी ऐकली जे काही मला कौतुकास्पद वाटले ते मी सांगतो. लेखापरिक्षण करणे म्हणजे हा रुटीन जॉब असतो. ह्याच्यामध्ये लेखापरिक्षकाचा जितका अभ्यास असतो किंवा जितका ज्या दृष्टीने बघू शकतो. मला थोडाफार अनुभव होता म्हणून मी काही काही मुद्दे आपल्यासमोर मांडले. परंतु, लेखापरिक्षण ही एक र्निबंधक प्रक्रिया आहे. तुम्ही हा जो ऑडीट अहवाल किंवा ह्याचे बारीक बारीक परिच्छेद आहे ते विविध विभागाकडे दिले जातात. त्यावर विविध विभागाचे उत्तर येतात ती उत्तरे बरोबर आहेत की नाही. की चुकीचा मुद्दा दिलेला आहे. समजा मी अ आणि ब मुद्दयाबाबत विचारले असेल तर केवल ब मुद्दयावर उत्तर दिले आहे. ह्या सगळ्यांचा सारासर विचार करुन त्यातले काही मुद्दे कट होतात. साधारणतः जो मोठा नागरी अहवाल बनतो त्या मोठया नागरि अहवालामध्ये हे जे परिच्छेद आहेत ते घेतले जाता. अहवालाची तीन स्तरीय रचना आहे. एक मी हा मुख्यलेखापरिक्षक हा या डायसवरून फक्त अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम करतो. त्यांनतर ए.जी.चा अहवाल येतो आणि एक लोकल फंडाचा अहवाल असतो. माझ्या अहवालामध्ये ज्या ज्या बाबी जे आपण बारा कोटी, १४ कोटी म्हणतात त्याकरिता मा. सभागृहाची थोडी क्लिआरिटी मी आपल्या समोर आणतो की ज्या अग्रीमाची रक्कमा आहेत त्या १९९१ पासून कॅरीफॉरवर्ड होत आल्या आहेत. यामध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी अग्रीम उचललेले आहेत त्यांनी ते लेखा पटकन सबमिट करणेबाबत थोडी दिरंगाई केली आहे ही बाब मान्य आहे. पण त्यांनी ते पैसे ज्या कामासाठी खर्च केले ते जर बॅलन्स झाले तर त्या लेखापरिक्षणामध्ये त्याची जी वसूली दिसते ती दिसणार नाही. यामध्ये काही काही मिसअॅप्रोप्रिएशन असतील. मिसअॅप्रोप्रिएशनचा जेव्हा भाग येईल तेव्हा अर्थात त्या माणसावर म्हणजे त्याला पहिल्यांदा संधी दिली जाते आणि मग त्यांनी उत्तर दिल्यावर त्यावर निर्णय दिला जातो. त्याच्यात असे बरेच मुद्दे आहेत. ज्या ज्या विभागांचे ज्या ज्या उपविभागांचे लेखापरिक्षण केले त्यामध्ये एकूण तीन प्रकारचे म्हणजे प्रफॉमन्ससाठी म्हणजे एखादा विभाग जर चुकीच्या दिशेने काम करत असेल तर तुमची दिशा चुकीची आहे हे सांगायचे काम ऑडीटचे आहे आणि मला वाटते याच्यापुढे जे येणारे अहवाल असतील व जी कार्यपद्धती असेल ती माझ्या अहवालाला बांधिल धरून असेल. एकदा मी प्रशासनासमोर माझे अहवाल सादर केले म्हणजे प्रशासनाने त्यांची भूमिका स्पष्ट केली आणि परत ती चुक होउ दिली नाही म्हणजे आपल्या महापालिकेने बरेच काही मिळविले असे म्हणता येईल. याबाबत अजून ही मी सांगतो की, जे लोकलेखे असतात किंवा लोकांचा जो निधी असतो त्याच्यावर अंकूश करणे हा एक मोठा अधिकार मला प्रदान केलेला आहे. या अधिकाराशी प्रामाणिक राहून मी आधीच्या बद्दल तर काय बोलणार नाही. मी माझ्या कारकिर्दीमध्ये आल्यानंतर जेवढे बघितले तेवढे सर्व प्रामाणिकपणे आपल्या समोर मांडणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. मी मा. सदस्यांचा फार आभारी आहे. तुमच्याबद्दल मला फार आदर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मला हे सांगा की, आपल्याकडे लेखापरिक्षणाचा अहवाल सगळ्यात पहिला आलेला आहे त्याला आता सहा वर्षे होत आली. या सहा वर्षाच्या अगोदर त्या सगळ्या अधिकाऱ्यांना संधी दिलेली आहे आणि त्यांनी जाणूनबूजून स्वतःचे म्हणणे यांच्यापुढे मांडले नाही आणि त्या रक्कमेबद्दल खुलासे केलेले नाही. त्यावेळेला त्यांना संधी दिल्या होत्या. नैसर्गिक न्याय ह्या दृष्टीकोनातून ज्यांना संधी दिल्या गेल्या त्या लोकांनी त्यांच्या स्ट्रीक्चरवर ओपिनियन आणून दिले नाही हे काम आहे आमचे नाही.

**सुरेश बनसोडे :-**

या लेखापरिक्षण अहवालामध्ये आपण जे काही मुद्दे मांडत आहात तो कर्मचारी संबंधित आहे आणि काही कार्यपद्धती संबंधित आहे. कार्यपद्धतीमध्ये टिका असताना त्या विभागाने ती कार्यपद्धत बदलावी आणि महापालिकेचा तोटा करु नये असे माझे म्हणणे आहे. तुम्ही जे म्हणता की एखाद्या कर्मचाऱ्याला सहा वर्षे दिलेली आहेत. पण होते कसे उदा. जसे विकास आकार शुल्क आहे यामध्ये आपण बजेटींग केले होते १२ कोटी रुपयाचे ते झाले आठ कोटी पर्यंत म्हणजे ते लॅब झाले पण असे नाही. ही झाली कार्यपद्धती ज्या अग्रीम रक्कमा उचलल्या किंवा ज्याच्या पावत्या त्या सादर करु शकले नाही ती त्या इंडीव्ह्यूजल कर्मचाऱ्यांची त्रुटी मा. स्थायी समिती समोर हा अहवाल सादर केल्यानंतर त्यांनी प्रत्येक कर्मचाऱ्याला काही फिगर दिलेला आहे. त्या फिगरच्या आतमध्ये ते सर्व अनुपालन अहवाल माझ्याकडे सादर करतील आणि जे अनुपालन अहवाल सादर करणार नाहीत त्याच्यावर आपल्या मा. महासभेसमोर मांडले जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या स्थायी समितीचा विषय येथे काढू नका. स्थायी समितीच्यावर मा. महासभा आहे आणि त्यावेळेला जी ऑडीटची सभा होती त्याच्यात मी बोललो होतो. स्थायी समितीने हा जो अहवाल आहे तो आमच्या म्हणण्याप्रमाणे तीन महिने अगोदर द्यायला पाहिजे होता. हे सगळं आम्हाला अगोदर आले पाहिजे होते. आपली ही बजेटची सभा झाल्यानंतर स्थायी समिती बोलेल की, असे करायचे आणि तसे करायचे त्याचे रिफलेक्शन ह्याच्यामध्ये येणार नाही ना. दुसरे असे आहे की, त्यांना त्या त्यावेळेला संधी दिल्या होत्या आणि त्याची वसूली करणेकरिता नावासकट रक्कमेसह दिलेले आहे असे असताना ठिक आहे. श्री. रमेश म्हात्रे ह्यांचे येणं बाकी आहे मग त्यांनी सहा महिने स्टेटमेंट का दिले नाही. सहा वर्षे रमेश म्हात्रे का गप्प बसले? उदया मिलन म्हात्रे गप्प बसले म्हणजे त्याच्यामध्ये मी अजून अपहार हा शब्द दिलेला नाही. पण ज्यावेळेला माझ्याकडून क्लिअरन्स येणार नाही तेव्हा अपहार होते हे लक्षात घ्या. कुठल्याही अधिकाऱ्याला नैसर्गिक न्याय न देता त्याच्यावर कार्यवाही करा असे मी म्हणत नाही पण सहा सहा वर्षे. साहेब त्याच्यामध्ये टाईम बॉन्ड लिमिट आहे. तुम्ही सभागृहाला नीट समजावून सांगा की, या कालावधीमध्ये त्यांनी त्यांचे म्हणणे, पावत्या, रजिस्टर, चेक अमुक तमुक सर्व सादर करायचे होते. तो कालावधी सभागृहापुढे सांगा. मला स्थायी समितीचे सांगू नका. मी गेल्यावर्षीच्या मिटींगचे मा. महासभेचे सांगत आहे. त्याच्या नंतरचा इतिहास सांगतो त्याच्यावर मा. महापौरांचे रुलिंग झाले आहे. त्यावेळेला अधिकाऱ्यांना जो कालावधी दिला होता त्या कालावधीमध्ये आपण करावे तो कालावधी सांगा.

**सुरेश बनसोडे :-**

साधारणतः एखाद्या आर्थिक वर्षात एखादा अग्रीम उचलला गेला तर त्या वर्षाचे ३१ मार्च जो आर्थिक वर्षे असतो त्याच्या आत करणे आवश्यक असते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्यावेळेला जो लेखापरिक्षण अहवाल झाला व त्यांनी जे स्ट्रीक्चर काढले की म्हात्रेवर एवढे एवढे बाकी आहे त्याच्यात त्याचे म्हणणे त्यांनी मांडावे. कागदपत्र काय असतील ते सबमिट करावे अन्यथा त्यांच्याकडून हे वसूल केले जातील हे बरोबर आहे ना. मी वाचलेले आहे. माझ्याकडे त्याची सर्टीफाय कॉपी आहे. असे असताना आपण त्याच्यावर कुठलीही कार्यवाही केली नाही. तुमच्या अगादेर श्री. नाकाडी होते त्यांना हे सगळे माहित होते. पण त्यांनी त्याच्यावर काय कार्यवाही केली नाही. आता आपण स्थायी समितीचे नाव घेउ नका. स्थायी समितीने काय करायचे आहे ते स्थायी समिती करेल. पण मागच्या मा. महासभेमध्ये जे ठराव झाले त्याच्यावर काहीही कार्यवाही झाली व त्याचा परिपाक आता हे परत पाच हजार रुपये दाखविण्यात आलेले आहे. त्यावेळेला काहीतरी केले असते तर हा फिगर जरुर बदलला असता. आपण जी पाच हजार रुपयाची ऑडीट रिकव्हरी दाखविली आहे ती योग्य आहे का, अयोग्य आहे एवढे बोला. बाकी मला पुढे काही म्हणायचे नाही. तुम्ही जर योग्य बोललात तर दॅट्स सॉल्व्ह माझे काहीच म्हणणे नाही आणि तुम्ही जर बोललात की, हे अयोग्य आहे तर मग किती असली पाहिजे हे तुम्ही आम्हाला सांगा.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी जो लेखापरिक्षणाचा अहवाल दाखल झालेला आहे आणि यासाठी श्री. बनसोडे साहेबांनी जी काही मेहनत घेतलेली आहे व हा अहवाल ज्यावेळेला प्रिंट केला त्या अगोदरपासूनचे हे सर्व अधिकारी आणि कर्मचारी आपल्या महापालिकेचे आहेत ना. त्यांनी त्यांच्याकडे विचारणा केली का? तुमच्याकडून एवढे एवढे पैसे निघतात. ते तुम्ही भरणार आहात का अशी विचारणा आपण केली होती का? मग केली होती व त्यांनी सबमिट केले नाही तर त्याच्यावर पुढील कायदेशीर कार्यवाही करा. आयुक्त साहेब, त्यांचे म्हणणे असे आहे की, हे प्रिंटींग करण्यापूर्वी मी सर्व अधिकाऱ्यांना कळविले होते. तुम्ही बिल वगैरे काय आहे ते द्या आणि त्याची इच्छा जर देण्याची नसेल तर तुम्ही त्यांच्यावर कार्यवाही करा ना. वैयक्तिक ज्यांच्यावर पैसे निघतात त्यांचे तुम्ही पेमेन्ट थांबवा.

**आसिफ शेख :-**

कार्यवाही करण्यापेक्षा मला असे वाटते की, सर्व लोक आपली आहेत त्यामुळे ती रक्कम निर्लेखित करा. एकदम रामबाण उपाय.

**रिटा शाह :-**

साहेब, ते खोटे आहे. निर्लेखित केले म्हणजे आपण काहीतरी चो-या केल्या व ते माफ करतो असे सिध्द होणार व आपण जे कार्यपध्दतीचे सांगितले त्याच्यामध्ये कर विभागाचे विदाउट रजिस्ट्रेशन जे ट्रान्सफर केले आहे व मालमत्ता कर लावले आहे व स्टॅम्प डयुटी ते सर्व रेग्यूलाईज करुन घ्यावे.

**श्रीकांत मोरे :-**

एकूण अग्रीम रक्कम १ कोटी ४० लक्ष रुपयाची होती. त्यापैकी ६८ लाख ५५५ रुपये वसूली झालेले आहेत आणि ३२ लक्ष रुपये वसूल व्हायचे बाकी आहेत आणि ते कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात करण्याकरिता आस्थापनातून कळविलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे ही पाचची फिगर योग्य आहे का अयोग्य आहे?

**प्रकाश दुबोले :-**

बाकीचे जे काही राहिले आहे व या अहवालामध्ये आपण ज्या काही त्रुटी दाखविलेल्या आहेत त्याचा ऑडीट रिपोर्ट आपण तयार करा व ते परतफेड करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याकडे अंदाजित रक्कम असताना फक्त पाचचा फिगर येतो म्हणजे काय? अग्रीम रक्कमेबाबत बोला.

**श्रीकांत मोरे :-**

अग्रीम रक्कम १ कोटी ४० लक्ष रु. होती त्यापैकी ४४ लक्ष रु. वसूल झाले आहेत आणि ३२ लक्ष रु. कर्मचाऱ्याकंडून वसूल व्हायचे आहेत आणि ३७ लक्ष रु. मार्तंड दायत्वे कडून वसूल व्हायचे आहे आणि ३२ लक्ष रु. जी रक्कम वसूल व्हायची आहे ती आम्ही आस्थापना विभागाला त्यांच्या पगारातून वसूल करण्याकरिता कळविलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे येणं बाकी आहे ना. वसूली बाकी आहे मग पाचच्या फिगरमध्ये बदल का झाला नाही? तुम्हीच येथे माहिती देता आणि तुम्हीच येथे फिगरमध्ये काही बदल केलेला नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

याठिकाणी बजेट प्रोव्हीजनमध्ये लेखापरिक्षणाचा अहवालाचा ह्यांच्यात काय संबंध येईल? तुम्ही हे स्पष्ट करा.

**मिलन म्हात्रे :-**

संबंध येणार. ही वसूली का होत नाही?

**प्रफुल्ल पाटील :-**

लेखापरिक्षणाच्या अहवालामधल्या त्रुटी आहेत त्या आर्थिक वर्षात ते हिशोब आलेले आहेत. त्या प्रत्येक आर्थिक वर्षाची येणी त्यांनी दाखविलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे रुलिंग दया की, ऑडीट वसूलीमध्ये हा विषय येत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

लेखापरिक्षणाचा विषय नाही म्हणून मी मगाशी स्पष्ट केले की, लेखापरिक्षण अहवालावर जर आज चर्चा करायची असेल तर बजेट बाजूला राहू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मग ते तरी पूर्ण घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणून लेखापरिक्षणाचा अहवाल हा विषयसुद्धा आपण घेतलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्यावर्षी जे रुलिंग झाले त्याच्याबद्दल काय झाले? त्यावेळेला आपण बोलला होता की, आपण ती सुधारणा करुन ह्यावेळच्या लेखाशिर्षकामध्ये ती नोंद होईल. ह्यांनी जे स्टेंटमेंट केले त्याच्यामध्ये अजून येणं बाकी आहे. तरी म्हणा पाच योग्य आहे तरी चालेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

लेखापरिक्षणाचा अहवालामध्ये असलेल्या त्रुटीमुळे जर महानगरपालिकेचा फायदा किंवा तोटा होत असेल तर त्या संदर्भात अहवाल फायनल झाल्यानंतर पुन्हा मा. महासभेसमोर ठेवा. पण त्याच्यामुळे बजेटच्या फिगरवर कसा काय इफेक्ट होणार?

**मिलन म्हात्रे :-**

मी ऑडीट वसूलीबद्दल बोलत आहे. बजेटच्या विषयावर बोलत नाही. आता जे अधिकाऱ्यांनी ३८ कोटी रु. वसूली दाखविली आहे. ती वसुली आहे की नाही तेवढे सांगा आणि जर चुकीचे असेल तर तसे रुलिंग दया की, हे पाच बरोबर आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

लेखापरिक्षण अहवालावर जर बोलायचे असेल तर मला १ तास बोलायला दया. कारण मला ह्याच्यावर खूप बोलायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला सगळ्यांनाच बोलायचे आहे. दोन दिवस कमी पडतील. पण हा जो लेखाशिर्षकामध्ये पाच हा फिगर दाखवलेला आहे तर ह्याच्यात काहीतरी फिगर दाखवा. श्री. श्रीकांत मोरे ह्यांनी जी वसूलीची रक्कम दाखविली आहे. त्याच्याबद्दल काय तेवढे बोला. ते तुम्ही कुठे प्रोजेक्ट केले आहे. आम्हाला ते लेखाशिर्षक दाखवा. ४१ लाख रु. वसूल झाले व जे बॅलन्स असेल ते आम्हाला दाखवा ना.

**श्रीकांत मोरे :-**

सन्मा. मिलन म्हात्रे साहेब, आपल्याला मी अग्रीम रक्कमेबद्दल हिशोब दिलेला आहे. आपला जो प्रश्न लेखापरिक्षणाचा बाबतीत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अग्रीम जी रक्कम वसूल केली ती कुठल्या शिर्षाखाली जमा झाली ते दाखवा ना.

**श्रीकांत मोरे :-**

अग्रीम रक्कमेचे समायोजन केले आहे. आपल्याला लेखापरिक्षणाची जी माहिती पाहिजे ती माहिती आपल्याला देतो. पान क्र. ३, १६ क्रमांक ऑडीट वसूली पाच हजार दाखविलेली आहे व लेखापरिक्षण जो अहवाल आहे तो त्या विभागाला वाटप करण्यात आलेला आहे. त्यांच्याकडून अहवालाची पुर्तता करुन घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे जी रक्कम वसूल होईल ती त्या त्या विभागाच्या नावे जमा करण्यांत येईल. त्यामुळे ती येथे दाखविण्यांत आलेली नाही. पाणी विभागाची वसूली असेल तर ती पाणी विभागात वसूल केली जाईल. कर विभागाची जी वसूली आहे ती कर विभागात वसूल केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे गेल्यावर्षी जी रुलिंग दिली त्यानुसार अजून वसूल झालेली रक्कम ही दाखविलेली नाही आणि होणारी ही दाखविली नाही एवढे तर सत्य आहे ना. आपण प्रोजेक्शन सेपरेट त्याला बोल्ड शाहीमध्ये करायला पाहिजे होते. ते केले नाही.

**रिटा शाहाः-**

साहेब, मुख्य मुद्दा असा आहे की, जे ३२ लाख रु. लेखापरिक्षणाचा हिशोबाने वसूल केले ते त्या त्या विभागाने केले असेल व त्या विभागाने वसूल केलेली जेवढी रक्कम असेल जसे पाणी विभागाने पाच लाख रु. वसूल केले असे आपण लेखापरिक्षणाच्या हिशोबाने ३२ लाख रु. वसूल केले आहेत ना. कर विभागाने दोन लाख रु. वसूल केले. दुसऱ्या विभागाने एक लाख रु. केले असेल असे त्या त्याविभागाने ह्या बजेटमध्ये ती वसूली दाखविली आहे का? तेवढाच त्यांचा प्रश्न आहे.

**श्रीकांत मोरे :-**

लेखापरिक्षण मधली जी वसुली आहे ती त्या त्याविभागात वसूली केली जावून जमा केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण मी एका वर्षाचे बोलत आहे. गेल्यावर्षी हा मुद्दा चर्चेला आला होता. एक वर्षात आपण काय काय केले जे केले तेही दाखविले नाही आणि केले तेही दाखविले नाही. मी तेच बोलत आहे व महापौर मॅडम ह्यांनी त्याच्यावर तुमची नोंद घेतली जाईल असे सांगितले.

**श्रीकांत मोरे :-**

पान क्र. ३ वर जी ऑडीट वसूली आलेली आहे ती सन २००३-०४ मध्ये १ हजार रु. वसूल झालेली आहे. सन २००५-०६ मध्ये दिड लाख रु. वसूल झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आणि ह्याच्यात फक्त पाच हजार रुपये आणि पुढे काहीच नाही.

**श्रीकांत मोरे :-**

यामध्ये जी जी वसूली होणार आहे ती त्या त्या विभागामध्ये जमा करण्यांत येणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण तुमचे पुढचे कॉलम ही ठणठणीत आहेत. आता तुम्हीच मला लेखाशिर्षक दाखविले.

**मा. उपमहापौर :-**

म्हात्रे साहेब, आपण प्रोव्हीजन किती करायची सांगता. तर ३८ लाख रु. ची.

**मिलन म्हात्रे :-**

श्रीकांत मोरे साहेबांनी जे दिले आहे जी वसूली बाकी आहे ती करायची आहे.

**मा. उपमहापौर :-**

ऑडीटमध्ये बरेच पॉइंट आहे. ३८ ऐवजी ५० लाख रुपयाची प्रोव्हीजन आपण त्याच्यामध्ये करुन ठेवावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

असे कसे तुम्हाला काहीही करता येईल. मा. उपमहापौर साहेब, ती अग्रीम रक्कम आहे. ती रक्कम घेउन कोण कर्मचारी पळालेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

नंतर त्याचे समायोजन होणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ऑडीटरने ती वसूली दाखविली पाहिजे. तर वसूली म्हणून दाखविलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

प्रॅक्टीकल ते उत्पन्नाचे साधन नाही. ३८ लाख रु. ऐवजी ५० लाख रु. करुन ठेवा. पण ती फक्त समायोजित होणार आहे. त्यापासून उत्पन्न होणार नाही. त्यात नोंद करु शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

मग ती नोंद करुन घ्या ना. मी तेच बोलत आहे. आम्ही वसूल करा म्हणून कुठे बोलत आहेत. उत्पन्न कुठे म्हणतोय? ऑडीट वसूलीच झालेली नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांच्या ज्या दोन तीन सुचना होत्या त्यामध्ये आयुक्तांचे अंदाज होते सात लक्ष रु. व स्थायी समितीने पाच लक्ष रु. केले तर त्यांची सुचना अशी आहे की, ते ७ लक्ष रु. ठेवावे. ही एक दुरुस्ती करुन घ्यावी.

**जयंत पाटील :-**

त्याच्यामध्ये असे आहे की, बायोमेडिकल वेस्ट जे आहे ते जे खाजगी हॉस्पीटल आहे त्याच्यातून ते करतात. त्याचे कॉन्ट्रक्ट दिलेले आहेत. त्याच्यामुळे आपल्याला त्यांच्याकरिता प्रोव्हीजन करण्याची गरज नाही. हे फक्त आपल्या सरकारी हॉस्पीटल करिता आहे. त्याच्यामुळे ह्याच्यात प्रोव्हीजन करण्याची आवश्यकता नाही. या विषयाची स्थायी समितीमध्ये चर्चा झालेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

असे असेल तर निल दाखवा.

**हॅरल बोर्जीस :-**

आपल्याला जर प्रोव्हीजन करण्याची आवश्यकता नसेल तर जे ठेवले आहे ते कमी करा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपल्या मालकीचे जे आरोग्य केंद्र आहे त्याच्यासाठी आपल्याला तरतुद ठेवावी लागेल.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. उपमहापौर साहेब, पान क्र. २० वर सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा ह्यांनी एक दुरुस्ती सुचविलेली आहे. १५ क्रमांकाचा जो हेड आहे, दलित वस्ती सुधारणा या हेडखाली आयुक्ताचे ५० लाख रु. चे अंदाज होते. व स्थायी समितीने ही ५० लाख रुपयाचे दिलेले आहेत त्याच्यामध्ये १० लक्ष रुपयाची वाढ करावी अशी सुचना आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दलित वस्ती सुधारणामध्ये आपल्याकडे दलितांसुद्धा एक स्कीम आहे व आपण त्याचे अनुदान घेतलेले नाही. अंशदान आणि अनुदान महापालिका घेत नाही. आजपर्यंत घेतली नाही त्याकरिता ही जी प्रोव्हीजन आहे ती दिडची करा. कारण आपल्याला गर्व्हमेंट देते आणि आपण घेतलेले नाही. त्यांना १० एम.एल. पाणी देण्याची ही गर्व्हमेंटची स्कीम आहे. तसा जी.आर. आहे व तो जी.आर. मी आपल्याला उदया आपल्या कार्यालयात पोहचवतो.

**मा. उपमहापौर :-**

म्हात्रे साहेब, आपण बजेटमध्ये वाढ केली आणि ती मिळाली नाही तर आपले बजेट पुन्हा फुगल्यासारखे होईल. आपल्याला जर पाणी योजनेतून अंशदान मिळत असतील तर त्याच्यासाठी आपण प्रयत्न करु पण त्याची प्रोव्हीजन बजेटमध्ये करण्याची गरज नाही. मिळणार असेल व योजना असेल तर त्या योजनेतून आपण ह्याच्यात प्राप्त करुन घेउन.

**मिलन म्हात्रे :-**

आपण या योजनेची नोंद करा. पण तेही नाही आणि हे आपल्याला अधिकाऱ्यांनी कळविले पाहिजे. आयुक्तांनी सांगितले पाहिजे की, ह्या ह्या स्कीम आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आपण नोंद करुन पुन्हा बजेटचा अंगकार फुगवल्यासारखा होईल.

**मिलन म्हात्रे :-**

आपण या सुचना नोंद करा.

**मा. उपमहापौर :-**

सुचना घेतो.

**हॅरल बोर्जीस :-**

पान क्र. १६ मध्ये अनु. क्र. ८ औषध खरेदी १ कोटी २० लक्ष रुपयाची प्रोव्हीजन आपण दिलेली आहे. आपण त्याठिकाणी थोडीशी वाढ करुन २ कोटी रुपये करावे आणि त्याच पानावर अनु. क्र. २ पल्स पोलिओ ह्याच्यासाठी आपण ४५ लक्ष रुपयाची प्रोव्हीजन दिलेली आहे त्याठिकाणी ७५ लाख रु. करावे. अशा काही सुचना सदस्यांकडून आलेल्या होत्या. सन २००७-०८ चा ज्या मूळ अंदाजपत्रकाचा ठराव मा. महासभेमध्ये मी दिलेला होता. त्या ठरावामध्ये सन्मा. सदस्यांनी पुन्हा एकदा ज्या दुरुस्त्या सुचविलेल्या होत्या त्या दुरुस्त्या त्या ठरावात अंतर्भूत करुन ठराव कायम करावा व या ठरावाला सुचक, अनुमोदक झाले होते.

**रोहित सुवर्णा :-**

सभागृह नेते साहेब पान क्र. ५ व ३३ चे काय?

**हॅरल बोर्जीस :-**

पिठासिन अधिकारी मॅडम, त्याची अजून एक सुचना अशी होती की, पान क्र. ३३ वर स्ट्रीट लाईटपोटी आपण जे सव्वादोन कोटी रुपये केलेले आहेत त्याच्यामध्ये जर शक्य झाले तर अजून थोडी वाढ करावी अशी त्यांची सुचना आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आपण ऑलरेडी ऑक्टोबर महिन्यामध्ये त्याची मंजूरी घेतली आहे.

**प्रकरण क्र. १२२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. २००)

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००६/२००७ सुधारित व सन २००७/२००८ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि.२८/२/२००७ विचारात घेवून व शासनाचे नियमानुसार जकातीची रक्कम कायम करुन मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००६/०७ चे सुधारीत व सन २००७/०८ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | ''अ'' अंदाजपत्रक | **२४४५३.६५** | **२००७-०८** | **खर्च** | ''अ'' अंदाजपत्रक | **२२९६९.६५** |
| | ''ब'' अंदाजपत्रक | **१२७७.००** | | | ''ब'' अंदाजपत्रक | **१५२३.००** |
| | ''क'' अंदाजपत्रक | **७२९३.३०** | | | ''क'' अंदाजपत्रक | **८४४३.३०** |
| | वृक्षप्राधिकरण | **१६२.२५** | | | वृक्षप्राधिकरण | **२४५.२५** |
| | | | | | अखेरची शिल्लक | **५.००** |
| | एकूण | **३३१८६.२०** | | | एकूण | **३३१८६.२०** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६<br>तपशील | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर<br>तपशील |
|---|---|---|---|
| **१) कॅपीटेशन फी** | **अ)**<br>**१.** १६ मिटर ते २४ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. १०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | **१) कॅपीटेशन फी** | **अ)**<br>**१.** १५ मिटर ते २४ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. २०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु.२०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | | | **२.** १ ते १५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ४०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु.४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे १५ ते २४ मी. उंच निवासी इमारतीमध्ये असलेल्या अनिवासी / व्यापारी क्षेत्रफळासाठी प्रती मंजूर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ५०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| | **२.** १६ मिटर ते २४ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु.२०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. २०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | **३.** १५ मिटर ते २४ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ४०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु.४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | **३.** शैक्षणिक, समाज मंदिर व दवाखाने इत्यादि इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी रु. १०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | **४.** शैक्षणिक, समाज मंदिर व दवाखाने इत्यादि इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी **रु. २०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६ | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर |
|---|---|---|---|
| | तपशील | | तपशील |
| | ४. लॉजिंग बोर्डींग, हॉटेल इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी रु. २०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु.२०,००० कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | ५. लॉजिंग बोर्डींग, हॉटेल इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी **रु. ४०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| **१) कॅपीटेशन फी** | ब)<br>१. २४ मिटर ते ४५ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ४०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. ४०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | **१) कॅपीटेशन फी** | ब)<br>१. २४ मिटर ते ३५ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ५०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | २. २४ मिटर ते ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु.१००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. | | २. २४ मिटर ते ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. २००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | ३. ४५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. १००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १,००,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | ३. ३५ मिटर ते ४५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी.परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. **१,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६<br>तपशील | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर<br>तपशील |
|---|---|---|---|
| | ४. ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. २००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ.मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. २,००,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | ४. ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ५,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | | | ५. मल्टीप्लेक्स/मॉल, रिसॉर्टकरिता प्रती मंजूर चौ.मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| | | | ६. दुचाकी / चार चाकी शोरूम करिता प्रती मंजूर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु.१००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| **१) कॅपीटेशन फी** | **क)** कारखाने,गोडावून,वेअरहाउस,सिनेमागृह,नाटयगृह,पेट्रोल पंप इत्यादिं इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ५०/- प्रमाणे कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | **१) कॅपीटेशन फी** | **क)** कारखाने, गोडावून वेअरहाउस, सिनेमागृह, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादिं इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| **२)उंच इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची निरीक्षण शुल्क** | **अ)** १६ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या १/१० पट घेण्यात यावे.<br>**ब)** १६ मिटर पेक्षा उंच अनिवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या १/४ पट घेण्यात यावे.<br>**क)** कारखाने, गोडाउन, वेअरहाउस, सिनेमा थिएटर, नाटयगृह इत्यादिसाठी ना हरकत दाखला वार्षिक तपासणी शुल्क | **२)उंच इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची निरीक्षण शुल्क** | **अ)** १५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावे.<br>**ब)** १५ मिटर पेक्षा उंच अनिवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | कॅपीटेशन फी च्या १/४ पट घेण्यात यावे. | | **क)** कारखाने, गोडाउन, वेअरहाउस, सिनेमा थिएटर, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादिसाठी कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी.<br>**ड)** मल्टिप्लेक्स / मॉल, रिसॉर्ट इत्यादिसाठी कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी. |

| **महसुलीचा प्रकार** | **अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६** | **महसुलीचा प्रकार** | **सुधारीत ( Revised ) नवीन दर** |
|---|---|---|---|
| | **तपशील** | | **तपशील** |
| **३) फायर रिपोर्ट फी** | मिरा भाईंदर क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील निवासी, अनिवासी व औद्योगिक कारखान्यात आग विझविल्यानंतर त्यांना आवश्यकता भासल्यास फायर रिपोर्ट दिला जातो. सदर फायर रिपोर्टची फी रु. ५००/- घेण्यात यावी. | **३) फायर रिपोर्ट फी** | मिरा भाईंदर क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील निवासी, अनिवासी व औद्योगिक कारखान्यात आग विझविल्यानंतर त्यांना आवश्यकता भासल्यास फायर रिपोर्ट दिला जातो. सदर फायर रिपोर्टची फी **रु. १,०००/-** घेण्यात यावी. |
| **४) उपहार गृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट इतरसाठी नाहरकत दाखला शुल्क** | उपहारगृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट व इतर साठी नाहरकत दाखला देताना रु. ५००/- शुल्क आकारावे, तसेच नाहरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क रु. २००/- आकारण्यात यावे. | **४) उपहार गृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट इतरसाठी नाहरकत दाखला शुल्क** | उपहारगृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट व इतर साठी नाहरकत दाखला देताना **रु. १,०००/-** शुल्क आकारावे, तसेच नाहरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. १,०००/-** आकारण्यात यावे. |
| **५) प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्रीसाठी** | प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्रीसाठी व इतरसाठी नाहरकत दाखला देताना रु. २००/- शुल्क आकारण्यात यावे. | **५) प्रदर्शनीय मेळा, फटाका** | प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्री, जत्रोत्सव / जत्रा व इतरसाठी नाहरकत दाखला देताना **रु. २,०००/-** शुल्क आकारण्यात यावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क** | | **विक्रीसाठी व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क** | |
| **६) सर्कस , फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क** | सर्कस, फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला देताना रु. ५००/- शुल्क आकारण्यात यावे. | **६) सर्कस , फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क** | सर्कस , फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला देताना **रु. ५,०००/-** शुल्क आकारण्यात यावे. |
| **७) कारखाने, गोडाउन,वेअरहाउस सिनेमा गृह,नाटयगृह व पेट्रोल पंप इत्यादी साठी ना हरकत दाखला शुल्क** | कारखाने, गोडावून वेअरहाउस, सिनेमागृह, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादी साठी व्यवसाय करणे कामी ना हरकत दाखला शुल्क रु. २,०००/- वा वार्षिक नुतनीकरण शुल्क रु. १०००/- आकारण्यात यावे. | **७) कारखाने, गोडाउन इत्यादी साठी ना हरकत दाखला शुल्क** | कारखाने, गोडावून इत्यादिसाठी व्यवसाय करणे कामी ना हरकत दाखला शुल्क **रु. ५,०००/-** व वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. ३,०००/-** आकारण्यात यावे. |

| **महसुलीचा प्रकार** | **अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर**<br>**मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६** | **महसुलीचा प्रकार** | **सुधारीत ( Revised ) नवीन दर** |
|---|---|---|---|
| | **तपशील** | | **तपशील** |
| ८) | | **८) रिसॉर्ट साठी ना हरकत दाखला शुल्क** | रिसॉर्ट व्यवसाय करणेकामी ना हरकत दाखला शुल्क **रु. ५,०००/-** वा ना हरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. ३०००/-** आकारण्यात यावे. |
| ९) | | **९) शिधावाटप दुकाने, कपडयाची दुकाने, टि.व्ही. शो रुम, रंगाचे दुकाने, इलेक्ट्रिक दुकाने, फ्रेंच पॉलीश विक्रीचे दुकान, लिकर शॉप** | शिधावाटप दुकाने, कपडयाची दुकाने, टि.व्ही. शो रुम, रंगाचे दुकाने, इलेक्ट्रिक दुकाने, फ्रेंच पॉलीश विक्रीचे दुकान, लिकर शॉप (दारुचे दुकान) व फर्निचर दुकान इत्यादिसाठी ना हरकत दाखला शुल्क **रु. १०००/-** तसेच ना हरकत दाखल्याचे वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. ५००/-** आकारण्यात यावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **(दारुचे दुकान) व फर्निचर दुकान इत्यादिसाठी ना हरकत दाखला शुल्क** | |
| **१०) फायर इंजिन, वॉटर टँकर, रेस्क्यू टेंडर,** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर अग्निशमन सेवेसाठी ३ तासापर्यत रु. ४०००/- व त्यानंतर प्रत्येक तासाला २५% प्रमाणे वसूल करण्यात यावे. तसेच रासायनिक आग विझविण्यासाठी वापरण्यात येणारा फोम कम्पाउंड त्यावेळच्या खरेदी दराप्रमाणे वसूल करण्यात यावे. | **१०) फायर इंजिन, वॉटर टँकर, रेस्क्यू टेंडर,** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर अग्निशमन सेवेसाठी ३ तासापर्यत **रु. ४,०००/-** व त्यानंतर प्रत्येक तासाला **२५%** प्रमाणे वसूल करण्यात यावे. तसेच रासायनिक आग विझविण्यासाठी वापरण्यात येणारा फोम कम्पाउंड त्यावेळच्या खरेदी दराप्रमाणे वसूल करण्यात यावे. |
| ११) | | **११) रिलायन्स एनर्जी डि.पी. बॉक्स, रिलायन्स सबस्टेशन, रिलायन्स केबल** | ११) रिलायन्स एनर्जी डि.पी. बॉक्स, रिलायन्स सबस्टेशन, रिलायन्स केबल हयांना **अनु. क्र. १० प्रमाणे** दर आकारण्यात यावा. |

| **महसुलीचा प्रकार** | **अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६** | **महसुलीचा प्रकार** | **सुधारीत ( Revised ) नवीन दर** |
|---|---|---|---|
| | **तपशील** | | **तपशील** |
| **१२) कर्मचारी देयक** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अग्निशमन सेवेसाठी कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्क आकारु नये परंतु रासायनिक आग असल्यास फोम कम्पाउंड वापरल्यास वरीलप्रमाणे (**अनु. क्र. १०**) नुसार रक्कम वसूल करावी.<br>अग्निशमन अधिकारी रु. २५०/-<br>लिडींग फायरमन रु. ७५/-<br>वाहन यंत्रचालक रु. ७५/-<br>फायरमन रु. ५०/-<br>**अनु. क्र. १० मधील अग्निशमन सेवा शुल्क वसुल करण्यात आलेल्या रक्कमेतून अधिकारी व कर्मचारी यांना सदरची रक्कम आगीचा भत्ता म्हणुन अदा करणेत यावी.** | **१२) कर्मचारी देयक** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अग्निशमन सेवेसाठी कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्क आकारु नये परंतु रासायनिक आग असल्यास फोम कम्पाउंड वापरल्यास वरीलप्रमाणे (**अनु. क्र. १०**) नुसार रक्कम वसूल करावी.<br>अग्निशमन अधिकारी **रु. ५००/-**<br>लिडींग फायरमन **रु. १५०/-**<br>वाहन यंत्रचालक **रु. १५०/-**<br>फायरमन **रु. १००/-**<br>**अनु. क्र. १० मधील अग्निशमन सेवा शुल्क वसुल करण्यात आलेल्या रक्कमेतून अधिकारी व कर्मचारी यांना सदरची रक्कम आगीचा भत्ता म्हणुन अदा करणेत यावी.** |

| | | | |
|---|---|---|---|
| **१३) पोर्टेबल पंप व ट्रेलर पंप भाडे तत्वावर देणेबाबत.** | एक तासासाठी रु. २०००/- व त्यानंतर प्रत्येक तासासाठी २५% प्रमाणे रक्कम वसुल करण्यात यावी. | **१३) पोर्टेबल पंप व ट्रेलर पंप भाडे तत्वावर देणेबाबत.** | एक तासासाठी **रु. २,०००/-** व त्यानंतर प्रत्येक तासासाठी **२५%** प्रमाणे रक्कम वसुल करण्यात यावी. |
| **१४) वॉटर टँकर पोर्टेबल पंपासहित** | प्रत्येक फेरीला रु. १०००/- प्रमाणे भाडे वसूल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधितांकडुन वसुल करण्यात यावा. | **१४) वॉटर टँकर पोर्टेबल पंपासहित** | प्रत्येक फेरीला **रु. १,०००/-** प्रमाणे भाडे वसूल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधितांकडुन वसुल करण्यात यावा. |
| **१५) बदोबस्त डयुटी** | १) खाजगी कार्यक्रमासाठी व्ही. आय. पी. आले असल्यास कार्यक्रम आयोजकाकडुन अनु. क्र. १० प्रमाणे शुल्क वसुल करण्यांत यावे<br>२) शासकीय कार्यक्रम असल्यास शुल्क आकारु नये. | **१५) बदोबस्त डयुटी** | १) खाजगी कार्यक्रमासाठी व्ही. आय. पी. आले असल्यास कार्यक्रम आयोजकाकडुन **अनु. क्र. १०** प्रमाणे शुल्क वसुल करण्यांत यावे<br>२) शासकीय कार्यक्रम असल्यास शुल्क आकारु नये. |

| **महसुलीचा प्रकार** | **अस्तित्वात असलेले (Existing) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९९ दि. २०/०३/२००६** | **महसुलीचा प्रकार** | **सुधारीत (Revised) नवीन दर** |
|---|---|---|---|
| | **तपशील** | | **तपशील** |
| **१६) पेट्रोल चेन सॉ** | खाजगी कामासाठी चेन सॉ भाडयाने दिल्यास ३ तासापर्यत रु. २,५००/- व त्यानंतर प्रत्येक तासाला २५% प्रमाणे भाडे वसुल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधिताकडून वसुल करण्यात यावा. | **१६) पेट्रोल चेन सॉ** | खाजगी कामासाठी चेन सॉ भाडयाने दिल्यास प्रती तास रु. १,०००/- प्रमाणे भाडे वसुल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधिताकडून वसुल करण्यात यावा. |
| **१७) फायर टॅक्स** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम क्र. १२९ (क) च्या तरतूदींचा एकत्रित विचार करुन अधिनियमातील कलम ६३ (५) च्या पुर्ततेकामी सर्वसाधारण मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर १% अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात यावे. | **१७) फायर टॅक्स** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम क्र. १२९ (क) च्या तरतूदींचा एकत्रित विचार करुन अधिनियमातील कलम ६३ (५) च्या पुर्ततेकामी सर्वसाधारण मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर **२ %** अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात यावे. |
| **१८)** | | **१८) फी** | मिरा-भाईंदर क्षेत्रात किंवा क्षेत्राबाहेर रस्त्यावर वाहनास अपघात झाल्यास किंवा इतर आणीबाणीच्या वेळेस वाहन आग विझविणेकामी किंवा बंदोबस्तकामी मागविल्यास **अनुक्रमांक १०** नुसार फी घेण्यात यावी. |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२३ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ५ वर अनु. क्र. १७ त्याच्यात ही वाढ करावी.

**मा. महापौर :-**

पान क्र. २३ वर महापौर सहाय्यता निधी सन २००६-०७ मध्ये २५ लक्ष रुपये ठेवण्यात आला होता. आता स्थायी समितीने सन २००७-०८ मध्ये ५ लक्ष रु. ठेवले आहे ते २५ लक्ष रुपयेच ठेवण्यात यावा. तसेच, पान क्र. २९ महापौर आयुक्त निवास यासाठी खर्चाची तरतुद ५ लक्ष रुपये ठेवण्यात आलेली होती तिथे १५ लाख रु. तरतुद करण्यात यावी.

**मिलन पाटील :-**

आपण खर्चाचे एवढे दाखविले तर त्याच्या बदल्यात उत्पन्नाची बाब काय दाखविली आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ऑलरेडी बंगला बांधून झाला आहे. तर नगरसेवक निधीतून विश्रामगृह बांधायचे त्याच्यातून तरतुद ठेवा ना.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १२३ चा सभागृहासमोर ठराव मांडण्यात आला.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १२३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १९९)

**ठराव क्र. ९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००६/२००७ सुधारित व सन २००७/२००८ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १९८ दि. २८/२/२००७ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसहाव दुरुस्तीसहासन २००६/०७ चे सुधारीत व सन २००७/०८ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | ''ब'' अंदाजपत्रक | **१२७७.००** | **२००७-०८** | **खर्च** | ''ब'' अंदाजपत्रक | **१५२३.००** |
| | ''अ' अंदाजपत्रक हस्तांतरण | **२५०.००** | | | अखेरची शिल्लक | **४.००** |
| | | | | | | |
| | **एकूण** | **१५२७.००** | | | **एकूण** | **१५२७.००** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२४ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १२४ चा सभागृहासमोर ठराव मांडण्यात आला.

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १२४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००६-०७ चे सुधारित व २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २८/०२/२००७ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १९८)

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००६/२००७ सुधारित व सन २००७/२००८ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि. २८/२/२००७ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसहाव दुरुस्तीसहासन २००६/०७ चे सुधारीत व सन २००७/०८ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | वृक्षप्राधिकरण | **१६२.२५** | **२००७-०८** | **खर्च** | वृक्षप्राधिकरण | **२४५.२५** |
| | ''अ' अंदाजपत्रक हस्तांतरण | **८३.००** | | | | |
| | | | | | | |
| | **एकूण** | **२४५.२५** | | | **एकूण** | **२४५.२५** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- ॲड. एस.ए.खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

दि. १७/०३/०७ ची पहिली सभा संपली असे मी घोषित करत आहे. सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी दुसऱ्या सभेच्या विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, कोरम पूर्ण आहे का, ते बघा.

**रिटा शाह :-**

सचिवजी, आपण विषय वाचत आहात पण त्याअगोदर कोरम पूर्ण आहे का, ते तरी बघा ना।

**नगरसचिव :-**

ऑल इंडिया इन्स्टीटयूट मध्ये २२ व २३ ला प्रशिक्षण आहे. नविन कायद्यात जो बदल झाला आहे त्याबाबत प्रशिक्षण आहे व ज्या सदस्यांना या प्रशिक्षणाकरिता जायचे आहे त्यांनी माझ्याकडे नाव दयायची आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

शोकप्रस्ताव मांडत आहे. आपल्या सदनातील नगरसेवक नितीन ठाकूर यांचे ''काका'' आणि भाईंदर येथील एक प्रसिद्ध उदयोगपती मोरेश्वर बाळाराम ठाकूर ह्यांचे नुकतेच निधन झालेले आहे. तसेच सतीश प्रभाकर म्हात्रे आमचे समाजबांधव यांचे निधन झालेले आहे. राममंदिर येथील बऱ्याचशा व्यक्ति या नजदिकच्या काळात मृत्यू झालेल्या आहेत व आमच्या गावातील स्थानिक निळकंठ पाटील ह्यांची पत्नी मृत्यू पावली आहे. या सर्वाचा शोकप्रस्ताव मी या सदनापुढे मांडत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

रामचंद्र भोईर मुर्धा हे देखिल वारले आहेत त्यांना देखिल आपण सर्वांनी श्रद्धाजंली वाहावी.

(सभागृहात उभे राहून दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**दुःखवटा ठराव ९६ :-**

आपल्या सदनातील नगरसेवक नितीन ठाकूर यांचे ''काका'' आणि भाईंदर येथील एक प्रसिद्ध उदयोगपती मोरेश्वर बाळाराम ठाकूर, राममंदिर येथील बऱ्याचशा व्यक्ति, स्थानिक निळकंठ पाटील ह्यांची पत्नी तसेच मुर्धा गावातील रामचंद्र भोईर यांचे दुखःद निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची दि. १७/०३/०७ ची दुसरी सभा कोरम अभावी रद्द करण्यांत येत आहे असे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- संध्या ६.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**